नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

अनुक्रमणिका

साहित्य संघाचें मुखपत्र

युगवाणी

वर्ष ११
अंक ११

फेब्रुवारी १९५७

संपादक :
पां. कृ. सावळापूरकर



श्री. पुरुषोत्तम दिवाकर ऊर्फ बाळासाहेब ठवळे
अध्यक्ष, विदर्भ साहित्य संमेलन, १९ वें अधिवेशन, गोंदिया

अनुक्रमणिका

अनुक्रमणिका

वि. सा. संघाचें मुखपत्र

युगवाणी

संपादक :
पां. कृ. सावळापूरकर

संपादक मंडळ :
कृ. व्यं. पेशकार
मा. ल. व्यवहारे
व. कृ. वऱ्हाडपांडे
प्र. दे. कोलते
रा. ना. घाटोळे
भा. श्री. परांजपे
तु. ना. काटकर

वर्ष ११ वें : अंक ११ वा

फेब्रुवारी १९५७

संपादकीय

कै. पंडित रविशंकर शुक्ल

आमच्या जुन्या मध्यप्रांताचे मुख्य प्रधान पं. रविशंकर शुक्ल यांना गेल्या डिसेंबर ३१ रोजीं देवाज्ञा झाली. या घटनेने विदर्भ साहित्य संघाला अपरिमित दुःख झालें. त्यांचा अधिकार नागपूरवर होता तोंवर त्यांनी व त्यांच्या सरकाराने वि. सा. संघाला हरएक कार्यांत अतिशय मदत केली. वि. सा. संघाच्या वास्तूचें भूमिपूजन देखील त्यांच्याच हातून झालें होतें. राज्य-पुनर्रचनेनंतरहि त्यांचा संघावरील हा लोभ अखेरपर्यंत कायम होता. त्यांच्या मृत्यूने एक मुरब्बी राजकारणी व विद्याभिलाषी थोर पुरुष नाहीसा झाला आहे. 'युगवाणी' त्यांच्या आत्म्यास आपली श्रद्धांजलि अर्पण करीत असून त्यांच्या कुटुंबीयांच्या दुःखांत सहभागी असल्याचें जाहीर करीत आहे.

श्री. अण्णासाहेब मंगळमूर्ति यांचें अभीष्टचिंतन

वि. सा. संघाचे कार्यकारी विश्वस्त श्री. के. तु. ऊर्फ अण्णासाहेब मंगळमूर्ति यांच्या वयाला गेल्या जानेवारीच्या सात तारखेला, साठ वर्षें संपून एकसष्ठावें वर्ष लागलें आहे. या निमित्ताने 'युगवाणी' त्यांचें अभीष्टचिंतन करीत आहे. त्याच दिनांकापासून अण्णासाहेब आपल्या न्यायमूर्तिपदावरूनहि सेवानिवृत्त झाले असून ते लोकोपयोगी संस्थांच्या द्वारा समाज-सेवा करण्यासाठीच आपला बहुतेक वेळ खर्च करणार आहेत. श्री. अण्णासाहेब यांचा इतर अनेक संस्थांप्रमाणेच विदर्भ साहित्य संघालाहि केवढा आधार आहे व त्यांच्या प्रेरणेने किती लहानमोठे कार्यकर्ते कार्यतत्पर होतात, याचा अनुभव अनेकांना आहे. त्यांचा उत्साह, कामें उरकण्याची तडफ, निगर्वीपणा, परोपकारी वृत्ति व मनमिळाऊपणा हे गुण केवळ अद्वितीय आहेत. किंबहुना आजमितीस विदर्भांतील सर्व सांस्कृतिक चळवळींचे ते एकमेव प्रमुख आधार आहेत असें म्हटलें तरी चालेल. शिक्षणक्षेत्रांत त्यांनी महनीय कामगिरी केली असून आता नागपूर विद्यापीठाचे कुलगुरु म्हणून तर त्यांचें हें क्षेत्र अधिकच व्यापक झालें आहे.

अनुक्रमणिका

श्री. अण्णासाहेबांना उदंड आयुरारोग्य लाभो व या कल्पवृक्षाच्या सावलींत अनेक सज्जनांचे लोकोपकारी संकल्प पुरे होवोत. अशी परमेश्वरचरणीं आमची प्रार्थना आहे.

श्री. वा. ना. देशपांडे

'युगवाणी'चे प्रारंभींच्या काळांतील संपादक व विदर्भांतील ख्यातनाम संशोधक श्री. वा. ना. देशपांडे यांचा यवतमाळ येथील नगर वाचनालयांत समारंभाने छायाचित्र लावून, जो सन्मान करण्यांत आला त्याबद्दल आम्ही श्री. वा. ना. देशपांडे आणि यवतमाळकर मंडळी या दोघांचेंहि अभिनंदन करतों. महानुभावीय वाङ्मयाचे साक्षेपी संशोधक, विचक्षण व समतोल टीकाकार आणि रसज्ञ व व्युत्पन्न कवि या त्रिविध नात्यांनी श्री. वा. ना. देशपांडे अतिशय प्रख्यात आहे. त्यांच्या परिणतप्रज्ञेचा लाभ नवीन वाङ्मयकृतीच्या रूपाने दीर्घकाळ मिळत राहो व त्यासाठी त्यांना भरपूर आयुरारोग्य लाभो, अशी परमेश्वरास प्रार्थना आहे.

नाट्योत्सव समिति

'युगवाणी'च्या गेल्या अंकांत नाटयोत्सवाचा समग्र वृत्तांत दिला होता. आता त्या समितीचे विधिपूर्वक विसर्जन झालें असून उर्वरित अधिकार वि. सा. संघाच्या स्थायी नाटयसमितीकडे सोपविण्यांत आले आहेत. या नाटयोत्सव समितीने जिवापाड मेहनत घेऊन खर्च वजा जातां वि. सा. संघाच्या रंगमंचाच्या बांधकामास सुमारें साडेसहा हजार रुपयांची भरीव मदत मिळवून दिली ही गोष्ट फार अभिनंदनीय आहे. हें श्रेय नाटयोत्सव समितीच्या सर्वच लहानमोठया कार्यकर्त्यांकडे जातें. तथापि त्या समितीचे अध्यक्ष श्री. बाळासाहेब अण्णेगिरी आणि कार्यवाह श्री. द. रा. गोमकाळे यांचे श्रम विशेष उल्लेखनीय आहेत. 'युगवाणी' या सर्वच कार्यकर्त्यांचा गौरव करीत आहे.

साहित्य संमेलन

प्रस्तुत अंक गोंदिया येथे भरत असलेल्या साहित्य संमेलनाच्या सुमारास प्रसिद्ध होत आहे. गोंदिया येथील उत्साही कार्यकर्त्यांनी ही संमेलन अधिवेशनाची कठीण जबाबदारी अंगावर घेतली व ती यशस्वी रीतीने पार पाडली ही संतोषाची गोष्ट आहे. संमेलनाच्या अध्यक्षपदावर वि. सा. संघाने स्थायी अध्यक्ष श्री. **बाळासाहेब ढवळे** यांचीच योजना स्वागतमंडळाने केली हेंहि फार औचित्यपूर्ण झालें. या निमित्ताने आम्ही श्री. बाळासाहेब ढवळे यांचें अभिनंदन करतों. संमेलनाचे स्वागताध्यक्ष श्री. छोटुसा लहानुसा क्षत्रिय व कार्यवाह श्री. ना. ग. डबीर यांचे परिश्रम अवर्णनीय आहेत. स्वागताध्यक्ष व अध्यक्ष यांचा परिचय व भाषणें याच अंकांत समाविष्ट केलीं आहेत.

पुढील अंक

'युगवाणी'चा मार्चचा अंक ललित साहित्य विशेषांक म्हणून निघणार आहे व त्याचें संपादन प्रा. मा. ल. व्यवहारे हे करीत आहेत, हें जाहीर झालें आहे. एप्रिलचा अंक 'संस्कृति विशेषांक' म्हणून निघणार असून त्याचें संपादन संपादक मंडळांतील श्री. प्र. दे. कोळते हे करणार आहेत. या अंकांत संस्कृतिविषयक लेख भिन्न भिन्न दृष्टिकोनांतून देण्यांत येतील.

गडकऱ्यांची खरी भूमिका ?
कवि गोविंदाग्रज !

(३ मे १८८५—२२ जानेवारी १९१९)

(विदर्भ साहित्य संघ गडकरी–स्मारक समितीच्या विद्यमानें गडकरी–स्मृतिदिनानिमित्त दि. २३ जानेवारी १९५७ रोजीं झालेलें प्रा. भ. श्री. पंडित ह्यांचें भाषण)

रसिक श्रोतेहो !

१

गडकऱ्यांचा नश्वर देह गेला. परंतु त्यांचा यशोदेह अजरामर आहे. त्यांचें आयुष्य अल्प होतें. तें त्यांना पुरतें चवतीस वर्षेंहि लाभलें नाही. त्यांचा साहित्य-निर्मितीचा काळ तर याहूनहि अल्प होता. मे १९०९ च्या मनोरंजनांत 'अल्लड प्रेमास' ही त्यांची कविता प्रसिद्ध झाली. तो त्यांच्या साहित्यनिर्मितीचा खरा प्रारंभ होय. यापूर्वी पांच सहा वर्षे लेखनाच्या क्षेत्रांत त्यांनी उमेदवार म्हणून प्रवेश केला होता. जुलै १९१२ च्या मनोरंजनांत 'राजहंस माझा निजला' हें त्यांचें आर्त व आर्द्र गीत प्रसिद्धि पावलें. त्याबरोबर उभ्या महाराष्ट्रांत त्यांचा बोलबाला झाला. आणि त्यांच्या मृत्यूनंतर एकच प्याला व भावबंधन हीं त्यांचीं नाटकें रंगभूमीवर येतांच त्यांच्या लोकप्रियतेने उच्चांक गाठला. गडकऱ्यांना जाऊन आज अडतीस वर्षें झालीं. परंतु त्यांच्या लोकप्रियतेला मागे सारील असा साहित्यिक अजून जन्मास आलेला नाही.

त्यांच्या या लोकप्रियतेची मीमांसा अनेकांनी अनेक प्रकारें केली आहे. साहित्यिक गडकऱ्यांची भूमिका त्रिविध होती. ते केवळ कवीच नव्हते, तर नाटककार व विनोदी लेखकहि होते. नाटक हा वाङ्मय-प्रकार केवळ वाचनीय नाही. तो प्रयोगक्षम असल्यामुळे जसा प्रेक्षणीय तसाच श्रवणीय आहे. तो गर्दीसाठी आहे. त्याचप्रमाणे विनोद सर्वांसाठी आहे. तेव्हा हे प्रकार सहज लीलेने हाताळणारे गडकरी साहजिक लोकप्रिय झाले, असा त्यांच्या मीमांसांचा आशय आहे. परंतु हे प्रकार कलाकुशलतेने हाताळतां यावेत, याकरिता गडकऱ्यांनी केवढें कठिण तपाचरण केलें होतें, तें लक्षांत घेणें आवश्यक आहे. गडकरी मोठे व्यासंगी होते. त्यांचें वाचन, मनन व चिंतन सतत चालू असे. त्यांना लेखनास अवधि लागत नसे. परंतु त्याची पूर्वतयारी करण्यांत ते दिवसच्या दिवस घालवीत. अर्ध्या हळकुंडाने पिवळें होण्याची त्यांची वृत्ति नव्हती. त्यांच्या या व्यासंगी वृत्तीचें प्रा. फडके यांनी 'व्यास, अभ्यास व निदिध्यास' या तीन शब्दांत वर्णन केलें आहे; तें यथार्थ नाही असें कोण म्हणेल ? गडकरी आपल्या लेखनाचीं टिपणें तयार करीत, आराखडे आंखीत आणि आलेख काढीत. त्यांना ईश्वरदत्त प्रतिभा होती, परंतु ती प्रखर व्हावी आणि तिचा प्रकाश चौफेर फाकावा, यासाठी त्यांनी तिला निरनिराळे पैलू पाडले होते. त्यांपैकी कांही विशेष प्रशंसनीय व प्रेक्षणीय आहेत.

२

कल्पकता हा गडकऱ्यांच्या प्रतिभेचा अलौकिक विशेष आहे. त्यांच्याइतका कल्पनासंपन्न साहित्यिक आजपर्यंत कुणी झाला नाही. कल्पनेच्या दोन प्रकारांना

इंग्रजींत दोन वेगवेगळे शब्द आहेत. तसे ते मराठींत नाहीत. तरल कल्पना असल्यास तिला इंग्रजींत फॅन्सी (fancy) असें नांव आहे. चिमुकल्या पंखांच्या फुलपाखराप्रमाणे ती चंचल व चपळ असते. तिच्या श्रवणाने हृदयाला गोड गुदगुल्या होतात आणि ओठांवर मंदस्मित उमलतें. याउलट कल्पना विशाल असेल, तर तिला इंग्रजींत इमॅजिनेशन् (imagination) असें म्हणतात. विस्तृत पंखांच्या गरुडाप्रमाणें ती क्षणार्धांत उंच आकाशांत भरारणारी तर क्षणार्धांत खोल दरींत झेंपावणारी असते. तिच्या दर्शनाने दृष्टि दिपते आणि वाणी कुंठित होते. गडकऱ्यांच्या साहित्यांत या दोन्ही प्रकारच्या कल्पनांचा खच आहे. त्यांचें हें कल्पनावैभव पाहिलें म्हणजे त्यांना 'कल्पनाकुबेर' ही पदवी यथार्थ ठरेल असें वाटतें. त्यांच्या भिन्नभिन्न कल्पनांनी मोहूनच त्यांचे समवयस्क व समकालीन कवि रेंदाळकर यांनी

'गोविन्दाग्रज वाग्वधूवर सदा घाली नव्या कल्पना'

असे त्यांच्या गौरवपर उद्‌गार काढले आहेत.

कल्पनांच्या विलासांत रमणारें मन स्वप्नाळू असतें. त्याला रात्रीं निद्रेंत स्वप्नें पडतातच; परंतु तें दिवसादेखील तंद्रींत स्वप्नसुखाचा अनुभव चाखीत असतें. गडकऱ्यांच्या काव्यांत, नाटकांत आणि विनोदांत अशीं कल्पनांचीं किती तरी मधुर स्वप्नें आहेत. आधीच कल्पनेंत मश्गुल असणाऱ्या आपल्या मनास स्वप्नाळूपणाची सवय गडकऱ्यांनी कुमारकालापासूनच लावून घेतली असावी असें वाटतें. गडकरी विद्यार्थी असतांना कै. शिवरामपंत परांजपे यांचें 'काळ पत्र' तरुणांत अतिशय प्रिय होतें. परांजप्यांच्या लेखांचें स्वरूप काव्यमय आहे. त्यांत भावनांना कल्पनांच्या कोंदणांत बसविलें आहे. त्यामुळे ते लेख अत्यंत आकर्षक झाले आहेत. गडकऱ्यांच्या 'काळ', 'रात्रीस ओरडणाऱ्या घुबडास', 'पानपतचा फटका' इत्यादि आरंभींच्या कविता 'काळ' पत्रांतच प्रसिद्ध झाल्या होत्या. तेव्हा परांजप्यांच्या लेखनशैलीचा निसटता व पुसटता संस्कार त्यांच्या लेखणीवर घडला असल्यास नवल नाही. स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्याहि विचारसरणीवर, वाणीवर व लेखणीवर परांजप्यांच्या शैलीचा अस्पष्ट ठसा उमटलेला आहे. कारण तेहि या सुमारास विद्यार्थी असून 'काळ' पत्राचे वाचक होते. गडकरी व सावरकर दोघेहि प्रतिभासंपन्न साहित्यसेवक. तेव्हा त्यांनी पुढें परांजप्यांवर मात केली. परंतु साहित्यसेवेच्या सुरुवातीसुरुवातीस परांजप्यांचा आदर्श त्यांच्या समोर होता हें लक्षांत ठेवलें पाहिजे.

फर्ग्युसन् कॉलेजमध्ये असतांना गडकऱ्यांनी सावरकरांशीं आपण होऊन ओळख करून घेतली होती. गडकऱ्यांच्या आणि सावरकरांच्या वाणींत व लेखणींत महाराष्ट्राच्या अस्मितेचा जो पीळ आहे त्याचें मूळ त्यांचीं मनें ज्या 'काळां'त तयार होत होतीं, त्या काळाच्या परिस्थितींत आहे. गडकऱ्यांप्रमाणेंच सावरकरहि स्वप्नाळू म्हणून प्रसिद्ध आहेत. गडकऱ्यांनी आपल्या कल्पनाशक्तीने 'कृष्णाकाठीं कुंडल'मध्ये तीनशें वर्षांपूर्वीचा ओजस्वी शिवकाल साकार केला आहे, तर सावरकरांनी आपल्या 'कमला' काव्यांत दोनशें वर्षांमागचा तेजस्वी पेशवेकाळ निर्माण केला आहे!

भाषाप्रभुत्व गडकऱ्यांच्या प्रतिभेचें एक अपूर्व सामर्थ्य आहे. त्यांच्या शब्दसंपदेचें गणित केवळ अशक्य आहे. त्यांनी जुन्या संतसाहित्याचा आणि शाहिरी कवनांचा कसून अभ्यास केला होता. 'कृष्णाकाठीं कुंडल' आणि राजसंन्यास यांत त्यांच्या त्या अध्ययनाचें परिपक्व फळ दृष्टीस पडतें. गडकऱ्यांनी बखरीहि सूक्ष्म दृष्टीने वाचल्या होत्या. बहुतेक शिवकालीन बखरींचें कर्तृत्व कायस्थ प्रभूंकडे आहे. कारण त्या काळीं लेखन हा कायस्थांचा पेशा होता. तेव्हा कित्येकदा असें वाटतें की त्याच ज्ञातींत जन्मास आलेल्या गडकऱ्यांना भाषेचा हा परंपरागत वारसा प्राप्त झाला असावा. पद्यविभ्रम आणि अलंकारविभ्रम या दृष्टींनी मराठी साहित्याचा आजपर्यंत पुष्कळ प्रपंच झाला आहे. परंतु शब्दविभ्रमाचा विचार अजून सविस्तर झालेला नाही. भाषेचे संप्रदाय, वाक्प्रचार, म्हणी आणि शब्दांचा क्रम, व्युत्क्रम व प्रतिक्रम यांमुळे शब्दविभ्रम कसा निर्माण होतो याचीं उदाहरणें व भिन्नभिन्न प्रकार एकट्या गडकऱ्यांच्या साहित्यांत मुबलक सापडतील. गडकऱ्यांनी भाषेला हवी तशी झुकवली आहे. शब्दांची त्यांची गर्भश्रीमंती साक्षात् लक्ष्मीनारायणालाहि हेवा वाटावा अशी आहे.

अनुक्रमणिका

गडकऱ्यांच्या प्रतिभेचा आणखी एक पैलू असा की, तिचें अंतःकरण जितकें कोमल व संवेदनक्षम आहे, तितकीच तिची बुद्धि तीव्र व तल्लख आहे. त्यामुळें त्यांच्या साहित्यांत सर्वत्र जसे भावनांचे झरे झुळझुळतांना अनुभवास येतात, तसेंच बुद्धीचें क्रीडापटुत्वहि दृष्टीस पडतें. कित्येकदा तर या दोघांत अटीतटीची स्पर्धा चाललेली दिसते. बुद्धि आणि हृदय यांचा असा समसमां संयोग गडकऱ्यांच्या साहित्याशिवाय इतर कुठे प्रत्ययास येत नाही. गडकऱ्यांची प्रतिभा जितकी स्वभावसिद्ध व स्वयंस्फूर्त आहे, तितकीच ती अभ्यस्त, नागर व सुसंस्कृत आहे. त्यांचें साहित्य सर्वप्रिय असण्याचें हें एक फार मोठें कारण आहे.

गडकरी ललित साहित्याचें सर्जन करणारे होते. साहित्य ही संगीत आणि चित्र यांप्रमाणेच एक कला आहे हें ते जाणत होते. जें सुंदर, जें मधुर आणि जें सुकुमार असेल, त्याचें रसिकतेनें शोधन करावयाचें, सहजतेनें आविष्करण साधावयाचें आणि कुशलतेनें प्रदर्शन करावयाचें हें त्यांना अवगत होतें. साहित्यांत केवळ कल्पनेला किंमत नाही आणि निव्वळ शब्दांना भाव नाही हें त्यांना ठाऊक होतें. प्रत्येक कलेंत भावनेला महत्त्व आहे. तेव्हा साहित्यांत अगोदर भावनेची आविष्कृति हवी, ही गोष्ट त्यांच्या परिचयाची होती. आणि तदनुसार त्यांनी आपल्या काव्यांतून, नाटकांतून आणि विनोदांतून भावनांचा आविष्कार केला आहे. निव्वळ भावनाविष्कार उत्कट असला तरी तो प्रभावी रीतीनें हृदयंगम व्हावा म्हणून त्याला नटवलें पाहिजे हें तत्त्व गडकऱ्यांनी हेरलेलें होतें. त्यांचीं काव्यें व नाटकें इतकीं लोकप्रिय झालीं याचें कारण त्यांचा आविष्कार कलात्मक आहे. तो रसांनी सिंचित आहे आणि अलंकारांनी सुशोभित आहे. गडकऱ्यांच्या साहित्याचें स्वरूप अभिजात (classical) आहे. तें निर्घृण काळाच्या उदरांत कवळ म्हणून पडणें शक्य नाही किंवा बेपर्वा विस्मृतीच्या अंधारांत गडप होणेंहि शक्य नाही !

३

गडकरी खरेखुरे जिवंत व जातिवंत कलावंत होते. आणि एक श्रेष्ठ कलावंत या नात्यानेच त्यांच्या व्यक्तित्वाचें व साहित्याचें मूल्यमापन झालें पाहिजे. त्यांच्या काव्यांत आणि नाटकांत प्रेमविवाह व विधवाविवाह या सुधारणांचा निर्देश आहे, जुन्या चालीरीतींवर हल्ला आहे, देवादिकांच्या चरित्रांवर विनोद आहे म्हणून ते सुधारक होते असली चर्चा अप्रस्तुत आहे. लोकमान्य टिळक, भारतसेवक गोखले व पंचम जॉर्ज या तिघांवरहि त्यांच्या कविता आहेत. आणि एकच प्याल्यांत टिळक व आगरकर यांच्याबद्दल गौरवपूर्ण उल्लेख आहे. तेव्हा असल्या तऱ्हेच्या उहापोहाचें वैयर्थ्य सहज समजेल.

वस्तुतः गडकरी सश्रद्ध होते. त्यांचें अंतःकरण निष्ठावंत भाविकाचें होतें. ते वाटेने जातांना प्रत्येक देवळासमोर अवनम्र होत आणि विठोबाची व शंकराची मूर्ति त्यांच्या उशाशीं असे या त्यांच्याविषयींच्या आठवणी काय सांगतात? पातिव्रत्याच्या संरक्षणाकरिता स्वतःच्या पोटच्या गोळ्याचा बळी देणारी वसुंधरा, पतीला देव मानणारी सिंधु आणि आपल्या वडिलांच्या व लहान भावंडांच्या सुखासाठी वृद्धाशीं विवाह करण्यास सिद्ध झालेली मालती काय दाखवतात? ‘स्मशानांतील गाण्यांत’ अथवा प्रेमसंन्यासामधील गडकऱ्यांच्या कमलाकराच्या मुखांत देवधर्मासंबंधी जें विचार आले आहेत, ते सर्व त्यांनी आगरकरांच्या ‘धर्मविचारांची वाढ,’ ‘नवरा बायको,’ ‘सोवळ्याची मीमांसा,’ ‘स्वातंत्र्याच्या वृथा वल्गना,’ ‘आमचे प्रेतसंस्कार’ व ‘गुलामांचें राष्ट्र’ या निबंधांतून उचलले आहेत. या विषयावर मी फेब्रुवारी १९३६ च्या विहंगमांत आगरकर व गडकरी हा लेख लिहिला होता तो जिज्ञासूंनी पाहावा. या विधानाचा पुरावा म्हणून गडकऱ्यांची ‘कपटी मांजर, दिलें तया घर, दारिं इमानी श्वान’ ही सुभाषितसदृश ओळ घ्या. तिचें मूळ आगरकरांच्या पुढील विचारांत आहे;—

> ‘कुत्र्याप्रमाणेच मांजरेंहि मांसभक्षक आहेत; पण एकाला जेवणाच्या ताटापाशीं घेऊन बसावयाचें, व चित्रावती खाऊं द्यावयाच्या आणि दुसऱ्याला ओटीची पायरीच चढूं द्यावयाची नाही. केवढा हा पक्षपात? कुत्रीं इमानानें नोकरी करतात, आणि मांजरें लहान मुलांच्या

तेलकट ताळू चाटतात व चावतात म्हणून तर
हा पक्षपात नसेलना ? '

तेव्हा गडकऱ्यांच्या सामाजिक व राजकीय मतांविषयी वादविवाद करणें कसें व्यर्थ आहे हें सहज लक्षांत येईल. सामाजिक व राजकीय मतांचें निदर्शन हा तत्कालीन युगधर्म होता. त्याला अनुसरून गडकऱ्यांनी आपल्या साहित्यांत त्यांचें निदर्शन केलें आहे इतकेंच !

मात्र गडकऱ्यांचा मन:पिंड याच युगांत घडला असल्यामुळे त्याला पारतंत्र्याबद्दल तिटकारा होता. आणि स्वदेश, स्वबांधव, स्वभाषा, गतेतिहास आणि जुनें वाङ्मय व ते निर्माण करणारे संतमहंत यांचा अभिमान होता. गडकऱ्यांच्या साहित्यांत निव्वळ कलाविलास नाही. त्यांत भावनांची खळबळ आहे, रसांची उत्कटता आहे आणि अभिमानाचा पीळ आहे. त्यांत उच्च विचारसरणी आणि उदात्त ध्येयवाद आहे. म्हणूनच तें जसें तोलांत तसेंच मोलांत भारी आहे;—

अपर सिंधुच्या भव्य बांधवा ! महाराष्ट्रदेशा !
सह्याद्रीच्या सख्या ! जिवलगा ! महाराष्ट्रदेशा !
चित्पावन बुद्धीने करिसी तूं कर्तबगारी
देशस्थांच्या खुल्या दिलाची तुजला दिलदारी
कायस्थांचें इमान फिरवी रक्ताचा फेर
ठाक मराठी मनगट दावी तुझें हाडपेर

या सावेश वाणींत त्यांचा अभिमान ओसंडत आहे. त्यांची 'सत्सुमदाम' ही कविता मोरोपंतांच्या सन्मणिमालेपासून उत्स्फूर्त झाली आहे. तिच्यांत आणि 'पुत्रशोकांत' गडकऱ्यांचा वाङ्मयाभिमान व्यक्त झाला आहे. फेब्रुवारी १९४४ च्या 'समीक्षका'च्या गडकरी अंकांत 'मराठी भाषेचा विश्वविद्यालयांत प्रवेश' हें गडकऱ्यांचें अप्रकाशित पत्र प्रसिद्ध झालें आहे. त्यांतहि त्यांच्या वाङ्मयाभिमानाचें प्रतिबिंब पडलें आहे.

गडकरी अहंकारी होते असा एक प्रवाद आहे. आपल्या समसामयिकांना ते तुच्छ लेखीत अशा कथाहि प्रचलित आहेत. चित्रशाळेने प्रकाशित केलेल्या 'काव्यचर्चा' या ग्रंथांत गडकऱ्यांनी रेंदाळकरांची अवहेलना कशी केली ही कथा अनंततनयांनी सांगितली आहे. परंतु गडकऱ्यांच्या काव्यांत केशवसुत, कोल्हटकर, देवल, केळकर, बालकवि, चि. द्वा. देशमुख इत्यादिकांसंबंधी जो प्रेमादर प्रकट झाला आहे, त्यावरून या कथांत तथ्य नसावें असें वाटतें. 'पुत्रशोक' ही कविता गडकऱ्यांनी बालकवींच्या निधनावर श्रीमहाराष्ट्र शारदेचा विलाप म्हणून लिहिली असावी असा माझा समज आहे. कारण—

'पडुनि आकाशींच्याच कुऱ्हाडीचा ।
घाव दैवाच्या सबळ तांतडीचा
वंशतरुचा रोपटा कोवळाच ।
तोहि एकुलता तुटे आज साच
हिरा जीवींच्या जिवाचाच माझा ।
गगननगरा जातसे बाळराजा'

या दिंडयांतील शेवटच्या चरणांतला 'बालराजा' हा उल्लेख बालकवि ठोंबऱ्यांना उद्देशून असावा अशी माझी भावना आहे. गडकऱ्यांचा विनम्रभाव 'फूल ना फुलाची पाकळी' व 'परमाणूंचें कार्यमाहात्म्य' यांत प्रकटला आहे.

निज कवनांचें मसिलेखन हें, पुसुनि न जावो क्षुद्र तरी.
गोविंदाग्रज यास्तव त्यावरि वाळूचे कण हे पसरी

असे विनयाचे उद्गार त्यांनी यांपैकी पहिल्या कवितेंत काढले असून दुसऱ्या कवितेंत आपल्या निंदकांची पुढील शब्दांत समजूत काढली आहे.—

'दूषण वगळुनि भूषणमात्रें प्रभुपूजन करि काळ असें
तुम्हीं आम्हीं कष्टी होणें हा कुठला मग न्याय असे ?'

मागें 'समीक्षकां'तील एका पत्राचा उल्लेख आहे. त्यांतहि हाच विचार 'भल्याबुऱ्याचा भेद करण्यास काळ समर्थ आहेच' या शब्दांत व्यक्त झाला आहे.

गडकऱ्यांचा देवाधर्मावर विश्वास होता हें पूर्वी आलेंच आहे. 'विराम चिन्हें', 'एकाद्याचें नशीब', 'पुनर्विकसन', 'ती कोण ?' इत्यादि त्यांच्या भावमधुर कवितांचे शेवट देवाच्या स्मरणांत झाले असून 'ईशस्तवन', 'जगाचें गाणें', 'अनामिकाचे अभंग' 'सगुण स्वरूप' इत्यादि गीतांत तर प्रेमळ परमेश्वराची उघड उघड आर्त आळवणी आहे. गडकरी जात्याच परंपराप्रिय होते. जुन्यांतलें जें चांगलें असेल तें तोडण्याकडे त्यांची प्रवृत्ति नव्हती. वाग्वैजयंतीची 'अर्पण पत्रिका', 'वाचकांस विज्ञापन', 'ईशस्तवन' कवितेंतील शेवटच्या चरणांतला स्वत:चा नामनिर्देश इत्यादि प्रकार त्यांची

जुनी आवड उघड करतात. केशवसुतांचें त्यांनी पत्करलेलें चेलेपण हा त्याच जुन्या परंपरेचा एक अंश आहे. वास्तविक त्यांची व केशवसुतांची ओळखदेखहि नव्हती. परंतु प्राचीन कवि ज्याप्रमाणे आपली गुरुपरंपरा देतात, त्याप्रमाणे गडकऱ्यांनी केशवसुतांना गुरु ठरविलें आहे. तसें पाहूं गेलें तर केशवसुतांच्या व त्यांच्या कवितांत काडीचेंहि साम्य नाही. त्या दोघांच्याहि मनोरचना अगदी स्वतंत्र होत्या. गोविंदाग्रज परंपराप्रिय होते तर केशवसुत निर्बंध मानणारे नव्हते. गोविंदाग्रजांची ईश्वराच्या अस्तित्वावर श्रद्धा होती, तर केशवसुत स्वतःला अज्ञेयवादी समजत. गोविंदाग्रज कलेचे उपासक होते तर केशवसुत निसर्गाचे पूजक होते. दोघांच्याहि कविताकृती हृद्य व आस्वाद्य आहेत. परंतु एकाची कृति उद्यानलतेसारखी व्यवस्थित आहे तर दुसऱ्याची कृति वनलतेप्रमाणे स्वैच्छ आहे. गोविंदाग्रजांच्या वाणींत चातुर्य आणि चारुता आहेत तर केशवसुतांची वाणी अटरट आहे. परंतु एक टूम म्हणून गोविंदाग्रजांनी केशवसुतांच्या संप्रदायाची संस्थापना केली आणि 'तुतारी मंडळ' या नांवाचा मठ स्थापन केला. या मंडळाशीं रेव्हरंड टिळकांचा अर्थाअर्थी कांही संबंध नव्हता हें त्यांनी मे १९१८ च्या मनोरंजनांत बालकवींचा जो मृत्युलेख लिहिला आहे त्यावरून स्पष्ट होईल. परंतु अनेक नामवंत टीकाकार त्याकडे दुर्लक्ष करून टिळकांचाहि त्यांत अंतर्भाव करीत असतात. या मंडळाचे गोविंदाग्रज, बालकवि, भालचंद्र, त्र्यं. सी. कारखानीस व कीर्तने हे सदस्य होते. या मंडळानें प्रत्यक्ष असें कोणतेंहि कार्य केलें नाही. कारण त्याचा जन्मच मुळी केवळ एक टूम म्हणून झाला होता !

४

गडकऱ्यांच्या भावनांची आविष्कृति जशी बळकट व रसोत्कट आहे, तशीच त्यांच्या कल्पनांची सजावट उत्कृष्ट व आकर्षक आहे. कांही रसिक भावनांना स्वाभाविक व कल्पनांना कृत्रिम समजतात आणि कलेची हेटाळणी करतात. परंतु त्यांना हें कळत नाही की भावना या जशा हृदयांतून उगम पावतात, तशाच कल्पना बुद्धींतून उद्भवतात. त्या दोन्ही स्वाभाविक आहेत. आणि त्यांचीं उगमस्थळें भिन्न असलीं, तरी त्या परस्परांना पोषक आहेत. गोविंदाग्रजांची 'राजहंस माझा निजला' हीच कविता घ्या. याच कवितेसारखी 'माझें तान्हें बाळ' ही कवि मणी यांची कविता मे १८९७च्या काव्यरत्नावलींत प्रसिद्ध झालेली आहे. या कवितेवर टीप आहे—'या कवितेंत एका विधवेचा पुत्रशोक वर्णिला आहे. या स्त्रीचा पति नष्ट झाल्यावर लवकरच कांही दिवसांनी तिचा भावी आशांकुर जें तान्हें बाळ तेंहि नाहीसें झालें. त्यावेळचा हा भयानक देखावा आहे' या कवितेंत पुढील दिंडी आहे—

'बाळ गेलें टाकून कसें माझें
दिसत होतें तें फूल किती ताजें
दिसे दृष्टीच्या पुढे चित्र बाळ
शून्य झालें हा अदय किती काळ'

कदाचित् गोविंदाग्रजांनी ही कविता वाचलीहि असेल. कारण तेहि काव्यरत्नावलीचे एक कवि होते. 'सत्सुमदाम', 'घरांत वसलेल्या काजव्यास', 'स्मशानातलें गाणें' इत्यादि त्यांच्या कविता काव्यरत्नावलींतच प्रसिद्ध झाल्या होत्या. शिवाय वरील टीपेंतील कल्पनाच 'राजहंस माझा निजला' या करुणरम्यगीताच्या टीपेंत असून, वरील दिंडींतील दुसऱ्या व तिसऱ्या चरणांत ज्या कल्पना आहेत, त्याच 'राजहंसा'त थोडचा फार फरकाने आल्या आहेत. मणींच्या कवितेंत कलेची सुंदरता नाही आणि भावनेची उत्कटता नाही. कवितेंतील हाच प्रसंग गोविंदाग्रजांसारख्या प्रतिभासंपन्न कवीच्या हातीं लागतांच तिचें सुवर्णांत रूपांतर होण्याची अद्भुत किमया घडून आली आहे. 'राजहंसा'च्या आरंभीं दुर्दैवी विधवा माता व तिचा एकुलता एक मृत पुत्र यांचें भावमधुर व कल्पनारुचिर चित्रमय वर्णन आहे. आणि शेवट सत्याचा आभास निर्माण व्हावा अशा रीतीने नाटचपूर्ण केला आहे—

'मग मातापुत्रावरि त्या
तरु गाळिति कोमल पानें
ढाळिती लता निज सुमनें
पशुपक्षिहि रडती गानें
दशदिशा दगडही कढतीं
मन दुभंगुनी शोकातें'

यांतील 'गाळणें' 'ढाळणें' 'कढणें' इत्यादि क्रियापदांनी करुणारसाबरोबरच अदभुत रस निर्माण झाला आहे. आणि

'दुमदुमतें स्थळ तें अजुनी
या एकाच करुणागानीं
जा जाउनि ऐका कानीं'

या कलात्मक शैलीने जणूं सत्य प्रसंगच घडला असावा असा आभास निर्माण केला आहे. राजहंसांतील शोकाच्या भावनेला जर कल्पनांची जोड नसती तर तें करुणरम्य गीत महाराष्ट्रांतील घरोघर पसरलेंच नसतें! कांही टीकाकार या गीतावर अवास्तवतेचा आरोप करीत असतात. मृत अपत्य समक्ष मांडीवर असतांना 'या माझ्या मानससरसीं सारखें प्रेमजल वाही' किंवा

'नयनांच्या शिपामधुनी
अश्रूंचे मौक्तिक सुमणी
मी दिलें तया काढोनी'

अशा तऱ्हेचा कल्पनापूर्ण विलाप माता करणें शक्य नाही असें ते म्हणतात. परंतु ते व्यवहारांतील प्रत्यक्ष शोक व कलाकृतींतील अप्रत्यक्ष शोक यांतील भेद लक्षांत घेत नाहीत. व्यावहारिक शोकापासून शोकच होतो. परंतु कलाकृतींतील शोकापासून आनंद होतो हें सत्य त्यांनी या बाबतींत लक्षांत घेणें आवश्यक आहे. गोविंदाग्रजांचा हेतु रसिकांना दुःख देण्याचा नसून आनंद देण्याचा आहे याकडे दुर्लक्ष करून कसें चालेल? कित्येकदा दत्तांच्या 'निज नीज माझ्या बाळा' या करुणवत्सल गीताची व 'राजहंसा'ची तुलना करण्यांत येते. तीहि गैरवाजवी आहे. कारण दत्तांच्या गाण्यांत केवळ भावना आहे. तिला कल्पनेची जोड नाही. आणि त्यामुळेच तींत त्याच त्या भावनेची पुनरावृत्ति झाली आहे. आणि तिचें अस्तित्व क्षणिक असल्यामुळे ती ओसरतांच गीत संपुष्टांत आलें आहे. 'राजहंसां'त विरल भावना कल्पनेने सांद्र झाली आहे. आणि म्हणूनच करुणरसाचा उत्कर्ष झाला आहे.

केशवसुतांच्या 'माझा अंत' या कवितेंत 'स्त्री-सौंदर्याच्या अचानक दर्शनाने मनावर होणारा परिणाम' वर्णिला असून, तिच्यांत

'वृक्षावरी वीज जधीं पडावी,
त्याच्या स्थितींतचि तिची महती पहावी'

अशी एक कल्पना आहे. गोविंदाग्रजांच्या 'प्रेम आणि मरण' या कवितेंत हीच कल्पना आहे. पण ती त्यांनी कलात्मक विस्ताराने अधिक हृदयंगम केली आहे. त्यामुळे रतिभावना पुष्ट झाली आहे. या कवितेंत आरंभीं वृक्षावर चेतनारोप केला आहे, पुढे विजेच्या दर्शनाने तो कसा दिङ्मूढ होतो याचें वर्णन आहे, नंतर त्याचें तपाचरण सांगितलें आहे, मग देव त्याची समजूत घालण्याचा प्रयत्न करतात असा प्रसंग आणला आहे. तो वाचतांना आपण जणूं पुराणच ऐकत आहोंत असा भास होतो. शेवटीं विजेचें व त्याचें मीलन दाखविलें असून, त्याचा अंत केला आहे. मधून मधून कवीने प्रेम आणि जीवन व मरण यांची मीमांसा केली आहे. त्यामुळे ही कविता रसिकांच्या आवडीची झाली आहे.

गोविंदाग्रजांच्या श्रेष्ठ कलात्मकतेची साक्ष देण्यास या दोन कविता पुरे आहेत. मणी आणि केशवसुत यांच्या कवितांत केवळ भावनाविष्कार आहे. परंतु गोविंदाग्रजांच्या कवितांत भावनांच्या आविष्काराबरोबरच कलेचा सुंदर आकार आहे. त्यामुळे त्या कविता डोळ्यांत वसतात आणि अंतःकरणांत ठसतात.

अगदी आरंभापासूनच गोविंदाग्रजांनी कलादृष्टि प्राप्त करून घेतली होती. भावाविष्कृति, अर्थालंकृति व शब्दचमत्कृति यांच्या बाबतींत त्यांची प्रतिभा अत्यंत चोखंदळ होती. मे १९०८ च्या काव्यरत्नावलींत 'सत्सुमदामां'तील आर्या प्रसिद्ध झाल्या तेव्हा साधुश्रेष्ठ तुलसीदासासंबंधी पुढील चरणार्ध होताः--

'प्रेमानंदें वंदन करितों मी साधु तुलसिदासाला'

हाच त्यांनी पुढे पुढीलप्रमाणे बदललाः--

'वंदन नंद-सुनंदकुंद-सुकलिकालि तुलसिदासाला'

आणि आपली कलादृष्टि व्यक्त केली. कलेच्या बहिरंगाची ही आवड गोविंदाग्रजांच्या अंगवळणींच पडली होती. याचें एक उत्तम उदाहरण त्यांच्या 'वेषभूषाकारास सादरार्पित पद्यभूषा' या गीतांत मिळतें. 'वेषभूषा' हें कल्पनाप्रचुर गोड गीत तात्यासाहेब केळकरांच्या लेखणींतून बाहेर पडलें असून अभिनव

अनुक्रमणिका

काव्य-मालेच्या पहिल्या भागांत अंतर्भूत झालेलें आहे. त्या गीतांत हृदयाचा ठाव घेईल असा रतिभाव मुळीच नाही, पण नवनव्या कल्पना इतक्या प्रचुर व रुचिर आहेत की त्या पुन्हा पुन्हा घोळल्या तरी त्यांच्यांतली माधुरी कमी होत नाही. त्यामुळे तें वाचून—

सुंदर रमणीवर्णनपर हें पद्य न मज भासे
मजसम वेडा भ्रमीं पडाया मग्नचि वाहे खासें ?

अशी गोविंदाग्रजांसारख्या कलाकवीची मनःस्थिति झाली आहे. कवितेचा आरंभ वाचकाची उत्कंठा जागृत होईल असा करावयाचा, शेवट नाट्यमय रीतीने साधावयाचा, मध्येच परिणामकारक संस्कृत अथवा हिंदी शब्दांचा प्रयोग करावयाचा, कवितेवर चुटपुटती टीप द्यावयाची, मथळा आकर्षक द्यावयाचा, मध्येच कुठे तरी सूचक भाग रिता सोडावयाचा इत्यादि किती तरी कलात्मक प्रकारांचा अवलंब गोविंदाग्रज करीत असत. याचें कारण मूलतःच त्यांना सौंदर्यदृष्टि होती. त्यांच्या साहित्याच्या लोकप्रियतेचें बरेंचसें श्रेय त्यांच्या या विशिष्ट दृष्टीकडे आहे.

५

गोविंदाग्रजांचें साहित्य सर्वथैव निर्दोष आहे असें नाही. त्यांत जे दोष उद्‌भवले आहेत ते त्यांच्या स्फूर्तीच्या उद्दाम आवेगामुळे. कातळाचा स्फोट होतांच त्याच्या खालील जिवंत जीवनाचा प्रचंड प्रवाह एकदम उसळी घेऊन चहूंकडे ओसंडून वाहूं लागतो, त्याला मर्यादा राहत नाहीत, तो अनिर्बंध व स्वच्छंद होतो. त्याचप्रमाणे गडकरी स्फूर्तीच्या उद्दंड ओघांत वाहत जातात. मग गडकरी गडकरी राहत नाहीत. ते स्वतःच स्फूर्ति बनतात. त्यामुळे त्यांच्या काव्यांत, नाटकांत आणि विनोदांत कित्येकदा औचित्याचा विवेक राहात नाही आणि कित्येकदा संयमाचा सारासार विचार दिसत नाही. ते स्त्रीला उद्देशून 'कम–अस्सल' अशी भाषा वापरतात आणि व्यक्तींचे स्वभाव रेखाटतांना त्यांत अतिरेक करतात. शब्दांच्या नादाला ते कित्येकदा इतके लुब्ध होतात की प्रेमाची साधना म्हणजे 'एक हठयोग' आहे या उदात्त कल्पनेच्या जोडीलाच ते 'तो एक रोग आहे' अशी हलकीफुलकी कल्पना बसवतात. कित्येकदा त्यांच्या कल्पनांत असंगति राहून जाते. Poetry is not a communication but a record अशी वॉल्टर द लामारच्या व्याख्येशीं:—

जें जें ज्या समयीं मनांत भरलें स्वच्छंद नाना स्थळीं
तें तें त्या समयीं जपून धरितां ही होय गंगाजळी'

ही कल्पना मांडतांना तें यमक साधावें म्हणून 'गंगाजळी आणतात. 'परंतु' गंगाजळी ही एकदम भरली जाते. ती थेंबें थेंबें भरत नाही हें ते विसरतात. मनुष्य 'सुखाच्या शिखरावर चढतो' आणि 'दुःखाच्या दरींत पडतो' हे नित्य कानांवर पडणारे वाक्प्रचार त्यांच्या लक्षांत राहात नाहीत आणि ते '**दुर्दैवनगाच्या शिखरीं नव विधवा दुःखी आई**' अशी ओळ गुणगुणतात.

' हृदयाचे ठोके पडती । अवकाश त्यांत जे उरती ।
करि मुरलिरवाची भरती । मग एकच धडकी सगळी'

या नवीन (original) कल्पनेप्रमाणेच 'तरु शिरीं मूळ उफराटें शून्यांत पराधें भरलीं' ही त्यांची जुनी कल्पना रमणीय आहे.. परंतु एका बीजाच्या पोटीं बीजांच्या कोटी कोटी आहेत हें ध्यानांत न राहिल्यानें ते 'एकांतच अनेकत्व' आहे या ऐवजीं 'शून्या'चा वेदान्त बोलूं लागतात.

रसोत्कर्ष साधण्यासाठी प्रमाणबद्धता पाहिजे तिकडेहि कित्येकदा गडकऱ्यांचें दुर्लक्ष्य होतें. त्यांना कित्येकदा शब्दांवरून कल्पना सुचतात व कित्येकदा कल्पनांवरून शब्द स्फुरतात. त्यामुळे त्यांच्या कांही कविता भलत्याच लांबल्या असून त्यांत कृत्रिमता उत्पन्न झाली आहे, आणि फापटपसारा वाढला आहे. त्यांच्या 'चिमुकलीच कविता,' 'प्रेमपाठ', 'अरुण,' 'हृदयशारदेस' इत्यादि कविता या विधानाची साक्ष देतील. मागे एका समीक्षकाने त्यांच्या 'प्रेमपाठा'स मोहर्रमांतील फुटक्या ताबुतांची उपमा दिली होती. कदाचित् 'प्रेमपाठा'मधील कल्पनांचा डोलारा पाहून त्याला मोहर्रमांतील डोल्यांची आठवण झाली असावी. पुढे पुढे खुद्द गडकऱ्यांनाहि अशा कवितांचा वीट आला असावा असें वाटतें. कारण शेवटीं शेवटीं त्यांच्या कविता आटोपसर होत गेल्या असून त्यांत संयत भावना, उचित कल्पना आणि सहज रचना यांचा मोठा मनोहर मिलाफ झाला आहे. आपल्या 'हृदयशारदेस' या कवितेंत त्यांनी कल्प-

नालंकृति आणि शब्दचमत्कृति यांचा आलेला उबग व्यक्त करतांना असे उद्‌गार काढले आहेत की,

'नव शब्दांचे घुंगुर बांधुनि रसवंती माझी,
नाचत डोलत करि शिणलेलीं मनें पुन्हा ताजीं;
शब्दांचा बाजार बदलता; जीवाची वेठ
नको नको हें; उघड आपुल्या प्रेमाची पेठ
चुकला चुकला जीव आजवर तुजवांचुनि फिरतां,
हृदयशारदे ! शब्दशारदा नको मला आता !'

तेव्हा गोविंदाग्रजांनी कल्पना व शब्द यांच्या मोहामधून आपल्या प्रतिभेला खेचून भावनेकडे वळवलें हें योग्यच झालें. नाही तर 'कल्पना व शब्द यांच्या आहारीं' जाऊन 'दसऱ्यां'त जशा

'तुमच्यापुरती ही घी-शक्कर
टाकुनि, रूढीशीं द्या टक्कर !
युद्ध माजवा रे घनचक्कर'

अशा हास्यास्पद ओळी पडल्या आहेत, तसाच प्रकार झाला असता.

६

साहित्यिक गडकऱ्यांच्या त्रिविध भूमिकेचा विचार करतांना ते प्रथम कवि, नंतर नाटककार व शेवटीं विनोदी लेखक होते हें सूक्ष्म दृष्टीच्या आलोचकाच्या लक्षांत आल्याखेरीज राहात नाही. कवि आणि नाटककार यांच्या भूमिकांत महत्त्वाचा भेद आहे. तो असा की, कवि स्वतःच्या सुखदुःखमिश्रित भावनांना मुखरित करीत असतो, त्याची दृष्टि व्यक्तिगत असते; तर नाटककार अलिप्त राहून इतरेजनांच्या सुखदुःखात्मक भावनांना वाचा फोडीत असतो. त्याची दृष्टि व्यापक असते. कवि स्वच्छंद असतो. उलट नाटककार निर्बंध पाळत असतो. कवीच्या कवित्वाची उंची ठराविक मर्यादांच्या उल्लंघनावरून अजमावली जाते, तर संयम हा नाटककाराचा महान गुण मानला जातो. 'काव्येषु नाटकं रम्यम्' या प्राचीन वचनाच्या अनुरोधाने विचार केला, तर नाटक काव्यांत अंतर्भूत होतें. कालिदास व भवभूति हे जसे कवि तसेच नाटककारहि होते. आणि त्यांच्या नाटकांना काव्य हीच संज्ञा आहे. शेक्सपिअरच्या नाटकांचाहि काव्यांतच समावेश होतो, आणि त्यालाहि एक प्रतिभासंपन्न श्रेष्ठ कवि म्हणून गौरविण्यांत येतें. गडकऱ्यांची भूमिका या उपरिनिर्दिष्ट कर्त्रींसारखीच आहे. वाग्वैजयंती हा त्यांचा पद्यबद्ध काव्यसंग्रह आहे, तर प्रेमसंन्यास, पुण्यप्रभाव, एकच प्याला, भावबंधन व राजसंन्यास हीं त्यांचीं गद्यकाव्यें आहेत. त्यांत नाट्यापेक्षा काव्यालाच अवसर अधिक आहे. आणि त्यांतील जयंत, वृंदावन, सुधाकर आणि घनश्याम हीं पात्रें तर जणूं गडकऱ्यांचेंच मनोगत गद्यकाव्यांत बोलत आहेत असा भास होतो. हीं पात्रें एकदा का काव्य बोलूं लागलीं म्हणजे मग त्यांना वेळेचें व प्रसंगाचें भान राहत नाही. तासन्‌तास त्यांचें स्वगत काव्य चालूंच राहतें. कारण गडकरी सर्वसामान्य अनुभूतीपेक्षा स्वतःचा वैयक्तिक अनुभव आपल्या नाटकाच्या द्वारें व्यक्त करतात. आणि कित्येकदा नाटकाच्या उद्दिष्टाकडेहि त्यांचें लक्ष राहात नाही. त्याबद्दल ते एकाद्या आनुषंगिक विचाराला भलते महत्त्व देतात. एकच प्याल्यांतले मद्यपानाच्या दुष्परिणामांपेक्षा सिंधूच्या पतिपरायणतेलाच विशेष प्राधान्य देतात. तेव्हा राम गणेश गडकरी हे अगोदरच गोविंदाग्रज कवि होते आणि मागाहून नाटककार गडकरी होते असें जर विधान केलें तर तें चूक ठरूं नये. ते नाटकाकडे वळले तें विशिष्ट परिस्थितीमुळे, हा इतिहासहि या बाबतींत लक्षांत घेतला पाहिजे. ते किर्लोस्कर कंपनींत जर मास्तर म्हणून राहिले नसते आणि नाट्यलेखनावर स्वतंत्र चरितार्थ चालूं शकतो हें जर त्यांच्या ध्यानांत आलें नसतें, तर ते केवळ कवि म्हणूनच प्रसिद्धि पावले असते.

गडकऱ्यांच्या साहित्यांत शृंगार, करुण, हास्य व वात्सल्य या रसांचा परमावधि आहे. त्यांच्या कवितांत व नाटकांत विनोद आहेच. परंतु त्या व्यतिरिक्त रिकामपणाची कामगिरी या पुस्तकांत त्यांनी स्वतंत्र विनोदी लेखन केलें आहे. गडकऱ्यांचा विनोद मुख्यतः कल्पनाप्रचुर व शाब्दिक आहे. अत्युक्ति हा त्याचा आधार आहे. त्यांत प्रासंगिक व स्वाभाविक असा भाग थोडा आहे. भावबंधनांतील धुंडिराजाच्या व्यक्तिरेखेंतच काय ती त्यांच्या विनोदाची सहजता दृष्टीस पडते. याचें कारण गडकरी स्वभावतःच गंभीर होते. त्यांच्या

एकंदर कष्टमय जीविताचा विचार केला, तर असें दिसतें की, वरवर हसणाऱ्या परंतु खोल तळाशीं शांत व गंभीर असणाऱ्या समुद्राशीं त्यांच्या मनःस्थितीचें सादृश्य होतें. त्यांच्या नाटकांतील लीला व जयंत; वृंदावन, कालिंदी व वसुंधरा; सिंधु, सुधाकर आणि मालती व घनश्याम हीं गंभीर पात्रें प्रेक्षकांच्या मनाची जशी पकड घेतात तशीं गोकुळ; कंकण, किंकिणी, नूपुर; तळीराम आणि महेश्वर हीं विनोदी पात्रें घेत नाहीत. नाटकें पाहून झाल्यावर प्रेक्षकांच्या मनावर गांभीर्याचा ठसा उमटतो. या चाऱ्ही नाटकांतील शेवटचे प्रसंग पाहून प्रेक्षक भारावलेल्या मनःस्थितींत रंगमंदिराच्या बाहेर पडतात. मंदिराच्या आंतील हास्याचे कल्लोळ तेथल्या तेथेच क्षणार्धांत विरून जातात. याचें कारण असें की, करुणाला आवश्यक असणारा शोक हा स्थायीभाव गडकऱ्यांच्या अंतःकरणांत जशी वैठक मारून बसलेला होता, तसा हास्याला अनुकूल असणारा हास (हर्ष) हा स्थायीभाव त्यांच्या ठिकाणीं बळकट नव्हता. आणि म्हणूनच त्यांना आधी कवि, मग नाटककार व अखेरीस विनोदी लेखक म्हणणें समुचित ठरेल. ते जर खरोखर हास्यप्रिय असते तर त्यांना असा अकालीं मृत्यु आला नसता. चिंता, विवंचना व व्याधी यांनी त्यांना ग्रासलें होतें. इतकें की ते सुखापेक्षा दुःखालाच अधिक मानीत. आणि म्हणत,—

यापरि जगतीं सुखदुःखाचें खरें मर्म ना कळे कुणा।
रुचे मला तर दुःख सुखाहुनि; वेडा वाटे तरी म्हणा!

७

गोविंदाग्रजांच्या 'वाग्वैजयंती' या कवितासंग्रहांत एकूण १४७ कविता आहेत. आणि फेब्रुवारी १९४४ च्या 'समीक्षका'च्या गडकरी अंकांत एकूण १३ कविता आहेत. या दोन्ही संग्रहांतील बऱ्याच कविता अपूर्ण आहेत. 'वाग्वैजयंतीं'त नाटकांतील पदांचाहि समावेश आहे. अर्थात त्या सर्वांचा विचार येथे आवश्यक नाही. गोविंदाग्रजांच्या एकंदर काव्याचें आलोडन केल्यास त्यांत त्यांच्या भिन्न भिन्न अशा चार वृत्ति ठळकपणें दृष्टीस पडतात. कांही कविता केवळ काल्पनिक आहेत. पण त्यांत त्यांच्या तरल कल्पनेचें दर्शन होतें. एका तरुणीस आपल्या बालकाचें चुंबन घेतांना पाहून त्यांना अशी कल्पना सुचते की ती चारचौघांसमोर आपल्या पतीचें चुंबन घेऊं शकत नाही. तेव्हा ही त्या पतीची बालप्रतिमा करून ती सर्वांदेखत तिचें चुंबन घेत आहे.* एका सार्वजनिक समारंभांत एका थोर गृहस्थाबरोबर आलेल्या त्यांच्या उपवर कन्येच्या कंठांतहि इतरांप्रमाणे सहजगत्या व्यवस्थापक पुष्पहार घालतात. त्या वेळच्या तिच्या मुग्ध वृत्तीस पाहून गोविंदाग्रज म्हणतात की, "बाले! तूं लोकांदेखत लाजतेस यांत विशेष कांही नाही. परंतु पुष्पवती बाला एकांतांतहि सलज्ज असते." येथे 'पुष्पवती' या शब्दावर शृंगारसूचक श्लेष आहे. गोविंदाग्रजांच्या या प्रकारच्या कल्पनाप्रचुर कवितांत मुग्ध शृंगार आहे. 'सांग कसे बसलों' व 'काय करावें?' या कवितांत देखील सूचक हास्य व सूचक शृंगार आहे. परंतु 'तोंडाळ बायको येतां कडकडून काय करावें?' तर तिच्या तोंडाला तोंड न देतां म्हणजे तिला प्रत्युत्तर न देता कडकडून भेटावें, वा तोंडास तोंड द्यावें आणि त्यास गोड मिठी पडेल असें करावें, असा सूचक ध्वनि त्यांत आहे, तो खरोखरच काव्यमय आहे. कांही सोवळे टीकाकार या कवितांना अश्लील म्हणून हेटाळीत असतात. अश्लील म्हणजे असुंदर! असें असुंदर या कवितांत काय आहे? यांतला शृंगार सुद्धा केवळ ध्वनित आहे. आणि काव्यांत ध्वन्यर्थाला विशेष मान व महत्त्व आहे. तेव्हा या कवितांवरील टीका अनुदार व अप्र-

---

* या कल्पनेशीं समानार्थक हिंदी व इंग्रजी उक्ती पहा; —

बिहँसि बुलाय बिजोकि उत, प्रौढतिया रस घूमि
पुलकि पसीजति पूतको, पिय चूम्यो मुख चूमि
—बिहारी

आपल्याशीं विवाहबद्ध न होणाऱ्या मेरी चावर्थ या प्रेयसीच्या अपत्याचें चुंबन घेतल्यावर बायरन् म्हणतो,—

When late I saw thy favourite child
I thought my jealous heart would break
But when the unconscious infant smiled
I kissed it for its mother's sake.

अनुक्रमणिका

योजक आहे असेंच म्हणावें लागेल. अशा प्रकारच्या कवितांत गोविंदाग्रजांची वृत्ति कल्पनाकलित आहे. मागे एकदा त्यांच्या 'हृदयशारदेस' 'चिमुकलीच कविता', 'प्रेमपाठ', 'अरुण' इत्यादि कल्पनाप्रचुर कवितांचा निर्देश आला आहे. त्या सदोष कशा आहेत हेंहि आपण पाहिलें आहे. परंतु निर्दोष म्हणून या प्रकारच्या दोन आणखी सुंदर कविता उल्लेखनीय आहेत. 'एक गुलाबी कोडें' व दुसरी 'हलत्या पिंपळपानास'. 'गुलाबी कोडें' ही कविता केवळ कल्पनारम्य आहे. त्यांत केशवसुतांच्या 'प्रत'मधील किंवा तांब्यांच्या 'कुणि कोडें माझें उकलिल कां ?' मधील सहसंवेदनेचें माधुर्य नाही. परंतु 'हलत्या पिंपळपानास'मध्ये मात्र भावमाधुर्य व कल्पना-सौंदर्य या दोघांचाहि संगम आहे. राहत्या घरासमोरील 'पिंपळाच्या हालत्या पानाला' पाहून कवीला पुढील भव्य कल्पना स्फुरते—

> 'तुजभवती जी ही सृष्टि असे पानांची
> कल्पना असे कां तिला तुझ्या नाचाची ?
> रस एकच तरुचा तुम्हांमधुनी वाही—
> सुखदुःखभाव ही जोडि तुम्हां की नाही ?
> विश्वेंच्या विश्वें सारीं यापरी
> स्थलि भिन्न, भिन्न आकारीं, भूवरी
> नांदती गड्या ! कांतारीं किति तरी !
> जाणीव तुम्हांला परस्परांची का रे
> जीवैक्य असे की, भिन्न भिन्न जग सारें ?'

त्याचप्रमाणे कवीला भावसंवेदन होतें. तें शब्दांत साकार करतांना तो उद्गारतो—

> 'मम करीं कपाळीं दुर्दैवाच्या रेषा
> मजसाठिं लिहिति चिरदुःखभोग हा पेशा !
> परि असति तुझ्या तर रेषा साऱ्या अंगीं,
> दुःखही असे कां तितुकें त्यांच्या संगीं ?'

'प्रेमाचा प्रळयकाळ,' 'कलगीचें गाणें' व 'मुरली' या कवितांत गोविंदाग्रजांची वृत्ति गूढवादी आहे. त्यांत त्यांच्या शांतिमय अनभूतींचें वर्णन आहे. मुरली ही कविता सप्टेंबर १९१२ च्या मनोरंजनांत आली होती. त्या अंकांत टीपेंतील पुढील शब्द ठळक ठशांत छापलेले आहेत. "मनुष्याच्या आयुष्यांत असा एक काळ एकदा तरी येतोच की ज्या वेळीं ईश्वराचें अस्तित्व **भावपूर्ण हृदयाला पटतें** आणि तेव्हा मात्र, **बुद्धिप्रधान मस्तकाचें समाधान** करण्यासाठी तळमळणारा जीवात्मा ईश्वरी साक्षात्काराची—प्रत्युत्तराची—याचना करीत असतो." यावरून गोविंदाग्रजांच्या आध्यात्मिक वृत्तीची कल्पना येईल. त्यांची 'घुबडास' ही कविता आध्यात्मिक नाही. तिच्यांतील निरनिराळ्या भयदायक कल्पनांमुळे आणि रात्रीच्या हुबेहूब वातावरणामुळे ती रौद्ररम्य झाली आहे. 'फुटकी तपेली' हें अद्वैतवादा-वरील एक सविस्तर रूपक आहे. 'काळ', 'सुखदुःख', 'विचार' इत्यादि कवितांत गोविंदाग्रजांची तात्त्विक वृत्ति व्यक्त झाली आहे. या कवितांतील तत्त्वज्ञान जुनेंच आहे. परंतु कल्पना व शब्द यांच्या साहाय्याने गोविंदाग्रजांनी त्यांतच चमत्कृति निर्माण केली आहे.

'चिंतातुर जंतु,' 'आंधळयांची माळ,' 'रांगोळी पाहून,' 'हुकमे हुकूम' 'विहिणींचा कलकलाट,' 'कवितेसाठी धडपड,' 'लांडोर' आदि कवितांत गोविंदाग्रजांतला टीकाकार अवतीर्ण झाला आहे. 'चिंतातुर जंतू'त उपयुक्तावादी अर्थशास्त्रज्ञांवर औपरोधिक ताशेरा आहे. 'आंधळयांच्या माळें'त गतानुगतिकांना चिमटे काढले आहेत आणि 'लांडोरी'त भ्रष्ट अनुकरण करणारांचा उपहास आहे. 'विहिणींच्या कलकलाटां'त शुद्ध, साधा आणि सरळ विनोद आहे. 'हुकमेहुकूम' आणि 'कवितेसाठी धडपड' यांत वाङ्मयाच्या प्रांतांत धुमाकूळ घालणाऱ्या संपादक, कवि, शिक्षणखातें इत्या-दिकांवर गमतीची टीका आहे. झाडावरील पक्ष्यावर कविता लिहावी म्हणून कवि त्या पक्ष्याला गाण्याची विनंती करतो. त्याने गाणें म्हणावें म्हणून त्याला निर-निराळीं आमिषें दाखवितो. त्यांत एक आमिष असें आहेः—

> 'गाण्याची या तुझ्या शिफारस करूं अशी भरपूर
> की, शाळाखातेंही वेड्या करील तें मंजूर'

गोविंदाग्रजांच्या मिस्किल विनोदाचा हा एक मासला आहे. व्यंगदर्शनासाठी विनोदासारखें अचूक शस्त्र नाहीं याची त्यांना पूर्ण जाणीव होती. 'रांगोळी' पाहून मधील त्यांचा विनोद निर्मळ व निकोप आहे. केशव-

सुतांच्या 'रांगोळी' या कवितेचें तें यशस्वी विडंबन आहे. गोविंदाग्रजांचे शिष्य केशवकुमार अत्रे हे आधुनिक कवितेच्या इतिहासांत आद्य विडंबक कवि म्हणून ओळखले जातात. परंतु त्याचा आरंभ गोविंदाग्रजांनीच नेणतेपणानें केला होता.

गोविंदाग्रज वृत्तीनें गंभीर खरे. त्यांचें व्यक्तिगत जीवनहि दुःखांनी आणि कष्टांनी भरलेलें. परंतु त्याचा कांही काळ विसर पडावा व विरंगुळा वाटावा म्हणून ते विनोदाकडे वळत. आणि प्रतिभेच्या बळानें गंभीर कवितांप्रमाणेंच विनोदी कविताहि यशस्वितेनें लिहीत. एका टीकाकारानें शेक्सपिअरसंबंधी जे उद्‌गार काढले आहेत, ते गोविंदाग्रजांनाहि तंतोतंत लागूं पडतात. तो म्हणतो, 'He was equally great in comic and serious verse. It is usually those who see the comic side of life that can best understand and express its serious and tender side.

८

अशा प्रकारें गोविंदाग्रजांच्या कवितांत विषयांची विविधता भरपूर आहे. पण ज्यांत भावविवश गोविंदाग्रजांच्या उत्कट वृत्तीचें दर्शन होतें त्या कविता वेगळ्याच आहेत. त्या कविता सहजगत्या उत्स्फूर्त झालेल्या असल्यामुळे गेय आहेत. भावात्मक गीतिकाव्याचा उद्रेक सदैव स्वरांतच होत असतो. कारण स्वरांचे चढ आणि उतर, द्रुत आणि विलंबित गति व आघात आणि निराघात यांनीच भाषेच्या अंत गुप्त असलेला भाव सजीव होत असतो. गीतिकाव्यांत व्यक्तिगत विचारांचा, आशानिराशांचा आणि इच्छाआकांक्षांचा भावोन्मादक प्रवाह अव्याहत वाहत असतो. तो प्रचंड प्रवाह पावसाळ्यांतील नदीच्या वेगाप्रमाणे खळाळत असतो. त्यांत तीव्र विचार असतात, मनःकामनेचे प्रखर रंग असतात आणि वासनेचा दर्प असतो. असल्या गीतांत बहुधा प्रणयाचें स्पष्ट प्रस्फुटन असतें. कारण तीं तारुण्यांत स्फुरत असतात. आणि गोविंदाग्रजांनाहि हीं सारीं प्रणयगीतें, स्त्रीच्या सहवासाची विशेष ओढ असते त्या तरुणवयांतच स्फुरलीं आहेत. फेब्रुवारी १९१९ च्या मनोरंजनांत गडकऱ्यांचे परममित्र विठ्ठल सीताराम गुर्जर यांचा 'अकाल सूर्यास्त' हा गडकऱ्यांवरील मृत्युलेख आहे. त्यांत ते सांगतात की 'बायरन् हा गडकऱ्यांचा अत्यंत आवडता कवि असून वर्डस्वर्थ हा नावडता होता.' गडकऱ्यांनी 'प्रेमाची प्रामाणिकता' या आपल्या कवितेवर बायरन्च्या एका अवतरणाचें भाषांतर दिलें असून त्याला 'महाकवि' असें म्हटलें आहे. याच बायरन्नें The days of our youth are the days of our glory' म्हणजे 'यौवनाचे दिवसच गौरवाचे दिवस आहेत' असे उद्‌गार काढले आहेत. ते गोविंदाग्रजांच्या प्रणयपर भावगीतांना सहीन् सही लागतात.

गोविंदाग्रजांचीं हीं प्रणयगीतें अकारण कल्पनावडंबर आणि निरर्थक शब्दजाल यांपासून मुक्त आहेत. भावोत्कट कवीला स्वभावोक्तीचें आकर्षण असतें तें या प्रणयगीतांत दिसतें. यांतील कांही कल्पित आहेत आणि कांही वास्तव आहेत. फेब्रुवारी १९४४ च्या समीक्षकांतील 'गोविंदाग्रजांचें अप्रकाशित काव्य' या मथळ्याखालच्या टीपेंत अत्र्यांनी असें म्हटलें आहे की, "यानंतर आमच्या माहितीप्रमाणे गोविंदाग्रजांची एकच कविता अप्रकाशित आहे. ती द्वितीय पत्नीच्या 'पहिल्या भेटी'ला अनुलक्षून असल्यानें खाजगी स्वरूपाची आहे, म्हणून गडकऱ्यांच्या बंधूंनी ती प्रसिद्ध करण्यास संमति दिली नाही." पण मला असें वाटतें की, गोविंदाग्रजांच्या 'निर्वाणीची विनवणी,' 'एका शब्दासाठी विनंती,' 'निर्दय बालेस,' 'हृदयास,' 'गोफ' व 'शेवटचें प्रेमगीत,' हीं गीतेंहि खाजगी स्वरूपाचीं आहेत; कारण गोविंदाग्रजांनी आपल्या हयातींत तीं प्रसिद्ध केलीं नव्हतीं. यांत गोविंदाग्रजांचें वास्तविक मनोलेखन आहे. यांपैकी फक्त गोफ हें गीत कदाचित् उद्यानांत आलें असावें. परंतु त्यासंबंधी नक्की सांगतां येत नाही. कारण उद्यानाचीं बांधीव पुस्तकें माझ्या हाताशीं नाहीत. 'अंधाला दृष्टिलाभ,' 'मागे पाहणें,' 'अवेळीं ओरडणाऱ्या कोकिळेस,' 'पुनर्जात प्रेमास,' 'ती कोण ?,' 'पुनर्विकसन,' 'फुलें वेंचलीं पण,' 'हा क्षण,' 'कवी' आणि 'त्याच तारकेस' या गीतांतहि क्वचित् खाजगीपणा आहे

परंतु त्यांचें स्वरूप कल्पित प्रणयगीतांना जवळचें असल्यामुळें गोविंदाग्रजांनी त्यांना मनोरंजनांत प्रसिद्धि दिली होती. 'जुन्या कवितांची आठवण' आणि 'फणसाचें पान' या कवितांतील निरागस व अबोध प्रणय मात्र केवळ स्मरणालंकाराच्या स्वरूपाचा आहे !

गोविंदाग्रजांचीं हीं गीतें प्रणयपर असलीं तरी त्यांत एक निराळचाच प्रकारचा करुण शृंगार आहे. तीं बहुतेक निराशेनें व्यापलेलीं आहेत. आणि त्याला तसें बलवत्तर कारणहि आहे. वयाच्या आठव्या वर्षींच गडकऱ्यांच्या शिरावरील पित्याचें छत्र नाहीसें झालें. पुढे त्यांना चुलत्याच्या आश्रयास राहावें लागलें. कांही काळ गुजरातेंत, कांही काळ कर्जतला आणि कांही काळ पुण्याला त्यांना हेलपाटे करावे लागले. त्यांत त्यांच्या अभ्यासाची हेळसांड झाली आणि प्रकृतीचे हालहाल झाले. जगांत पुढे येण्यासाठी गडकऱ्यांना स्वतःच्या पायांवर उभे राहावें लागलें. तेव्हा अगदी लहान वयांतच त्यांना दिखाऊ, मतलबी आणि खोटचानाटचा जगाचा कडवट अनुभव आला—त्याचा विषादरम्य उद्रेक 'अल्लड प्रेमास' या त्यांच्या गीतांत झाला आहे. येथे 'प्रेम' हा शब्द त्यांनी व्यापक अर्थानें योजिला आहे. 'प्रेम' म्हणजे सर्वांसंबंधीं वाटणारी 'आपुलकी'. १९०९ सालीं मेच्या मनोरंजनांत प्रसिद्ध झालेली हीच त्यांची पहिली भावपूर्ण कविता. जगाचा त्यांना उद्वेग वाटतो, उबग येतो. तो या गीतांत कसा प्रभावी रीतीनें प्रकट झाला आहे तें पहा:—

क्षणभर वेडचा प्रेमा ! थांब
जग सगळें हें देखाव्याचें !
गुलाम केवळ रे स्वार्थाचें !
स्मशान की हें शुद्धत्वाचें !
शुद्ध भाबडें, सरळ रोकडें, अशांत करिशील काय ?
क्षणीं पांढरा क्षणींच काळा,
रंग आवडे असा जगाला
ठाव तयाचा कुणा न कळला,
खुळचा तुलाची, अशा जगाची कळेल कां कृति सांग ?
कोणी तुजला मानिल खोटें,
तिरस्कारही दिसेल कोठें,
अपमानाचें भयही मोठें,
बाग जगाची ही न फुलांची, कांटे जागोजाग !

गोविंदाग्रजांच्या कवितेवर जी उदासरम्य छाया आहे तिचें कारण आता सहज लक्षांत येईल. 'कळचांचीं फुलें कशीं झालीं ?' 'बागेंत बागडणाऱ्या बाळकास', 'चेंडू' इत्यादि त्यांचीं वत्सल गीतेंहि औदास्यापासून अलिप्त नाहीत. शेले हा गोविंदाग्रजांचा आवडता कवि होता. केशवसुतांना त्यांनी 'अवतरुनी फिरुनी शेले' असें म्हटलें आहे. तेव्हा शेलेप्रमाणेंच Our sweetest songs are those that tell of saddest thought अशी गोविंदाग्रजांची कल्पना असावी.

गडकऱ्यांच्या वैवाहिक जीवनाविषयी गुर्जर सांगतात की, "हिंदु कुटुंबांतील मामुली वहिवाटीला अनुसरून गडकऱ्यांचें पहिलें लग्न १९०५पूर्वीच झालें होतें" पुढे ते सांगतात की, 'याच वेळीं गडकऱ्यांच्या आयुष्याशीं अत्यंत निगडित अशी कांही अत्यंत खासगी स्वरूपाची गोष्ट घडून आली. तिने त्यांच्या जीवनक्रमाला अगदीच निराळें असें वळण दिलें. त्यांचें अभ्यासावरचें-फार काय साऱ्या संसारावरचें मन उडालें व त्यांनी कॉलेजचा नाद सोडला." या विषयासंबंधी अत्रे **राजहंसा**च्या प्रस्तावनेंत म्हणतात, "गडकऱ्यांचें लग्न त्यांच्या मनाविरुद्ध अगदी तरुण वयांतच झालें. ही मुलगी अशिक्षित असल्यानें गडकऱ्यांचें तिच्याशीं पटूं शकलें नाही. प्रेमसंन्यासमधील मनोरमेची कल्पना त्यांना आपल्या पहिल्या विवाहावरून सुचली असावी. पुढे ही त्यांची प्रथम पत्नी त्यांना सोडून गेली. त्यामुळे त्यांना फारच धक्का बसला. 'अवेळ तरिही बोल कोकिळे' या कवितेमधील 'हातीं संसाराची माती—निष्प्रेमाची शेज सोबती' या उल्लेखांत त्या कालखंडांतील त्यांच्या मनःस्थितीचें चित्र प्रकट झालें आहे. मृत्यूपूर्वी अवघीं दोन वर्षें आधी त्यांनी दुसरें लग्न केलें. पण त्याच सुमाराला त्यांच्या आजाराला प्रारंभ झाला. त्यामुळे त्यांना ह्याहि लग्नापासून सुख लाभलें नाही." गुर्जर व अत्रे या गडकऱ्यांच्या निकटवर्तियांनी पुरविलेल्या माहितीच्याच आधारें त्यांच्या या मनोलेखनात्मक प्रणयपर भावगीतांचा कानोसा घेतला पाहिजे.

गोविंदाग्रजांची सांपत्तिक स्थिति कधीच समाधानकारक नव्हती. पुण्यप्रभावाचें लेखन चालूं असतांना तर ते अक्षरशः चहा व चिवडा यांवर दिवस काढीत होते. पुढे त्यांना चांगले दिवस येणार तोंच त्यांचें शोचनीय अवसान झालें. त्यांच्या भावपूर्ण वाङ्मयाचें रसग्रहण करणारी समानधर्मा सहधर्मिणी त्यांना लाभली नव्हती. म्हणूनच त्यांचें गृहजीवन कष्टप्रद झालें होतें. आपण निष्प्रेम जीवन कंठीत आहोंत, आपण जीवन्मृत आहोंत, आपल्याला कोणतीहि आशा उरलेली नाही असे विषादपूर्ण उद्‍गार त्यांनी या कालखंडांतील निरनिराळ्या कवितांत निरनिराळ्या शब्दांत काढले आहेत. एका गीतांत आपल्या जीवितक्रमाला ते 'मुशाफरी' म्हणतात आणि गुणगुणतात—

चालतसे सारखीच ही मुशाफरी
जिकडे मज मार्ग फुटे । न कळत मी फिरत सुटे
नच कसलीही माया । पायबंद बांधाया
मागुनि मज शोकवशा । पाहीना कुणि आशा.

दुसऱ्या एका कवितेंत ते सांगतात—

जीवाचें जगणें असेंच असतें सापेक्ष प्रेमावरी !
डोळेभेट दुरून; भाव अथवा आशाहि त्याला पुरे;
मी हें पाहुनि जीवबंधन असें शोकार्त होतों परी,
कां की या मम लक्ष्यशून्य हृदयीं आशा न कांही स्फुरे !
ओठांशीं भिडतें रहस्य मनिचें सांगूं कुणाला परी ?
अश्रू हे नयनींहि माळ करुनी घालूं कुणाच्या गळां ?
आलें हें भरुनी रितें हृदयही— देऊं कुणाच्या करीं ?
आला दाटुनि कंठ—हाय ! रडुनी कोठे करूं मोकळा ?

तिसऱ्या एका ठिकाणीं ओसाड आडांतील एक फूल स्वतःच्या प्रतिबिंबास चुंबावयास जातें तों त्याच्या इच्छेवर पाणी पडलें हें सांगतांना ते उद्‍गारतात—

त्या धक्क्यासरसेंच फूल मग जें कोमेजलें एकदा
नाही तें हसलें पुन्हा ! विकसलें नाही पुन्हा तें कदा !
तें मेलें म्हणूनी उणें न ठरतें ! मच्चित्त त्याला भुले !
मेलेल्या हृदया मदीय असलीं वाहीन मेलीं फुलें.

'पुनर्विकसन' या गीतांतहि त्यांनी परमेश्वराला प्रश्न केला आहे की,

'या मदीय चिरनिराश । जीवन्मृत मानसास
पुनरपि उमलावयास । काल दिला कोणता ?'

गोविंदाग्रजांचें हें आर्त गीत डिसेंबर १९१४ च्या मनोरंजनांत आहे. त्याला सौ. सिंधुसुता यांनी जानेवारी १९१५ च्या मनोरंजनांत उत्तर दिलें आहे. त्यांना गोविंदाग्रजांच्या दारुण मनःस्थितीची कल्पना नसावी म्हणून त्यांनी त्यांस उपदेश केला आहे—

'जीवित विकसावयास – प्रभुवर गुण गाइजे
जरि मानसपंकजास – ज्ञानजळिं मिळे निवास
त्याहुन तरि मग तयास – काय अधिक पाहिजे ?'

प्रथमपत्नी गोविंदाग्रजांना सोडून गेली त्या कालखंडांत म्हणजे १९१४ सालीं त्यांनी 'अवेळीं ओरडणाऱ्या कोकिळेस' व 'फुलें वेचलीं पण' हीं दोन करुणकोमल गीतें रचलीं आहेत. यांपैकी पहिल्या गीतांतील वातावरण उदासरम्य आहे, तर दुसऱ्यांतील वातावरण करुणरम्य आहे. पहिल्या गीतांत गोविंदाग्रजांनी स्वतःची विकल मनःस्थिति आणि निसर्गाची त्या वेळची बाह्य आकृति यांतील सीमारेषा पुसून टाकिली आहे. ते त्या वेळचें वर्णन करतात—

'खिन्न चांदणें ढगाआडचें ।
भग्न मनोरथ झाले ज्याचे ।
हसें जणूं तें अशा मनाचें '

आणि मग आपल्या दयनीय परिस्थितीचें निवेदन करतात—

निष्प्रेमाची शेज सोवती,
भयाण दुनिया सारी भंवतीं,
हातीं संसाराची माती,
मिटल्या जाग्या डोळ्यांपुढतीं शून्याचें मैदान !

दुसऱ्या गीतांत आरंभींच्या आनंदाला अनपेक्षित कलाटणी दिली आहे. त्याचें पर्यवसान करुणरसांत होतें. कवि पन्हाळगडचा पठार पायाखाली घालून असंख्य फुलें गोळा करतो आणि म्हणतो—

'फुलवंतीने ओंजळ माझी भरुनी लागे शीग
सुगंधि सौंदर्याचा नाचे हातावरती ढीग
काव्यभराने तरुण नयन हे नवतेजाने न्हाले
प्रणयरसाने हृदयहि माझें उचंबळुनि वर आलें ।

आणि मग अनपेक्षित कलाटणी देतांना विचारतो,

" फुलें वेचिलीं:-पण आतां हीं द्यावीं कोणालागीं ?"
राक्षसवृत्ती स्मरणदेवता क्षणांत झाली जागी

हतभागी हा जीव एकला प्रीतिदेवता नाही
मोडुनि पडलें हृन्मयमंदिर शतधा आघातांहीं
निष्प्रेमाचें जीवन माझें रुक्ष चिंतनीं जावें
संकल्पचि हा वरला ठरला; कां तें दैवा ठावें !
काट्यावरि या कोमल हृदया टाकुनि देवा क्रूर
कुठे फुलांची घनीन माझी दिली दवडुनी दूर
जीव जाहला जड; तीं हातीं पुष्पेंहि जड झालीं
फुलें वेंचिलीं पण...आतां देतों टाकुनि खालीं
चिरंमृताला हवा कशाला हा असला हव्यास
जिवंत फुलवंतीचा असला दुःखप्रद सहवास.

गोविंदाग्रजांचा प्रथम पत्नीनें त्याग केला यांत अपराध त्यांचा होता की तिचा होता, या तपशिलांत रसिकांनी शिरण्याचें कारण नाही. आणि रसास्वादाच्या दृष्टीने तें आवश्यकहि नाही. मात्र १९१४ नंतरच्या कालखंडांतील कांही कवितांतून त्या दोघांत बऱ्याच दिवसांपासून कुरबूर असावी असा ध्वनि निघतो. गोविंदाग्रजांच्या पत्नीला नटणेंथटणें प्रिय असावें तर गोविंदाग्रजांची इच्छा तिने आपल्या साहित्याचें कौतुक करावें अशी असावी. आरंभीं आरंभीं त्यांनी दिल-जमाईचा प्रयत्नहि केला असावा असें 'पुनर्जात प्रेमास' या गीतावरून वाटतें. कारण त्यांत पुढील सूचक ओळी आहेत:—

क्षणभर वाटत होतें मजला
की तव ओघ आटुनी गेला,
परि जो अखंड भरला त्याला
कशाची तूट–चल०
मी तूं दूर न राहूं आतां
दाखवुं शक्ति अपुली जगता,
आणूं परमेश्वरही हाता,
ऊठरे ! ऊठ-चल०

परंतु त्यांची इच्छा फलद्रूप झाली नाही ! याला जबावदार तत्कालीन सामाजिक परिस्थिति होती. पत्नी ही अशिक्षित व पति हा सुशिक्षित अशा वैषम्यामुळें गोविंदाग्रजांच्या संसाराची माती झाली. 'अंधाला दृष्टिलाभ' या कवितेंत त्यांनी आपण पत्नीच्या बुद्धीचा जेव्हा विचार करीत नव्हतों तेव्हा सुखी होतों. परंतु तो विचार मनांत उद्भवतांच दुःखी बनलों असा विचार मांडला आहे–

दृष्टि लाभतां मूर्तिभंग हा–मनोभंगही जन्माचा
शतविध हानीहुनिही असला लाभचि दुःखप्रद साचा

गोविंदाग्रजांचीं उरलींसुरलीं प्रणयगीतें करुण-रसानें थबथबलेलीं आहेत. त्यांत त्यांचें व्यथित हृदय पाणीपाणी होऊन पाझरलें आहे. एका गीतांत ते प्रियेला 'निर्वाणीची विनवणी' करतात; तर दुसऱ्या गीतांत प्रेमळपणानें वजावतात की—

'क्षमा करावी मी तुज बाळें, आणि तूंहि मातें
असेंच आता जडलें आहे दोघांचें नातें
क्षणमात्राचा राग अनावर–स्वभाव दोघांचा
समजुनि हें मग राग धरावा कोणी कोणाचा
जीवाच्या बागेंत खेळतो पक्षी प्रेमाचा
पिसामागुनी पिसें काढणें, मार्ग न सुज्ञाचा

या गीतांखाली स्थलकालनिर्देश आहेत. त्यांवरून त्यांना या कविता दुःखद मनःस्थितींत स्फुरल्या असाव्या असें वाटतें. तिसऱ्या एका गीतांत गोविंदाग्रजांनी प्रियेला 'निर्दय' असें विशेषण लावलें असून तिच्या थाटामाटाच्या आवडीचा निर्देश केला आहे;—

'रूप मनोहर असेल बुद्धिहि तीव्र लाभली तुजला
खऱ्या गुणाची पारख कांही असेल तव हृदयाला
वेडी आशा अशी धरुनिया धडा जिवाचा केला
भल्याबुऱ्याचा भेद न तुजला अनुभव भलता आला
केल्या ज्याच्या पायघड्या मीं तुझ्या पावलांसाठी
त्या हृदयाला तुडवुनि गेलिस नटव्या थाटासाठीं !

'हृदयास' या गीतांतहि असाच निर्देश आहे व स्वतःच्या मान्यवर साहित्यिक या भूमिकेचा उल्लेख आहे—

'नटव्या सोंगामागे लागे जे त्या सौंदर्यासाठी
नवलाखाचे मोल देसि कां ? कशास या आटाआटी
तुझ्या जिवाच्या बोलासाठी हपापले हे रसिक पहा
स्वागत करि जा त्यांचें त्यांना हर्ष किती होईल अहा'

'गोफ' या गीतांत प्रत्यक्ष त्याग करतांना जी मन:स्थिति होते तिचें हृदयस्पर्शी करुणचित्र उमटलें आहे. त्यांत करुणवाणीनें कवि प्रियेला प्रार्थना करतो—

'गोफ गुंफिला उलगडण्याचा कठिण काळ येऊनि थडके
हाय, वदावें काय जिवलगे, ऊर केवढा हा धडके
हळूहळू ओढणें जरा, ओढायाची कां घाई
भलता धागा ओढितांच तूं, जीव जिवलगे हा ! जाई
थांब, उलगडूं गोफ कठिण हा शांत बुद्धिने सखे असा–
की न तुटावा पदर एकही, धागा धागा नीट तसा
नातरी होईल हानि आपुली आणि जगाचें हसें तसें
एक्या ठायीं आलों कां वद दूर व्हावया सखे असें'

परंतु अखेर दोघांनाहि विभक्त व्हावें लागलें. 'शेवटच्या प्रेमगीतां'त गोविंदाग्रजांनी शोक केला आहे—

'प्रेमयज्ञाप्रति–प्रथमही आहुती–
अपरिहार्यचि जी जीवजाता
आणि
'जन्मजन्मांतरीं–एकदा क्षणभरी–
प्रेम लाभो तुझें शोकधाता'

अशी उदार इच्छा व्यक्त केली आहे.*

गोविंदाग्रजांच्या प्रेमाच्या या शोकांतिकेवर शेवटचा पडदा पुढील गीतानें टाकल्यास उचित होईल. या गीतास गोविंदाग्रजांनी 'गुलाबाच्या पाकळचा' असा मथळा दिला आहे. तो सहेतुक असावा असा माझा तर्क आहे. मागे एका गीतांत गोविंदाग्रजांनी प्रियेला 'जीवाच्या बागेंत प्रेमाचा पक्षी खेळत आहे त्याचीं पिसामागून पिसें काढूं नकोस' अशी विनंती केली आहे. परंतु त्या विनंतीकडे दुर्लक्ष झाल्यामुळे 'प्रेमाच्या पक्षा'ची गत कशी झाली तें या गीतांत विकल वाणीनें सांगितलें आहे. पत्नीच्या गृहत्यागानें संसाराच्या सुंदर गुलाबाच्या पाकळचा पाकळचा गळून पडल्या असा या मथळचांत ध्वनि असावा अशी माझी कल्पना आहे. निराश प्रेमाला राघू पक्षी मानून आळविलेलें हें गीत खरोखरच जितकें करुण तितकेंच कोमल आहे—

मैना भटके वनांत। वेडा राघू झुरतो मनांत,
विस्कळले पर, पिसें विखुरलीं, गळले दोन्ही पांख
अखंड झरणी झुळझुळ लाविति अरधे उघडे आंख
हालचालही हरली सरली–कुठलें चारापाणी
बसल्या ठायीं खिळून बसला चित्र रेखिल्यावाणी
घुमे पारवा इकडे, तिकडे त्या घुबडाचा घू घू
जित्या जिवाची समाध बांधुनि मधेंच बसला राघू

भग्नहृदय गोविंदाग्रजांचें तर हें चित्र नसेल ना ? आयुष्यांतील या दु:खद घटनेचा त्यांच्या भावनाप्रधान अंत:करणावर अवश्य आघात झाला असला पाहिजे. या दु:खद घटनेनंतर त्यांना लवकरच मृत्यु आला.

गडकऱ्यांच्या अकालिक निधनानें महाराष्ट्रांतील ज्येष्ठ व श्रेष्ठ कवि रेव्हरंड टिळक यांना धक्का बसला. गडकऱ्यांना २३ जानेवारी १९१९ ला मृत्यु आला. आणि टिळक ९ मे १९१९ ला दिवंगत झाले. आपल्यासमोर उदयास आलेला एक बाल प्रथम काव्याचा, नंतर नाटकाचा व पुढे विनोदाचा प्रांत सहज लीलेनें आक्रमण करतो आणि अखंड कीर्ति प्राप्त करून आपल्या समोरच अस्त पावतो हें दृश्य पाहून रे. टिळकांचें हृदय उचंबळलें आणि डोळे डबडबले. त्यांना आपल्यासमोर उदयास येऊन दिवंगत झालेल्या कविमित्रांची स्मृति झाली. त्यांनी गडकऱ्यांना उद्देशून एक विलापिका आळवली आणि विचारलें—

आज हा मराठी कवितेचा। राजहंस राजस गेला
म्हाणला आसवांनी मी। 'केशवसुत' दुर्दैव्याने
तोंच हो पुढे 'दत्ताला'। अश्रूंचा अंजलि वेणें
तर्पिला 'विनायक' पुढतीं। मोगरे जणूं ओघाने
त्या माझ्या बालकवितें।
मम जीवाच्या जीवातें।
म्हाणिलें न अजुनी पुरतें
तोंच हा भयंकर घाला। राजहंस राजस गेला
कोणता नवा गड घ्याया। गडकरी जाति येयून ?

गडकऱ्यांनी आपल्या पश्चात् महाराष्ट्राच्या रसिकांपुढे स्वत:चीं कल्पनासुंदर आणि भावमधुर काव्यें व नाटकें ठेविलीं आहेत. तींच त्यांचीं चिरंतन स्मारकें आहेत.

---

* याच विषयावर आगस्ट १९५३ च्या युगवाणींत प्रा. पां. कृ. सावळापूरकर यांचा 'गडकऱ्यांचीं प्रेमगीतें' हा निराळचा दृष्टीने लिहिलेला लेख आहे तो जिज्ञासूंनी अवश्य वाचावा.

अनुक्रमणिका

कला आणि साहित्यिक

कु. आ. मुंगीकर

कलापुष्प नेहमी मांगल्याचा सुगंध दरवळत ठेवून नवजागृति निर्माण करीत असतें. मानवी मनाच्या खोल कप्प्यांतून त्याचा उगम असल्याने आणि साहित्यिकांच्या अंतःकरणाचा ओलावा सातत्याने कलापुष्पाकडे वाहत असल्याने तें मानवी मनाला रिझविणारें, झुलविणारें आणि गुंगविणारें असें गोड संगीत असतें. दऱ्याखोऱ्यांतून वाहत वाहत जरा मैदानावर आलेल्या पाण्याच्या निर्मळ आणि शुद्ध निर्झराला मानवी मनाला लुब्ध आणि मुग्ध करण्याचें जसें सामर्थ्य असतें तशी जादू मानवी मनाच्या दरींतून बाहेर पडणाऱ्या कलापुष्पांत भरलेली आहे. तथापि कलापुष्पाची निर्मिति कशा परिस्थितींतून होते हें पाहण्यासारखें आहे.

गुलाब, पारिजातक, जाईजुई, बटमोगरा आणि चाफा इत्यादि सुगंधी फुलांची रास जी आपल्यासमोर दिसते ती काय सुखासुखी किंवा आपापतः निर्माण झालेली असते ? की त्यासाठी कांही करावें लागतें ? बियांची पेरणी, खत देणें, कृमिकीटकांपासून संरक्षण करावयाचे अविरत परिश्रम जेव्हा माळी ऊन, पाऊस आणि थंडी यांची पर्वा न करतां घेतो तेव्हा कोठें फुलांनी शिगोशिग भरलेल्या परड्या दृष्टीस पडतात. केव्हा केव्हा तर माळ्याला हें कार्य पार पाडीत असतां पाऊस थंडीने होणाऱ्या हिवतापासारख्या रोगांच्या दुर्दैवी फेऱ्यांतून जावें लागतें. जी माळ्यांची गोष्ट तीच कलापुष्पाला जन्म देणाऱ्या साहित्यिकांची. जोंपर्यंत साहित्यिकाच्या मनांत सत्याच्या बियांची पेरणी होत नाही, पेरणीनंतर सुसंस्कारांचें खत मिळत नाही आणि द्वेषाच्या कीटकांपासून त्याचें संरक्षण होत नाही, तोंपर्यंत कलापुष्पाचें दर्शन अशक्यच नाही कां ? माळ्याप्रमाणे त्याला परिश्रमाचे डोंगर उभारावे लागतात. किंबहुना माळ्यापेक्षा कितीतरी पटीने अधिक कष्ट, हालअपेष्टा साहित्यिकाच्या नशिबाशीं खेळ खेळत असतात. माळी ऊन, पाऊस, थंडी यांकडे लक्ष न देतां फुलांची जोपासना करीत असेल, पण साहित्यिकाला ऊन, पाऊस, थंडी तर सोडाच, मांगल्याचें आणि जागृतीचें बाळकडुच प्राशन करावें लागतें. माळ्याच्या मनांत कुवासनांचा दर्प तुडुंब भरून वाहात असतां त्याला परडीभर फुलें तोडतां येतील आणि फुलांचा वासहि त्याच्या अंतःकरणाच्या अपवित्रतेने आणि अमांगल्याने बिघडावयाचा नाही. पण साहित्यिकांचें तसें नाही. कलानिर्मितीच्या वेळीं त्याचें मन विशुद्ध, पवित्र आणि आनंदी असावें लागतें. तरच कलापुष्पाला मांगल्याचा आणि जागृतीचा सुगंध येतो. कलानिर्मितीच्या वेळीं द्वेष, सूड आणि असूया इत्यादींना मनांत थारा मिळतां कामा नये. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे कलावंताचें जीवन हें सतीचें वाण होय.

साहित्यिकाचें जीवन आर्थिक दृष्टया परिपूर्ण असतें असें कित्येकांचें म्हणणें आहे. तसें नसेल तर पोट भरण्याच्या पायीं साहित्यिकाच्या अंतर्यामीं वसत असलेलें कलापुष्पाचें नाजुक, बारीक रोपटें करपून जातें. साहित्यिकाला अनुभव मिळवितां येत नाही की प्रवास करतां येत नाही. वरवर पाहतां आक्षेपकांच्या म्हणण्याला सत्याची बैठक आहे असें वाटणें साहजिक आहे. पण मूलगामी वृत्तीने वेध लावण्याचा या प्रकरणीं प्रयत्न केल्यास तो सिद्धांत ठिसूळ व पोकळ पायावर आधारलेला आहे असा प्रत्यय आल्यावाचून राहत नाही. आजपर्यंतच्या मराठी वाङ्मयाचा इतिहास

पाहतां कोणत्या लक्ष्मीपुत्रानें मराठी वाङ्मयाच्या प्रासादाच्या एखाद्या तरी वैशिष्ट्यपूर्ण दालनाची निर्मिति केली आहे असें दिसतें ? किंवा नजरेंत भरेल अशी एखादी तरी कलाकृति आयत्या पिठावर रेघा ओढणाऱ्याकडून तयार करण्यांत आली आहे कां ? कोणत्या 'आगरकरां'च्या घरीं गडगंज संपत्ति लो त होती ? आधुनिक कवितेचे उद्गाते कवि केशवसुत यांची नवनवोन्मेषशाली कविता ते लक्ष्मीपुत्र होते म्हणून निर्माण झाली असें म्हणतां येईल कां ? 'गोविंदाग्रजां'चें साहित्य जें महाराष्ट्रीय साहित्यांत अग्रभागीं तळपत आहे तें काय ते आयत्या पीठावर रेघा ओढणाऱ्यांपैकी ख्यालीखुशालींत जन्मलेल्या श्रीमंताच्या पुत्रासारखे होते म्हणून कां ? इंग्रजी साहित्यांत आपल्या वैशिष्ट्यानें चमकणारा लेखक जॉन्सन याच्या जवळ आपल्या मावशीच्या दफन समयीं पैदेखील नव्हती म्हणून त्याला काय करावें लागलें हें माहीत आहे ना ? गोल्डस्मिथला कोणत्या परिस्थितींत उदरनिर्वाह करावा लागला ? यावरून आपल्याला असें म्हणतां येईल की साहित्यिकांना पराकाष्ठेच्या प्रयत्नांतून आणि दुर्दैवाच्या फेऱ्यांतून कालक्रमणा करावी लागते. साहित्यिकाच्या कलेची एकानें व्याख्या केली आहे ती अशी : "Art is stored honey of human soul, gathered on wings of misery and travail." साहित्यिकांच्या कलाकृतींत दुर्दैवाच्या फेऱ्यांतून जात असतां देखील मधुसंचय केलेला असतो. ज्याप्रमाणें मधाचा साठा हस्तगत करण्यासाठी मधमाशांना हाकलून देण्यांत येतें त्याप्रमाणे साहित्यिकांना समाजांतून दूर फेकण्यांत येतें.

परभणी येथील सुप्रसिद्ध कै. बी. रघुनाथ यांनी 'मला परभणींत कोणी विचारीत नाही' असे उद्गार काढल्याचें स्मरतें. ते उपरिनिर्दिष्ट विचारांचे द्योतक नाहीत कां ? विवेचक लेखक माटे तांग्यांतून जातांना त्यांच्यावर पादत्राणें फेकण्यांत आलीं तर पां. वा. गाडगिळांवर रागावून एका तरुणानें त्यांच्या घातलेल्या चाळिशीवर मुष्टिप्रहार केला ! म. गांधीवधानंतर सुप्रसिद्ध कादंबरीकार ग. त्र्यं. माडखोलकर यांचा करण्यांत आलेला छळ साहित्यिकांच्या जीवनाचें दर्शन घडवितो ! ! यावरून साहित्यिकांना समाजांतून उठविण्यांत येतें हेंच दिसत नाही कां ?

पण चमत्कार असा की, साहित्यिकांना अशा प्रकारें छळणारे जितका छळण्याचा प्रयत्न करतात तितका उजाळा साहित्यिकाच्या चारित्र्याला येतो. साहित्यिकांना छळणारे नष्ट होतात, पण साहित्यिक अधिक तेजस्वितेनें जगूं लागतो. एखादी पिढीच ते जगत नाहीत, तर पिढ्यान् पिढ्या जगतात. वृक्षाचा किंवा झाडाचा पाला छाटल्यानें त्याला जसे नवे धुमारे आणि जोमदार टवटवीत पालवी फुटते, तसा प्रकार येथे घडल्यावांचून राहत नाही. 'निंदकाचें घर असावें शेजारीं' म्हणणाऱ्या तुकारामाची भूमिका साहित्यिक स्वीकारतो. पण कवि यशवन्त यापुढे जाऊन निर्विकार मनानें म्हणतात, "तीव्र विषारी शर निंदेचे। घाव गनिमी रिपुशस्त्रांचे। येथवरी नच पोचायाचे।" साहित्यिकाचें मन कठोर वज्राला भेदण्यासारखें असतें असें म्हणणें निरर्थक नाही. माणसाचा सर्वात मोठा शत्रु मन होय. मन ज्याला आत्मसात् करून घेतां येतें तो सर्वश्रेष्ठ. साहित्यिकांनी कलानिर्मितीपुरतें आपलें मन देखील आत्मसात केलेलें असतें. पण त्याबरोबर हेंहि खरें की, जातिवंत साहित्यिकाला साहित्याशिवाय दुसरें कांही दिसत नसतें. 'पांडुरंग ध्यानीं। पांडुरंग मनीं। जागृति स्वप्नीं पांडुरंग॥' असें ध्यानीं-मनीं साहित्य दिसतें. याप्रमाणे साहित्यिकाला नेहमीच कला दिसते. कलानिर्मितीच्या वेळीं कला आणि साहित्यिक एकरूप होतात. इतकी तादात्म्यवृत्ति साहित्यिकांत असते. कलेंत साहित्यिक असतो आणि साहित्यिकांत कला असते.

तादात्म्यवृत्ति किंवा तन्मयता हें विशाल वृत्तीचें प्रतीक होय. तपस्वी ध्यानमग्न असतां परमेश्वरांत तद्रूप होतो, त्याप्रमाणे साहित्यिक कलानिर्मितीच्या वेळीं आपल्या कलेंत तन्मय होतो. साहित्यिक कलेचें ध्यान करीत असतांना 'सत्यं शिवं सुंदरं' या कलेच्या गाभ्यांत आणि 'मांगल्य आणि जागृती' या मूर्तींत तादात्म्य पावतो. किंबहुना समाजाचा विकास, क्रांति, संवर्धन, ऐक्य आणि संघटितपणा यांचें नवें मंदिर उभारून

त्यांत 'सत्यं शिवं सुदरं' किंवा 'मांगल्य आणि जागृति' यांच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यांत येते.

खऱ्या साहित्यिकाची कला मांगल्याचा सुगंध दरवळत ठेऊन जागृति निर्माण करते. वाचकाच्या पूर्वीच्या जागृतीपेक्षा कला त्याच्या मनांत अधिक जागृति निर्माण करते. एक थोर साहित्यिक म्हणतो, "The great artist makes us aware as we have ever been aware before." साहित्यिकाच्या कलेचें कार्य पूर्वीच्या जागृतीहून अधिक जागृति निर्माण करणें असें आहे. गॉर्कीच्या मदर या कादंबरीने वाचकाच्या मनांत पूर्वीच्या जागृतीचें संवर्धन केलें नाही कां? शॉच्या एका नाटकाने म्हणे इंग्लंडच्या एका प्रधानाच्या मनांत खळबळ माजविली आणि त्याने तुरुंगांत एकदम सुधारणा केली. पण कला ही केवळ मानवी मनांत जागृति निर्माण करीत नाही तर मांगल्याचा सुगंध दरवळत ठेवते. हीच कला सर्वश्रेष्ठ ठरते. टॉलस्टॉयने साहित्याची कसोटी सांगतांना 'मांगल्य' ही प्रधान कसोटी मानली आहे. व्हिक्टर ह्यूगोची 'Les Miserables' ही कलाकृति या विशेषांत मोडते असें म्हणतात. मोपासाँच्या कांही कलाकृति या दोन्ही विशेषांनी युक्त आहेत. ज्या साहित्यिकाच्या कलेंत मांगल्य आणि जागृति दोन्ही विशेष रूपाने आढळतात तोच कला श्रेष्ठ. महाराष्ट्रांतील सुप्रसिद्ध साहित्यिक वि. स. खांडेकर यांच्या साहित्यांत मांगल्य आणि जागृति यांचा संगम आहे, म्हणून त्यांची कला अव्वल दर्जाची आहे.

म्हणून मी म्हणतों की, कलापुष्प नेहमी मांगल्याचा सुगंध फैलावून साहित्यिक वाचकाच्या मनांत नवजागृति निर्माण करीत असतो.

ग्रंथ–परीक्षण

"दौलत कादंबरी"

प्रा० प्र. ग. सहस्रबुद्धे

फडके यांची 'दौलत' कादंबरी म्हणजे निर्मला, कमला व मधुरा या तीन तरुणींची कथा आहे. निर्मला ही या कादंबरीची नायिका आहे. निर्मलेच्या कहाणीला या कादंबरींत प्रथम स्थान आहे. जन्या ढोबळ पद्धति-प्रमाणे बोलावयाचें झाल्यास अविनाश हा नायक आणि निर्मला ही नायिका असें म्हणावें लागेल; परन्तु वास्तविक पाहतां या कादंबरीच्या नायकस्थानीं निर्मला आहे. तिच्या मानाने अविनाशचें महत्व अल्प वाटतें. व्हिक्टोरिया राणीच्या पतीसारखें त्याला स्थान आहे. राणीचा पति शोभावा म्हणून त्याला खोटचा उपाधि चिकटविल्या जाव्यात तसें अविनाशच्या बाबतींत वाटतें.

लेखकाला मुख्य गोष्ट निर्मलेची सांगावयाची आहे. प्रारंभापासून तिचें चित्र वाचकांच्या मनाची पकड घेतें. "अप्रतिम सौंदर्यामुळे, पोषाखाच्या साध्या टापटिपीमुळे आणि शांत हसऱ्या वृत्तीमुळे निर्मला त्या सर्व समवयस्क मुलींत चमकून वेगळी दिसत होती." अशी रूपगुणसंपदा निर्मलेला मिळाली होती. मधुरे-पुढेहि ती फिकी पडण्यासारखी नव्हती. "मधुरेचें रूप असामान्य होतें यांत शंकाच नाही; पण तिच्यापुढे निर्मला गलितदर्प होईल ही किती वेडी कल्पना ?" असा अविनाशच्या मनांत आलेला विचार लेखकाने 'गंगेंत यमुना' या प्रकरणांत दिला आहे. अशी ही सुंदरी निर्मला अन्य विविध गुणांनी नटलेली आहे. ती शांत व विचारी आहे. सर्वांशीं मिळूनमिसळून वागणारी आहे. आपण श्रीमंत असलों तरी सर्व मैत्रिणी बरोबर असतां त्यांच्याबरोबर तिसऱ्या वर्गांतून जावें ही समजूत तिला आहे. श्रीमंतीची आढचता तिच्यांत नाही, इतकेंच नव्हे तर श्रीमंतीविषयी तिला एक प्रकारचा तिटकारा वाटत आहे. मुंबईतील अनेक वनिकांशीं तिच्या वडिलांचा घनिष्ठ संबंध असूनहि ती मध्यम स्थितींतील माधवराव आपटे यांजकडे उतरते. माधवरावांचा मुलगा अविनाश आणि निर्मला यांत परस्पर प्रीति निर्माण होते. दसऱ्याच्या सुमुहूर्तावर सीमोल्लंघन करून अविनाशने निर्मलेच्या अधरांवर प्रेमाची पक्की मोहर केली आणि कादंबरी संपली.

निर्मलेच्या या कथेंत दुहेरी संघर्ष उपस्थित झाला आहे. अविनाशने त्याच्या मित्राची बहीण मधुरा हिला शोधून काढेतों, कमींतकमी तिच्या शोधाबद्दल कांही निर्णय लागेतों, विवाहसुख न घेण्याची प्रतिज्ञा केली आहे. ही प्रतिज्ञा अविनाशच्या आड कवीच येत नाही. त्या प्रतिज्ञेविषयी त्याने गौप्य राखल्यामुळे मधुरेच्या आणि अविनाशच्या संबंधाच्या बाबतींत अविनाशच्या आईबहिणीपासून तों सर्वजण गैरसमज करून घेतात, तशी निर्मलाहि करून घेते. त्यामुळे संदेहात्मक अनिश्चित स्थितीमध्ये माणसाला ज्या यातना अनुभवाव्या लागतात त्या निर्मलेच्या वाटचाला येतात. परस्परांच्या अंतःकरणाची अभिव्यक्ति झाल्यानंतर अविनाश सारें रहस्य सांगून निर्मलेची शंका दूर करतो, तेव्हा निर्मलेचा आंतर संघर्ष संपतो.

पण निर्मलेला प्रगट आणि जोरदार संघर्ष द्यावा लागतो तो तिच्या वडिलांविरुद्ध होय. तिचे वडील भय्यासाहेब पैसा आणि कीर्ति यांच्या मागे लागले आहेत. त्या नादांत जीवनांतील अनेक साध्या पण मोल्यवान सुखांची त्यांनी उपेक्षा केलेली आहे. त्यांचें घरांतील वर्तन अरेरावीचें बनलें आहे. त्यांच्या या

वागण्यामुळे निर्मलेच्या मनांत त्यांच्याविषयी चांगलीच अढी पडली आहे. भय्यासाहेबांनी मोठेपणाच्या आपल्या कल्पनेप्रमाणे निर्मलेसाठी धनंजय या आय. सी. एस्. तरुणाची निवड केली, एवढेंच नव्हे तर, पसतीस हजार रुपये हुंडा कबूल करून विवाह पक्का केला. निर्मलेने त्याविरुद्ध बंड पुकारलें व ती घराबाहेर पडली. लोणावळचाला ती आपल्या मावशीकडे गेली. दैवसुद्धा तिच्या सौंदर्याला भाळतें की काय कोण जाणे ! पण घराबाहेर पडलेल्या या तरुणीला संकटांचा सामना द्यावा लागत नाही. एखाद्या सर्कसमध्ये ज्याप्रमाणे उंच झोपाळचावरील खेळ करून खाली उडचा टाकणाऱ्या तरुणतरुणीकरिता जाळें ताणून लोक उभे रहातात व त्यांत ते अलगद झेलले जातात, त्याप्रमाणे निर्मलेला अलगद झेलण्याकरिता मावशी, बाबूराव व बालकमंदिराच्या संचालिका वत्सलाबाई जय्यत उभ्या आहेत. घरच्यापेक्षाहि अधिक प्रेमळ, सुखकर, उद्योगी वातावरण निर्मलेला लाभतें.

लोणावळचाची थंड हवा निर्मलेला सर्व दृष्टींनी मानवते. अविनाशचें हरवलेलें पत्र व अंतःकरण तिला लवकरच सापडतें. मधुरेची माहिती कळून संशयनिवृत्ति होते आणि अशा रीतीने हा आंतरिक संघर्ष संपतो. कांही दिवसांनी छोटाणी शेटच्या केसमध्ये हारल्यामुळे भय्यासाहेबांना अर्धांगवायूचा झटका येतो. त्यांचें मन ताळ्यावर येतें आणि ते मोरोपंताच्या चरित्राबद्दल व इतर काव्यचर्चा निर्मलेशीं करूं लागतात त्या या लोणावळचासच.

पहिल्या प्रकरणांत घायकुत्या कमळला जें कुलुप प्रयास करूनहि उघडत नाही तें निर्मला सहज उघडते असा प्रसंग आहे. ही लहानशी घटना जणूं प्रा. फडके यांच्या अनेक नायकनायिकांच्या कथांचें प्रतिनिधित्व करणारी आहे. त्यांच्या जीवनांतील सगळ्या समस्या कशा सहज सुटतात. निर्मलेच्या बाबतींतच पहा ना ! अविनाशचें मन जिंकण्याकरिता किंवा भय्यासाहेबांचें मन वळविण्याकरिता तिला थोडेहि सायास पडले नाहीत ! सगळें कसें आपोआप घडून आलें.

निर्मला आणि अविनाश यांची प्रेमवेल कशी वाढली, फोफावली, त्याची तपासणी केल्यास आणखी एक विचित्र गोष्ट दृष्टोत्पत्तीस येते. 'कमळेच्या कल्पना' या प्रकरणांत निर्मलेची मनःस्थिति वर्णन करीत असतां लेखक सांगत आहे—"अर्थात अविनाशविषयी तिच्या मनांत वैवाहिक कल्पना केव्हाच आली नव्हती. त्याच्या चारित्रांत कांही तरी एक गूढ आहे तें जाणण्याची जिज्ञासा आणि त्याच्या स्वरूपाविषयी, अंतःकरणाच्या सौंदर्याविषयी आणि बुद्धीच्या श्रेष्ठतेविषयी कौतुक, येवढचाच त्याजविषयीच्या तिच्या भावना होत्या. त्यामुळे मुंबईस एकदा कमळने तिची थट्टा केल्यापासून ती स्वतःशीं आश्चर्य करीत होती, आणि आजच्या बोलण्याने ती अधिकच आश्चर्य करूं लागली की, विशेष सलगीने एकत्र आलेल्या दोन तरुण स्त्रीपुरुषांच्या मनांत परस्परांविषयी प्रेमच उत्पन्न झालें पाहिजे, असा लोकांचा हटवादी तर्क काय म्हणून असावा ?...परस्पर शुद्ध कौतुकाचा भाव स्त्रीपुरुषांच्या अंतःकरणांत असावा हें क्रमप्राप्त आहे हें लोकांच्या कां लक्षांत येऊं नये ?..."

यापूर्वी "बदलते विचार" या प्रकरणांतहि अशाच स्वरूपाचें वर्णन आलें आहे—"अविनाशचा स्वभाव, त्याचें बोलणेंचालणें व त्याची बुद्धिमत्ता यांविषयी तिच्या मनांत फार आवड उत्पन्न झाली होती हें खरें; पण यापलीकडे कसलाच भाव तिच्या अंतःकरणांत नव्हता..."

वर दिलेल्या दोन्ही परिच्छेदांतील विचार जर खरे, तर मग पहिल्याच प्रकरणांत अकल्पिता जेव्हा आपल्या अविदादाविषयी निर्मलेला सांगते—"अविदादा मला एक वहिनी घेऊन येनाल आहे" तेव्हा त्यापुढील वर्णन लेखकाने असें केलें आहे—"तें ऐकतांच निर्मलेच्या चेहऱ्यावरचा आनंद जरा विरल्यासारखा झाला...."

हें काय म्हणून? आनंद विरण्याचें कारण काय ? त्याचप्रमाणे अविनाशचा फोटो पाहून निर्मलेचें विचारमग्न स्थितींत बसणें व अभ्यासाचीं पुस्तकें बाजूस ठेवणें काय दर्शवितें ? सुरतेला ती जें सवतीसारख मानते आणि मधुरेबद्दल ज्या संशयाची तिला

सारखी टोचणी लागते ती कशामुळें ? —या सर्व गोष्टींची संगति नीट लागत नाही.

निर्मलेच्या बाबतींत आणखी एक तिचें वर्तन विचित्र वाटतें. किशोरची आलेली तार ती स्वत: वाचते, पण अविनाशच्या आईला देत नाही. आपट्यांचें जें गृहचित्र लेखकानें रंगविलें आहे तें पाहतां हें कृत्य सर्वथा विसंगत वाटतें.

वरील दोष वगळले तर एकंदर निर्मलेचें स्वभावचित्रण फार चांगलें साधलें आहे. तिचें असामान्य सौंदर्य, तिचें वाक्चातुर्य, तिच्या स्वभावांतील खेळकर विनोदी वृत्ति, शांतता, विचारीपणा, सौजन्य आणि सुशीलता या सर्व गोष्टी निवडक प्रसंगांचीं मनोवेधक वर्णनें करून लेखकानें बहारीनें रंगविल्या आहेत.

कमला आणि निर्मला यांच्या कथा म्हणजे दौलत मधील उपकथानकें होत. कमला ही निर्मलेची मैत्रीण आणि मधुरा अविनाशचा मित्र किशोर याची बहीण. कमला घायकुती आहे, उतावळ्या स्वभावाची आहे. वरच्या देखाव्याला भुलणारी आहे. नटण्यामुरडण्याची तिला फार हौस आहे. श्रीमंतीचा, ऐश्वर्याचा, तिला फार लोभ आहे. निर्मलेनें धनंजयाच्या स्वाभिमानशून्यता, आढ्यतादि दुर्गुणांमुळें त्याला नाकारलें, पण त्या दुर्गुणांकडे डोळेझाक करून, श्रीमंती आणि अधिकाराला भुलून, कमलेनें त्याच धनंजयाला पसंत केलें. कमलेच्या वडिलांनी सर्वस्व वेचलें, कर्ज काढलें आणि धनंजयशीं कमलेचें लग्न लावलें म्हणजे जणूं अपमानाशीं आणि दुःखाशींच तिचें लग्न लावलें.

मधुरेचा पति कांचन यानेंहि हीच घोडचूक केली. आपली सुंदर पत्नि व असलेली संपत्ति आणि व्यापार यांत आनंद न मानतां सट्टा, किमया व लफंगे मित्र यांच्या नादीं तो लागला. खऱ्या दौलतीकडे पाठ फिरवून तो खोट्या दौलतीमागें धावला. अफ्रिकेंत जाऊन कांचननें धन सगळें गमावलें असलें तरी सुदैवानें हरविलेली अक्कल त्यानें परत मिळविली. पश्चात्तापदग्ध होऊन तो परत आला. दैवानें विचित्र साथ दिल्यामुळें मधुरा आणि कांचन यांचें मीलन झालें. वृद्ध वडिलांना व किशोरसारख्या प्रेमळ भावाला सोडून मधुरेचें असहायपणें निरुद्देश्य भटकणें विचित्र वाटत असलें तरी तिचें चित्र करुणरम्य वठलें आहे. तिची सेवावृत्ति, तिच्या सौंदर्याइतकीच अव्याजमनोहर वाटते. पण तिचा हा सेवाभाव आणि प्रेमळपणा तिच्या वडिलांच्या वाट्याला कां येत नाही, याचें स्पष्टीकरण मिळत नाही.

कमला व मधुरा यांच्या उपकथानकामुळें कादंबरींतील मुख्य विषयाला चांगलाच उठाव मिळाला आहे. मनाचा मोठेपणा, प्रेमळपणा यांतच खरी दौलत सामावलेली आहे ही ओळख निर्मलेला पटली म्हणून ती सुखी झाली. या तत्वाचें महत्व न समजल्यामुळें व धनजनित दौलतीलाच खरी दौलत मानल्यामुळें कमलेच्या जीवनाची वाताहत झाली आणि कांचन व मधुरा यांना कांही काळ वनवास भोगावा लागला. हीं उपकथानकें मुख्य कथानकाचीं स्वाभाविक अंगें भासावींत अशा कौशल्यानें लेखकानें त्यांची योजना केली आहे.

निर्मलेला, अविदादा सुरतहून वहिनी आणणार असल्याची बातमी देणारी, अविनाशचा फोटो तिला दाखविणारी आणि सर्वत्र कादंबरींत आपल्या गोड बाललीलांनी व भाषणांनी साखर पेरणारी अकल्पिता म्हणजे दौलत कादंबरीच्या सौंदर्याचा एक महत्त्वाचा पैलू होय. तिचें चाळींत भिरभिर फिरणें, खेळण्यांची पसंती पटपट बदलणें, देवानें अविदादाला क्षमा करावी म्हणून देवापुढें प्रार्थना करणें, अशा प्रकारचीं अनेक चित्रें अतिशय मनोवेधक आहेत. लेखकाच्या विशेष कौशल्याची गोष्ट ही की, या बालिकेच्या हातून कथानकाशीं संबंधित अनेक लहान पण महत्त्वाचीं कामें त्यानें करवून घेतलीं आहेत.

वकीलीच्या धंद्यांत मग्न असलेले, कीर्तीच्या आणि पैशाच्या मागें लागलेले भय्यासाहेब, घरच्या कोर्टाच्या वातावरणासह आणि हरिपंत कारकुनासह अगदी जीवंत वाटतील असे चितारले गेले आहेत. पश्चात्तापदग्ध कांचन आणि स्वाभिमानशून्य धनंजय यांचीं चित्रें थोडक्यांत उठावदार वठलीं आहेत.

या सर्वांच्या मानानें अविनाशचें चित्रण असमाधानकारक वाटतें. त्याचें शौर्य आणि त्याची कळकळ

अनुक्रमणिका

पोकळ वाटते. मधुरेचा पिता मृत्युशय्येवर पडला आहे, किशोर दुःखाक्रांत आहे. अशा स्थितींत नुसती हमी न देतां तो प्रतिज्ञा करतो व तींत तोलून मापून शब्द घालतो हें पाहून त्याला बुद्धिनिष्ठ म्हणावें की व्यवहार-चतुर म्हणावें असा प्रश्न पडतो. मधुरेची सगळी कथा आपल्या प्रतिज्ञेसह तो निर्मलेला सांगतो आणि आई-वडिलांपासून मात्र ती लपवून ठेवतो. या त्याच्या कृत्याचें समर्थन होईल असें कोणतेंच योग्य कारण आढळत नाही. मधुरेचा शोध करण्याची प्रतिज्ञा त्याने केली यांत लपविण्यासारखें असें काय होतें ?

आपल्या प्रतिज्ञेच्या पूर्तीसाठी अविनाश करतो काय तर फक्त काइंड साहेबांच्या मार्फत सी. आय. डी. कडे मधुरेच्या शोधाचें प्रकरण नेतो, एकदा इंदूरला जाऊन येतो आणि मग सी. आय. डी. ला शिव्या मोजीत बसतो. जणूं त्याला माहीतच होतें की हिन्दुस्थानभर एक गोल चक्कर मारून मधुरा पुन्हा मुंबईंतच येणार आहे, तेव्हा जास्त आटापीटा करा कशाला ? आणि खरोखरच गंमत कशी आहे पहा, हाँगकाँगच्या बाजारांत जी पाठविली जायची ती मधुरा कलकत्याच्या कस्टम ऑफिसमधील लोकांशीं मंधीर-कान्ना कंपनीचें कांही बिनसल्यामुळे सरळ मुंबईस आणण्यांत आली. जणूं पूर्व किनाऱ्यावर कलकत्ता सोडून दुसरें बंदरच नव्हतें; किंवा पांडेचरी चन्द्रनगर वगैरे अशा लोकांना आणि धंद्यांना सोयिस्कर असणाऱ्या फ्रेंच वसाहती मंधीर–कान्ना मंडळीला ठाऊकच नव्हत्या ? आणि मुंबईला त्यांनी मधुरेला ज्या ठिकाणीं ठेवलें त्याच ठिकाणीं विजेची दुरुस्ती निघावी, अविनाशच्या कंपनीलाच तें काम मिळावें आणि त्याच्या हाता-खालचे लोकच नेमके तेथे पाठविले जावेत, असा सगळा योगायोग जर जमून येणार होता, तर अविनाशने तरी हातपाय कशाला हलवावेत ?

शिवराम या हाताखालच्या माणसाकडून मधु-रेची बातमी कळल्यावर पोलिसांची जय्यत तयारी करून अविनाश त्या इमारतींत पोचतो आणि मंधीर–कान्ना मंडळीस कैद करवितो व मधुरेची मुक्तता घडवून आणतो.


या प्रसंगीं "माझं कांही सामान हरवलं आहे अन् तें इथं आता आहेसं वाटतं" असें खोचून बोलण्याची वास्तविक कांहीच आवश्यकता नव्हती. पण पोलीस पाठीशीं आहेत असें पाहून अविनाश फुकट फुशारकी दाखवून घेत आहे असें वाटतें. या प्रसंगीं त्याच्या सुदैवाने सत्रींत आश्चर्याची आणि अविश्वस-नीय गोष्ट अशी घडून येते की, पळून न जातां किंवा त्या गावचेच नाही असें न दाखवितां कान्नाजी अवि-नाशला सुरा फेकून मारतो. जवळ येऊन खुपसीत नाही आणि मारतो तोहि असा—"त्याने असा नेम धरला होता की अविनाशचा पाय मांडीपासून सफाई तुटावा" हें काय म्हणून ? सुरा मारायचा तर कोणीहि तो मानेवर, तोंडावर, छातीवर, बरगडीवर लागण्यासारखा मारील. त्याऐवजी नुसता पाय तोडण्याची काय कल्पना होती, तें एक कान्नाजीला माहीत की त्याच्या निर्मात्याला माहीत !

अविनाशने केलेली प्रतिज्ञा, त्याने केलेला मधुरेचा वैठा शोध (?) त्याने सांडलेलें रक्त या सर्व गोष्टी नाटकी वाटतात. अविनाश या पात्राचा पोकळ-पणा या कादंबरीचें एक मोठें वैगुण्य आहे.

दौलत कादंबरीची भाषा सहजसुंदर आणि प्रवाही आहे. लहान लहान अनेक चटकदार प्रसंग, चुरचुरीत संवाद आणि नर्मविनोदयुक्त स्थळें यांच्या कुशल योजनेमुळे कादंबरी चटकदार बनली आहे. परिस्थितीची आणि लहानमोठ्या सर्व व्यक्तींची बारीक वर्णनें मनोहर उतरलीं आहेत. उपकथानकें चांगलीं आहेत व त्यांची मुख्य कथानकाशीं सांगड नीट जमली आहे; परंतु या सर्व सुंदर साजाच्या मानाने मुख्य कथानक जसें भरदार असावयाला पाहिजे तसें तें आढळत नाही. अविनाश आणि निर्मला यांच्या मार्गांतील अडचणी फुसक्या वाटतात; त्यामुळे मुख्य कथानकांतील संघर्ष उग्र वाटत नाही. ती एक लुटु-पुटीची लढाई वाटते आणि म्हणून एखाद्या नखरेल तरुणीने एखादी साधी गोष्ट सांगतांना सतरा वेळां मुरकावें तसें दौलत कादंबरीचें स्वरूप वाटतें.

१९ वें विदर्भ साहित्य संमेलन, गोंदिया

दि. २७ व २८ जानेवारी १९५७



तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी उद्घाटनाचें भाषण करीत आहेत. उजव्या बाजूस शेवटीं संमेलनाध्यक्ष श्री. पुरुषोत्तम दिवाकर ढवळे असून डाव्या बाजूस प्रेक्षकगण आहे.

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संमेलन, गोंदिया
स्वागताध्यक्ष



श्री. छोटुभाभाई क्षत्रीय

विदर्भ साहित्य संमेलन, गोंदिया
संमेलनाध्यक्ष



श्री. बाळासाहेब ढवळे

अनुक्रमणिका

गोंदिया येथे यशस्वी रीतीने पार पडलेलें
१९ वें विदर्भ साहित्य संमेलन

श्री. व. कृ. वऱ्हाडपांडे

विदर्भ साहित्य संमेलनाचें १९ वें अधिवेशन जानेवारीच्या २७ व २८ तारखांना गोंदिया येथे थाटामाटाने पार पडलें. वस्तुतः, हें संमेलन या वर्षी गोंदियाला न भरतां जवळच्याच आमगांवीं भरणार होतें. आमगांव हें भवभूतीच्या पद्मपुराशीं आपलें नातें सांगणारें गांव ! म्हणूनच वैदर्भीय साहित्यिकांच्या काव्यशास्त्रविनोदाने तेथील वाक्प्रसू भूमीचा अणूरेणू पुनश्च पुलकित व्हावा अशी कल्पना मागील वर्षी तुमसर येथील साहित्य संमेलनांत पुढे आली व गोंदियाच्या सांस्कृतिक जीवनांत चैतन्याची ज्योत सतत तेवती ठेवण्यासाठी तनमनधनाने झटणाऱ्या श्री. मनोहरभाई पटेल यांनी यजमानपद स्वीकारून आमगांव येथे संमेलन भरविण्याचें आमंत्रणहि दिलें. पण ऐन वेळीं श्री. मनोहरभाई यांना त्यांच्या प्रकृतीने दगा दिला आणि संमेलनाच्या कार्यांत जातीने लक्ष घालणें त्यांना जमलें नाही ! आमगांव येथे अशा परिस्थितींत संमेलन भरवणें स्वागत समितीला अशक्य वाटल्याने अखेर तें गोंदियालाच भरवावें असें ठरलें आणि त्याप्रमाणे तें भरलेंहि ! याच गोंदियाला १९४८ मध्ये प्रथमतः संमेलन भरलें होतें ! –जानेवारी १९५७ मध्ये तें दुसऱ्यांदा भरलें आणि पूर्वीच्या संमेलनाप्रमाणे यशस्वीहि झालें !

संमेलन यशस्वी झालें असें आवर्जून लिहिण्याचें विशेष प्रयोजन आहेसें वाटतें. गोंदिया येथील या संमेलनाचा सर्वांशाने भार उचलणारे श्री. मनोहरभाई पटेल, संमेलनाचे स्वागताध्यक्ष श्री. छोटुसा लहानुसा क्षत्रिय आणि ज्यांच्या उपस्थितीने संमेलन विशेष रीतीने आकर्षणकेन्द्र झालें असतें ते आपल्या राज्याचे मुख्य मंत्री श्री. यशवंतराव चव्हाण ही त्रिमूर्तीच या संमेलनांत उपस्थित राहूं न शकल्याने प्रारंभीं संमेलनाच्या यशाविषयीं अनेकांना शंका वाटली असेल. पण गोंदिया संमेलन यशस्वी करण्याच्या दृष्टीने श्री. तेलंग, श्री. लिमये, श्री. व्यवहारे, श्री. वजीर आदि स्थानिक कार्यकर्त्यांनी केलेल्या निरलस श्रमांमुळे संमेलनांत वरील त्रिमूर्तींची अनुपस्थिति विशेष जाणवली नाही. संमेलन अशा प्रकारें मार्गांत आलेल्या अनपेक्षित अडचणींवर मात करून यशस्वी झालें असल्याने या यशाचा आवर्जून उल्लेख करावासा वाटला.

संमेलनांत भाग घ्यायला म्हणून आम्ही इतर साहित्यिक मंडळींसोबत रविवारीं २७ ता. ला पहाटे ५-५० च्या गाडीने नागपुराहून निघालों. गोंदियाला पोचलों तेव्हा बरोबर दहा वाजण्याचा सुमार होता. स्टेशनवर उतरतांच संमेलनाचीं प्रतीकचिन्हें लावलेल्या स्वयंसेवक मंडळींनी आम्हाला गराडलें व त्यांच्या स्वाधीन स्वतःला करून आम्ही निश्चित झालों. संमेलन नगरपालिकेच्या विद्यालयांत व्हायचें होतें आणि खरें पाहिलें तर पायीं जाण्यास पांच मिनिटें लागावींत एवढयाच अंतरावर तें स्टेशनपासून लांब होतें. पण गोंदियावासियांच्या स्वागतादि कल्पना वेगळ्या असल्याने तेवढयासाठी त्या मंडळींनी आम्हाला मोटारींत बसावयास लावलें व गोंदिया नगरीचें धावतें वैभव डोळ्यांनी निरखीत नाही तोंच संमेलनाच्या भव्य प्रवेशद्वाराशीं आमची मोटार आणून ठेवली.

संमेलनाधिकाऱ्यांचा चोखंदळपणा मला जाणवला

तो या प्रवेशद्वारींच ! गोंदिया विशेष प्रसिद्ध आहे तें कांचसामानाच्या निर्मितीकरिता अन् उच्च प्रतीच्या धानाकरिता ! तें भव्य प्रवेशद्वार कांचेच्या गायल्या, (हा नागपुरी, 'कांच' या अर्थाचा शब्द !) विविध आकारांच्या व रंगांच्या, मालाबद्ध करून सजविलें होतें. प्रवेशद्वाराच्या आंत उजवीडावीकडे सुंदर हिरवळ पसरली होती.-हिरवळ !-कृत्रिम; पण निसर्गहि तें अनुकरण बघून फसावा इतकें स्वाभाविक, इतकें तंतोतंत ! धानाचीं फोलकटें होतीं तीं; पण हिरव्या रंगाच्या पाण्याने त्यावर फवारा मारल्यामुळे हिरवळीचा आभास निर्माण झाला होता.

संमेलनाच्या मंडपाविषयी तर बोलायलाच नको. एखाद्या गर्भश्रीमंताने लाडक्या अन् एकुलत्या एक लेकीच्या लग्नानिमित्त मंडप उभारावा—अगदी तसा मंडप. तेवढाच भव्य अन् कलात्मक. दर्शनी भागीं महात्मा गांधींचें मोठें तैलचित्र अन् रंगमंचाजवळ विनोबाजी, समर्थ रामदासस्वामी, लोकमान्य टिळक अन् डॉ. राजेंद्रप्रसाद यांचीं चित्रें !—सभामंडपाच्या बाहेरच चहापानादि सोयीसाठी उभारलेलें पानगृह आणि जवळच मुखशुद्धीसाठी उभारलेलें 'पान'गृह !—बाजूला खोल्याच्या रांगा. ज्याला जी खोली पसंत पडेल तेथे खुशाल ठिय्या द्यावा. प्रतिबंध नाही...अगदी इच्छा प्रमाण !—कांही आणायचं आहे ? तो जवळ उभा असलेला स्वयंसेवक तुम्हाला तें आणून देईल ?—कांही विचारायचं आहे ?—त्या स्वयंसेवकाला विचारा !—कांही अडचण आहे ?—त्या स्वयंसेवकाला सांगा. तो निवारील—जिकडे तिकडे स्वयंसेवक. जणूं आम्ही वरपक्षाकडील वऱ्हाडी मंडळीच आहोंत ! आणि एका दृष्टीने आम्ही 'वऱ्हाडी'—म्हणजे वैदर्भीय—होतोंच की ! कार्य उभें केलें होतें गोंदियावासीयांनी. म्हणून त्यांचा वधूपक्ष! आमचा वराचा !—आणि नेमका हाच संबंध श्री. क्षत्रिय यांच्या अनुपस्थितींत त्यांचें कार्य संभाळून घेणारे संमेलनाचे कार्याध्यक्ष यांनी बोलूनहि दाखविला साऱ्या सभाजनांपुढे त्यांनी आपलें व संघाचे सरचिटणीस प्रा. काशीकर ह्यांचें व्याह्याचें नातें बोलूनच दाखविलें होतें !

आम्ही पोहोचल्यानंतर प्रत्यक्ष संमेलनाच्या कार्यवाहीला आरंभ झाला. तसें पाहिलें तर संमेलनपत्रिकेंत दिल्याप्रमाणे शनिवारीं रात्रीं ९॥ वाजतां गोंदिया येथील स्थानिक कलावंतांनी केलेला 'माहेरघर' या नाटकाचा प्रयोग यशस्वी रीतीने पार पडला होता. पण आम्ही त्याला उपस्थित नव्हतों. रविवारीं मात्र आम्ही आपलीं नांवें प्रतिनिधि म्हणून नोंदवून घेतलीं व थोड्याच वेळाने कार्यकारिणीची सभा सुरू झाली. दुपारी दोनच्या सुमारास डॉ. कोलते, प्रा. ग. त्र्यं. देशपांडे आदि साहित्यिक तेथे येऊन पोचले व मग साहित्यिक हास्यविनोदाचा स्पर्श झाल्यामुळे संमेलनाचें तें क्षेत्र कुठे तरी 'वरच्या' पातळीवर जात असल्याचा भास माझ्यासारख्या असाहित्यिकाच्या मनाला झाला. दुपारचें जेवण तयार होतेंच. कार्यकारिणीची सभा आटोपतांच जेवणाची वर्दी आली. (जी वस्तुतः पूर्वीच पक्वान्नांच्या सुगंधाने आम्हाला मिळाली होती !) आणि सर्व साहित्यिक खऱ्या अर्थाने साहित्याचा मनसोक्त आस्वाद घेऊं लागले. उंच स्तरावरचा विनोद कसा असतो याचा एकेक नमुना आमच्या समोर सादर होऊं लागला. (कित्येकदा तर विनोदाचा स्तर इतका उंच असायचा की तो विनोद आहे हें बोलणाऱ्याच्या निवेदनपद्धतीमुळे आगाऊच कळल्याने आम्ही अंदाजानें हंसत असूं). गोंदिया येथील कन्याशाळेच्या गृहशास्त्रप्रवीण विद्यार्थिनी व कार्यकुशल स्वयंसेवक यांनी वाढप पत्करलें होतें. पक्वान्नेंहि विविध. गोड, तिखट आणि अन्य रसांनी युक्त. पसतीस रुपये मणाचा चवदार, सुगंधी तांदूळ आणि लोण्याचें रवेदार तूप ! जिलबी, बटाटेभात, कांद्याचीं भजीं आणि...आणि ज्यामुळे जिव्हेला 'रसना'पद प्राप्त व्हावें असे अन्य पदार्थ !—वर्णन करणें म्हणजे जेवणांत लक्ष नव्हतें असें आपणच प्रगट करणें—तेव्हा इथेच थांबतों !

दुपारीं दोन वाजतां भरलेली सर्वसाधारण सभा मात्र अगदीच 'साधारण' झाली. विषयनियामक समितींत एकूण बारा ठराव खुल्या अधिवेशनांत चर्चेला घ्यावेत असें ठरलें. हे सारेच ठराव कोणाहि मराठीभाषाप्रेमी माणसाला स्वीकरणीय वाटतील असेच असल्याने कोणत्याहि प्रकारची चर्चा अथवा टीकाटिप्पणी होण्याला अवसरच सापडला नाही.

सायंकाळीं साडेपांच वाजतां खुल्या अधिवेशनाला प्रारंभ झाला. सभामंडप श्रोतृवर्गाने फुलून गेला होता. अधिवेशनाला स्वागतगीत व महाराष्ट्रगीत यांनी आरंभ झाला. व्यासपीठावर संघाचे पूर्वाध्यक्ष, सरचिटणीस, उपाध्यक्ष, उद्घाटक आणि संमेलनाचे कार्यवाह आदि थोर व्यक्ति विराजमान झाल्या होत्या. प्रथम संमेलनाध्यक्षपद श्री. बाळासाहेब ढवळे यांनी स्वीकारावें असें सुचविण्यांत आलें व भिन्नभिन्न साहित्यशाखांतर्फे त्या नांवाला मान्यता देण्यांत आली. अध्यक्ष श्री. ढवळे यांचा पुष्पहार घालून सत्कार करण्यांत आल्यावर संदेशवाचन झालें व संमेलनाला रीतसर सुरुवात झाली.

प्रथम श्री. तेलंग वकील यांनी स्वागताध्यक्ष श्री. छोटुभा लहानुसा क्षत्रिय यांचें भाषण वाचून दाखविलें. नंतर तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी उद्घाटनाचें भाषण केल्यावर संमेलनाध्यक्ष श्री. बाळासाहेब ढवळे यांनी आपलें अध्यक्षीय भाषण केलें.

रात्रीं नागपूरच्या 'सारस्वत मंडळा'ने बसविलेल्या 'उद्यावा संसार' ह्या नाटकाचा यशस्वी प्रयोग करण्यांत आला. वस्तुत: त्या वेळीं म्हणजे रात्रीं ९॥ वाजतां भवभूतीवरील परिसंवाद आणि कविसंमेलन यांचें आयोजन करण्यांत आलें होतें. पण ऐन वेळीं कार्यक्रमांत बदल करावा लागला व परिसंवाद दुसऱ्या दिवशीं सकाळीं ८॥ वाजतां घडून आला.

परिसंवादांत प्रि. वा. वि. मिराशी, प्रा. ग. त्र्यं. देशपांडे, प्रा. पां. कृ. सावळापूरकर, प्रा. श्री. भा. वर्णेकर, डॉ. वि. वा. करंबेळकर, आणि श्री. कुमार काटे यांनी भाग घेतला होता. (पैकी प्रा. वर्णेकर व डॉ. करंबेळकर संमेलनाला उपस्थित राहूं न शकल्याने त्यांचीं भाषणें अनुक्रमें कुमारी वर्णेकर व प्रा. काशीकर ह्यांनी वाचून दाखविलीं.) परिसंवाद फारच चांगला रंगला. किंबहुना, प्रत्यक्ष परिसंवादाचे वेळीं वक्त्यांप्रमाणेच वेळेच्या बंधनाची असह्य जाचणूक श्रोत्यांनाहि रुचली नाही. सारींच भाषणें विद्वत्तापूर्ण व नवीन असल्याने त्यांचा संग्रह झाल्यास बरें असें मला सारखें वाटत होतें. आणि संघाने ह्या भाषणांचें पुस्तक प्रकाशित करण्याचें जाहीर आश्वासन दिलें, तेव्हा कोठे माझा रसिक जीव भांड्यांत पडला. संघाचें हें आश्वासन प्रत्यक्षांत उतरल्यास एवढें एकमेव चांगलें पुस्तक प्रथमतःच काढल्याचें पुण्य संघाला मिळेल असें मला वाटतें.

दुपारीं बुंदीच्या लाडवांचें जड जेवण झालें. त्या जेवणाच्या गुंगींत प्रतिनिधि 'निश्चितासन' करण्यांत मग्न असतांनाच दुपारच्या कार्यक्रमाचें बोलावणें आलें. दुपारीं परस्पर परिचय व साहित्य-चर्चा यासाठीं वेळ राखून ठेवला होता. पैकी परिचयाच्या विषींतच बहुतेक वेळ गेला. साहित्यचर्चेला अवसरच मिळूं शकला नाही, त्यामुळे ! नाही म्हणायला चर्चेसाठी एक प्रश्न पुढे आला होता. आणि त्याला कारण झालें होतें श्री. रांगणेकरांचें 'भटाला दिली ओसरी' हें नाटक ! प्रश्न श्री. श. वा. रानडे यांनी विचारला होता व श्री. मनोहर खोलकुटे यांनी त्याला दुजोरा दिला होता, एवढेंच मला आता आठवतें. 'प्रसिद्ध व्यक्तींतील व्यंगांची नाटकांतून जाहीर रीतीने मांडणी करणें सदभिरुचीला धरून आहे काय ?—तें सदभि-

अनुक्रमणिका

रुचीला धरून नसेल तर विदर्भ साहित्य संघासारख्या साहित्याची प्रतिष्ठा कायम टिकविण्याच्या दृष्टीने बद्धपरिकर झालेल्या संस्थांनी ह्यासारख्या साहित्य-कृतींवर टीका करणें आवश्यक नाही काय ?' हा होता चर्चापात्र प्रश्न ! त्याला श्री. द. रा. गोमकाळे यांनी सविस्तर उत्तर दिलें. (अर्थात उत्तर निर्विवाद होतें असें सर्वांशाने म्हणतां येणार नाही !) आणि वेळ संपल्यामुळे चहापानासमवेत चालू असलेला हा कार्यक्रम संपला.

सायंकाळीं साडेपांच वाजतां खुलें अधिवेशन भरलें व समारोप करण्यांत आला. विषयनियामक समितींतील ठराव सर्वमान्यच असल्याने, एरवीं वाद-प्रतिवादांतून जी रंगत चढते ती रंगत या अधिवेशनांत आली नाही. सर्वच ठराव एकमताने मान्य करण्यांत आले. अखेर संघाधिकारी व स्वागत मंडळाधिकारी यांच्यांत परस्परांचे आभार मानण्याची सुखदायक स्पर्धाच जणूं झाली. परस्परांनी परस्परांचें पुष्पमाला घालून यशर्चितन केलें. संघाने संमेलन यशस्वी करण्याकरिता निरलसपणें झटणाऱ्या श्री. तेलंग, श्री. डवीर, श्री. व्यवहारे आदि मंडळींना पुष्पहार अर्पण केला व त्यांच्या श्रमाचें चीज केलें. आणि दोन दिवस खेळीमेळीने, जिव्हाळ्याने वावरणाऱ्या मंडळींचीं मनें वियोगाच्या कल्पनेनें जड झालीं. साडेआठच्या सुमारास संपणारा हा कार्यक्रम सव्वानऊ वाजेपर्यंत चालला. व कार्यक्रम संपवून जेवणाच्या तयारीनें मनोभूमिका सिद्ध करण्यांत मग्न असलेले प्रतिनिधि जेवणगृहाकडे वळले, तेव्हा- पुढच्या कार्यक्रमासाठी प्रेक्षकांनी दाटी केली होती !

जेवण आटोपल्यावर पाहतों तो सांस्कृतिक कार्यक्रमाला सुरुवात झाली होती. नृत्य होऊन गेलें होतें व मुंबईचे शाहीर श्री. शरद् मुठे यांच्या 'महाराष्ट्रस्तोत्रा'चें गायन ऐन रंगांत आलें होतें. वस्तुतः या वेळीं कविसंमेलनाचा कार्यक्रम ठरला होता व त्यासाठी परस्थ कवींना मुद्दाम आमंत्रण दिलें गेलें होतें. पण सांस्कृतिक कार्यक्रमांच्या गर्दीमुळे आधीच एक दिवस पूर्ण पुढे ढकलण्यांत आलेलें कविसंमेलन अजिबात रद्द करण्यांत आलें. शिवाय श्री. शरद मुठे यांच्या 'खोकला' या नवकाव्याचें विडंबन करणाऱ्या कवितेचें त्याच वेळीं दर्शन घडल्यामुळे कविसंमेलनासाठी आवश्यक ती मनोभूमि प्रेक्षक-श्रोत्यांना कायम राखतां आली नाही ! तात्पर्य एवढेंच की सांस्कृतिक कार्यक्रमामुळे कविसंमेलन झालें नाही ! (कविसंमेलन हा सांस्कृतिक कार्यक्रम नव्हे काय ?—रसिकांनी चर्चा करावी.) त्यानंतर मुंबईच्या सुप्रसिद्ध गायिका सौ. विनोदिनी दीक्षित यांच्या गायनाचा कार्यक्रम झाला व त्या कार्यक्रमाच्या समाप्तीबरोबरच संमेलनहि संपुष्टांत आलें !

या संमेलनाचें एक वैशिष्ट्य म्हणजे भांडणांचा दुष्काळ—प्रा. म. श्री. पंडित व प्रा. ग. त्र्यं. देशपांडे यांनाहि ही गोष्ट जाणवली. पक्वान्नांचें जेवण चटणीचा फणकारा नसल्यास अळणी वाटतें, तसा अळणीपणा या संमेलनांत होता असा त्यांचा अभिप्राय पडला. पण साखरेच्या खाणाऱ्याला चटणीची अपूर्वाई !—चटणीच्या- फणकाऱ्याने साऱ्या जेवणाची चव जाते, हें ज्याला माहीत आहे अशा माझ्यासारख्याला ती चटणी येथे आढळली नाही हेंच बरें झालें ! --नेहमीच चटणीशीं संबंध ! पक्वान्नें तरी मनसोक्त कधी हो खायचीं ?

गोंदिया येथील विदर्भ साहित्य संमेलनाचे सूत्रधार

१. छोटुसा लहानुसा क्षत्रीय

लेखक : 'आकाशनंद', गोंदिया

श्री. छोटुसा लहानुसा क्षत्रीय यांचा जन्म दिनांक १ ऑगस्ट १९०८ रोजीं नाशिक जिल्ह्यांतील सिन्नर या तहसिलीच्या गावीं झाला. लहानपणापासूनच त्यांना मराठी या आपल्या मातृभाषेचा अभिमान वाटत असल्यामुळे त्यांनी तिची सेवा करण्याचा निश्चय केला आणि तिच्या अभिवृद्धीसाठी ते झटूं लागले. तसेंच दुसऱ्या कोणत्या गोष्टीबद्दल त्यांना तेव्हापासून आकर्षण असेल तर तें व्यायामाबद्दल. बाल्यांत त्यांनी आपलें शरीर कमावलें. कुस्त्यांचे फड जिंकले. 'जैसे शस्त्र युधिष्ठिरा तनु तशी कर्तृत्ववानाप्रती' ही खूणगाठ त्यांनी तेव्हापासूनच मनाशीं बांधली. प्राथमिक शिक्षण सिन्नरला संपवून ते नाशिकला आले. तेथे त्यांनी इन्टरपर्यंत महाविद्यालयीन शिक्षण घेतलें. नंतर ते उद्योगाला लागले. अशा रीतीने केवळ योगायोगाने कां होईना पण नाशिक हें त्यांच्या जीवनाचें प्रेरणास्थळ ठरलें आहे !

अति अल्पावधींत गोंदिया शहराच्या नागरिक जीवनाशीं एकजीव होऊन महाराष्ट्रीय नागरिकांत अग्रेसरत्वास प्राप्त झालेले व वि. सा. संघाच्या या १९ व्या अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष श्रीमान छोटुसाभाई क्षत्रीय यांचा ओझरता परिचय.

लगेच भिकुसा यमासा क्षत्रीय या बिडी कारखान्याच्या सिन्नर व नाशिक येथील दुकानांचा व्याप त्यांना सांभाळावा लागला. पंचवीस वर्षांपूर्वी गोंदिया येथे कंपनीचें एक दुकान निघालें. त्याच्या देखरेखीसाठी ते येथे येऊं जाऊं लागले आणि नंतर १९४८ सालापासून तर ते गोंदियाला स्थायिक झाले.

गोंदियाला स्थायिक होतांच त्यांचा समाजांतील लहानथोर व्यक्तींशीं संबंध आला. त्यांचा कष्टाळू स्वभाव आणि शालीन प्रकृति यांमुळे ते गुजराथी व महाराष्ट्रीय समाजांत सारखेच लोकप्रिय झाले. त्यांची मातृभाषा–प्रीति पाहून येथील लोकांनी त्यांना वि. सा. सं. च्या १९४८ तील गोंदिया अधिवेशनाचें स्वागताध्यक्ष केलें. त्यांनी भाषण दिलें आणि त्यांतील मननीय विचार ऐकून महाराष्ट्रीयांचीं मनें हरपलीं !

आज ते गोंदिया–वि. सा. सं. शाखेचे अध्यक्ष आहेत. शिवाय त्यांच्या 'बहुजन हिताय बहुजन सुखाय' प्रकृतीमुळे आणखीहि अनेक संस्थांनी त्यांना माला घातल्या आहेत. ते मित्रमंडळाचे अध्यक्ष, गोंदिया बिडी वर्क्स असोसिएशनचे उपाध्यक्ष, आणि जेठाभाई माणिकलाल हायस्कूल, सरस्वती महिला विद्यालय, गुजराथी केळवणी मंडळ आदि संस्थांचे उपाध्यक्ष, सदस्य वा विश्वस्त या नात्याने कार्य करीत आहेत. त्यांना मराठी शिवाय गुजराथी, संस्कृत, मारवाडी, हिंदी, इंग्रजी आदि भाषा येतात. त्यामुळे अपरिचिताला त्यांची मातृभाषा ओळखून काढणें थोडेसें कठीणच जातें. त्यांना मोडी लिपी विशेष आवडते. त्यांची सही बहुधा त्याच लिपींत असते. शिवाय सर्व बाबतींत

अनुक्रमणिका

त्यांची स्वदेशप्रीति सदैव जागृत असतेच.

रोज प्रातःकाळीं व्यायाम, स्नान व देवी लक्ष्मीच्या आरतीनंतर ते प्रभु रामचंद्राच्या मंदिरांत दर्शनासाठी सपत्नीक जातात आणि परतल्यावर दुकानांत जाऊन आपल्या कार्याला लागतात. प्रत्येक गोष्टीवर स्वतः लक्ष ठेवणें आणि प्रत्येक गरीब कामगाराची सर्व प्रकारें जातीनें विचारपूस करणें हीं कार्यें ते रोज पार पाडतात. ते जितके दयाळू, आणि दानधर्मशील आहेत तेवढेच शिस्तीचे भोक्तेहि आहेत.

त्यांच्या मनाचा कल अध्यात्माकडे आहे व संतवाङ्मयाच्या अवीट गोडीचा अविरत अनुभव घेणें हा त्यांच्या दैनिक जीवनांतील एक विशेष आहे. अध्यात्माची गोडी आहे तशीच कलेचीहि ओढ त्यांना आहे. त्यामुळे ते खऱ्या अर्थानें रसिक व गुणग्राहक ठरले आहेत. आपपरभावाचा अभाव आणि लहानथोरांशीं समदृष्टीनें स्नेहपूर्ण वागणूक हे त्यांचे स्वभावविशेष आहेत. त्यांच्या दुकानांत वा घरीं जाणाऱ्या प्रत्येक लहानमोठ्याचें ते स्वागत करतात. रस्त्यानें जातांना प्रत्येक परिचिताला आधी स्वतः हाक मारून नमस्कार करतात. इतकी लीनता थोरांतच सापडायची !

रोज सायंकाळीं ६॥ वाजतां त्यांच्या दुकानांत भजन होतें. स्वतः छोटुसाभाई हातीं टाळ घेऊन मोठ्या भक्तिभावानें भजन म्हणतात. दरम्यान कोणीहि तिथे गेला तर त्यालाहि भजनांतच भाग घेण्याचा मोह होतो. गोंदिया येथे आषाढी आणि कार्तिकी एकादशीला दिंडी काढण्याची कल्पना त्यांचीच ! कपाळाला बुक्का लावून अस्सल मराठी थाटांत दिंडीसोबत भजन म्हणत चालणारे छोटुसाभाई पाहिले की डोळ्यांचें पारणें फिटावें !

सुशिक्षितांना भजनांत भाग घेणें वा वाटेने दिंडींत 'ज्ञानबा तुकाराम'च्या घोषांत सम्मिलित होण्यास कां संकोच वाटावा हें भाईंना विस्मयाचें वाटतें. त्यांना या मेळाव्यांत सामील करण्याची जणुं त्यांनी आताशा मोहीमच काढली आहे ! यावरून त्यांचे ठिकाणीं असलेला सत्कार्याबद्दलचा जिव्हाळा व्यक्त होतो. ते संत गाडगे महाराज धर्मशाळेचे ट्रस्टीसुद्धा आहेत.

त्यांच्यातर्फे दरवर्षी हनुमान जयंतीचे वेळीं वजरंगाचे जन्मसोहाळ्याचा उत्सव, मोठ्या थाटाने आमचे नगरांत पार पडतो. उत्तुंग महत्त्वाकांक्षा, बलोपासना, सेवा, आदि श्रेष्ठ गुणांच्या निर्मिती व वाढीसाठी मुलांपुढे हनुमंताचा आदर्श असावा अशी त्यांची इच्छा असते.

छोटुसाभाई रात्रीं ९ वा. झोपीं जातात. त्यापूर्वी मुलानातवांच्या अभ्यासाची चौकशी आणि पंचपदी त्यांनी आटोपलेली असतेच. त्यांच्या घरीं एक फळा आहे. त्यावर खडूनें ते रोज संतवाणी लिहितात. तुकोबाचें वचन किंवा संस्कृतांतील बोधवाक्य आपल्याला तेथे आढळतेंच. छोटुसाभाई पूर्णतः निर्व्यसनी आहेत. त्यांना चहा विडासुद्धा चालत नाही. आमच्या विद्यालयांत गीता, गीताई, मनाचे श्लोक इत्यादींचें पठण विद्यार्थी नियमित रूपानें करतात हें कळतांच या पुस्तकांच्या शेकडो प्रती त्यांनी तत्परतेने मुलांना वाटल्या. मराठी भाषा आणि बाणा यांचा होईल तसा उत्कर्ष साधायचा हाच जणुं त्यांचा एक बाणा आहे. येथील प्रत्येक मंदिरांत त्यांनी धर्मार्थ पेटचा लावून दिल्या आहेत. सचोटीचा व्यवहार आणि सत्य यांची कास ते कधीहि सोडत नाहीत. कोणतेंहि काम करण्यास त्यांना कमीपणा वाटत नाही याचें उत्तम उदाहरण मला तुमसर संमेलनांतील आठवतें. एके दिवशीं जेवणाचे वेळीं कांही पत्रावळी कमी पडल्या असतां त्यांनी स्वतः आंत जाऊन त्या आणल्या व मांडल्या. उदयोन्मुखांना उत्साहित करण्याचा विडाच जणु त्यांनी उचलला आहे. तुम्ही कोणतीहि नवीन कल्पना घेऊन त्यांच्याकडे जा, ते तिचें स्वागत करतील व ती साकार व्हावी म्हणून तुम्हाला हवी ती मदत देण्याची इच्छा प्रगट करतील. मी माझें 'इन्द्रधनु' नांवाचें पुस्तक त्यांना सादर भेट म्हणून द्यायला गेलों असतां त्यांनी तें स्वीकारलें तर खरें, मात्र पुस्तकाची किंमतहि आग्रहानें माझ्या खिशांत घातली आणि म्हणाले, 'अहो अशा भेट–प्रतीच वाटाल तर तुमचा खर्च निघणार कसा ? अन् तो निघाला नाही तर तुमचें दुसरें पुस्तक कसें प्रकाशित होणार ?' केवढी ही उदयोन्मुखाबद्दल सहृदय दूरदर्शिता.

बाल्यांत रुजलेली व्यायामाची आवड अद्याप कायम आहे. विविध शिक्षण संस्थांशीं त्यांचा संबंध असल्याने त्यांतील विद्यार्थ्यांनी खूप खेळावें–व्यायाम

अनुक्रमणिका

करावा, अशी इच्छा ते नेहमीच प्रगट करीत असतात. ते स्वतः फेरींत भाग घेतात. विद्यार्थ्यांप्रमाणे हाफपॅंट घालून फेरींत सामील व्हायची तयारीसुद्धा ते दाखवतात.

श्री. छोटुसाभाईंना सात मुलगे आहेत. पैकी थोरले श्री. प्रभाकरराव आणि त्यांच्या पाठचे दोघे तीन विविध दुकानांच्या कामाला लागले आहेत. श्री. प्रभाकरराव तर येथेच असतात. अगदी आतापर्यंत श्री. छोटुसाभाईंच्या डोक्यावर पितृछाया होती. दि. २०-१२-५६ रोजी निर्घृण काळाने त्यांच्या तीर्थरूपांना हिरावून नेलें. भिकुसाभाई म्हणजे छोटुसाभाईंचे चुलते. तेहि आज हयात नाहीत. असो.

श्रीमान् छोटुसाभाईंनी अल्पावधींतच कीर्ति संपादन केली आहे. हृदय आणि पैसा या दोहोंची जोड त्यांना लाभल्याने ते त्यांचा लोककल्याणार्थ व मराठी भाषेच्या अभिवृद्धयर्थ सदैव यत्न करीत असतात. साहित्य, कला आणि शिक्षण या तिन्ही प्रांतांत सारखीच रुचि असलेला पुरुष आमच्या शहरांत आहे हे आमचें भाग्यच. वि. सा. संघाच्या गोंदिया शाखेच्या स्थापनेपासून आजपर्यंत ते सतत अध्यक्ष म्हणून आम्हाला लाभले आहेत. शाखेच्या प्रगतीचें श्रेय त्यांनाच आहे. कमी व गोड बोलणें, पण अधिक भरीव कार्य करून दाखविणें हा त्यांचा गुणविशेष आहे. आपल्या कर्तृत्वशक्तीनें धार्मिक, साहित्यिक, अध्यात्मिक, सांस्कृतिक व शैक्षणिक क्षेत्राचीं दालनें आम्हा गोंदियावासियांसाठी समृद्ध करण्याचा यत्न ते सतत करीत आहेत.

१९४८ सालीं गोंदियाला संमेलन भरलें तें छोटुसाभाईंच्या प्रेरणेनेच आणि यंदाहि १९ वें अधिवेशन गोंदियास भरत आहे तेंहि त्यांच्याच प्रेरणेने. या खेपेलाहि तेच स्वागताध्यक्ष आहेत. अशा एकनिष्ठ साहित्यप्रेमी कार्यकर्त्याच्या नेतृत्वाखाली हें संमेलन यशस्वी होणारच !

गोंदिया येथे झालेल्या विदर्भ साहित्य संमेलनाचे कार्याध्यक्ष व प्राण

२. श्री. ना. ह. तेलंग

श्री. ना. ह. तेलंग हे गोंदिया येथे वकील असून त्यांनीच आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीने हें संमेलन अत्यंत यशस्वी करून दाखविलें. त्यांचें शिक्षण नागपूरच्या मॉरिस कॉलेजांत झालें असून मराठी आणि हिंदी या दोन्ही भाषांवर त्यांचें प्रेम आहे. गोंदिया येथील शिक्षण संस्था व अन्य राजकीय व सांस्कृतिक चळवळी यांचे ते एक प्रमुख आधार आहेत. गोंदिया येथील श्रीमंतांना श्री. तेलंग यांचा शब्द कधीहि मोडावासा वाटत नाही. इतकी पत श्री तेलंग यांनी आपल्या कार्यकर्तृत्वाने निर्माण केली आहे. गोंदिया येथील भव्य मंडप, भोजनाची उत्तम व्यवस्था, अत्यंत प्रामाणिक आणि कामसू स्वयंसेवक, हे सर्व श्री. तेलंग यांच्या कुशल योजकतेचें फल आहे. श्री. तेलंग यांनी मनावर घेतलें नसतें तर संमेलन यशस्वी होणें कठीण होतें. स्वागताध्यक्ष श्रीमान छोटूसा यांच्या अनुपस्थितींत श्री. तेलंग यांनीच त्यांची जागा घेतली होती. श्री. तेलंग यांच्या कर्तबगारीचा फायदा विदर्भ साहित्य संघाला उत्तरोत्तर असाच मिळत जावो हीच इच्छा.

विदर्भ साहित्य संमेलनाचे अध्यक्ष

३. श्री. बाळासाहेब ढवळे

गोंदिया येथे दि. २७ व २८ जानेवारी या दिवशीं भरत असलेल्या विदर्भ साहित्य संमेलनाच्या १९ व्या अधिवेशनाचे नियोजित अध्यक्ष श्री. बाळासाहेब ढवळे यांचा परिचय, विदर्भाच्या साहित्यिक व सांस्कृतिक जीवनाकडे डोळसपणें पाहणाऱ्या वैदर्भीय मंडळींना करून देण्याचें विशेष प्रयोजन वस्तुतः नाही. पण बरेचदा, ज्यांचा आपणाला परिचय आहे असें आपण मानतों, त्यांचा परिचय खऱ्या अर्थी आपणाला झालेला नव्हता, असेंहि प्रत्यंतर व्यवहारांत येतें. श्री. बाळासाहेब ढवळे हे अशा अपवादभूत व्यक्तींपैकी आहेत की ज्यांना लोक जाणत असूनहि जाणत नाहीत! आज, एकेकाळीं मध्यप्रदेशांतील 'केसरी' म्हणून मान्यता पावलेल्या व वर्तमानपत्र याचा पर्यायवाची शब्द होण्याचें अहोभाग्य लाभलेल्या 'महाराष्ट्र' या वृत्तपत्राचे ते कर्तृत्वसंपन्न संपादक आहेत, एवढीच त्यांच्या संबंधीची सामान्य लोकांना असलेली माहिती! पण वृत्तपत्रसंपादन हा त्यांच्या बहुविध कार्यांपैकी केवळ एक गुण आहे. म्हणूनच, श्री. बाळासाहेब ढवळे यांच्या संपन्न जीवनाची व कर्तृत्वाची कल्पना यावी व त्यांचें वास्तव व्यक्तिदर्शन घडावें, यास्तव त्यांच्या या परिचायक लेखाची आवश्यकता वाटते.

जन्म व शिक्षण

श्री. बाळासाहेब ढवळे यांचा जन्म नागपूरला २१ जुलै १९०१ या तिथीला झाला. नागपूरच्या सुप्रसिद्ध नीलसिटी हायस्कूल या शिक्षणसंस्थेंत (सध्याचें श्री. दादासाहेब धनवटे नगर विद्यालय) त्यांचें शालेय शिक्षण झालें. पण शिक्षण चालूं असतांच सन् १९१७ च्या रिस्ले सर्क्युलरमुळे त्यांना तें अर्धवटच टाकावें लागलें. मात्र शिक्षणाच्या तीव्र ओढीमुळे त्यांनी नागपूरच्याच मिशन हायस्कूलांतून प्रवेशपरीक्षा दिली व महाविद्यालयीन शिक्षणक्षेत्राचें प्रवेशद्वार अशा प्रकारें स्वतःसाठी मोकळें करून घेतलें. त्यांचें महाविद्यालयीन शिक्षण नागपूरच्याच हिस्लॉप कॉलेजांत सुरू झालें खरें, पण त्याच सुमारास, राजकीय दृष्ट्या जागरूक असलेल्या त्यांच्या मनाने पुन्हा उचल घेतली व भावी परिणामाची पर्वा न करतां त्यांनी आपली जीवितनौका असहकारितेच्या चळवळीच्या वेगवान प्रवाहांत सोडून देऊन रूढ शिक्षणाला रामराम ठोकला.

'महाराष्ट्रां'त प्रवेश

यानंतरचा काळ हा त्यांच्या प्रत्यक्ष कार्याचा—जीवनाच्या ग्रंथाध्ययनाने हस्तगत केलेल्या ज्ञानप्राप्तीच्या साधनेचा काळ होय. लोकजागृतीचें अधिष्ठान असल्यावाचून राजकीय चळवळीला यश प्राप्त होणार नाही अशी, विद्यार्थी असतांनाच, त्यांची श्रद्धा होती. या श्रद्धेची कास धरल्यामुळेच तुरुंगवासाचाहि अनुभव त्यांना घ्यावा लागला! या श्रद्धेंतूनच त्यांच्या अंतःकरणांत वृत्तपत्रव्यवसायाविषयी प्रेम निर्माण झालें व वृत्तपत्रविषयक आपली अमूर्त कल्पना साकार करण्याच्या हेतूच्या दृष्टीने उपकारक होईल या भावनेने त्यांनी नागपूरच्या त्या वेळच्या एकमेव मराठी वृत्तपत्रांत—साप्ताहिक महाराष्ट्रांत—पडेल तें काम करण्याची तयारी ठेवून शिरकाव करून घेतला! महाराष्ट्राचे संस्थापक, संचालक, संवर्धक व संपादक कै. दादासाहेब ओगले यांच्या शोधक दृष्टीने श्री. बाळासाहेबांच्या ठिकाणीं बीजरूपाने असलेले लेखन-संपादनादि गुण साक्षेपाने टिपून घेतले व प्रसंगपरत्वें

त्यांना प्रगट होण्याला अवसर मिळवून दिला ! कै. ओगले यांनी आपल्या तरुण संपादक मंडळांत त्यांना समाविष्ट करून घेतलें आणि तेव्हापासून आज जवळ-जवळ तीन तपें ते 'महाराष्ट्रा'ची सेवा करीत आहेत. गेल्या कांही वर्षांत साप्ताहिक, द्विसाप्ताहिक व दैनिक अशा प्रकारचीं जीं प्रगतिकारक स्थित्यंतरें 'महाराष्ट्रा'च्या जीवनांत झालेलीं आज आपणाला दिसतात त्यांमध्ये श्री. बाळासाहेब ढवळे यांच्या परिश्रमांना फार मोठें स्थान द्यावें लागेल.

ग्रंथकर्ता नव्हे पण साहित्यिक

महाराष्ट्र वर्तमानपत्राचा इतिहास म्हणजे एका अर्थानें या प्रांतांतील राजकीय व सामाजिक चळवळीचा इतिहास आहे. श्री. दादासाहेब ओगले यांच्या मृत्यूनंतर तर मुख्य संपादकाची धुरा श्री. बाळासाहेबांनाच वाहावी लागली व हें कार्य ते किती चोख बजावीत आहेत हें सर्वांच्या अनुभवास येत आहे. श्री. ढवळे यांच्या नांवावर खपणारीं कांही पुस्तकें नाहीत हें जरी खरें असलें तरी वर्तमानपत्राच्या निमित्तानें जें त्यांना उत्तम लिखाण करावें लागलें त्याचीं किती तरी पुस्तकें भरूं शकतील आणि म्हणूनच साहित्यिकांत वर्तमानपत्रकर्त्यांचीहि प्रामुख्यानें गणना केली पाहिजे.

संमेलन-परिषदांचा आधारस्तंभ

श्री. बाळासाहेबांनी या प्रांतांतील साहित्यिक चळवळींत फार मोठा भाग घेतला आहे. १९२९ मध्यें नागपूर येथे कै. दादासाहेब खापर्डे यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या विदर्भ साहित्य संमेलनांत ते एक कार्यकर्ते होते हें तर असोच, पण १९३३ मध्ये कै. खाडिलकर यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या महाराष्ट्र साहित्य संमेलनाच्या नागपूर येथील अधिवेशनाचे ते एक चिटणीस होते. तें संमेलन ज्या संस्थेच्या द्वारा येथे आमंत्रित करण्यांत आलें होतें त्या राष्ट्रीय वाचनालयाचे ते एक आधारस्तंभ होते. पुढे त्या संमेलनाच्या उर्वरित रकमेच्या व्याजांतून या प्रांतांतील उत्तम ग्रंथास पुरस्कार देण्याची जी योजना राष्ट्रीय वाचनालयानें आखली व अजून चालूं आहे, ती तरी श्री. बाळासाहेब यांच्या प्रेरणेनें आणि पुढाकारानेंच होय. नागपुरांत झालेली पत्रकार परिषद यशस्वी करण्यांतहि त्यांचा हात होता.

वि. सा. संघांतील स्थान

विदर्भ साहित्य संघाच्या प्रारंभापासून श्री. बाळासाहेब ढवळे त्याचे एक प्रमुख कार्यकर्ते आहेत. संघाचें मुखपत्र जें 'युगवाणी' त्याचें संपादनहि त्यांनी मोठ्या कौशल्यानें केलें आहे. सध्या एक वर्षभरापासून तर ते संघाच्या अध्यक्षपदाची धुरा वाहात असल्यामुळे संघाच्या भरघोस श्रेयाचे तेच प्रातिनिधिक वाटेकरी होतात. त्यांचा उत्साह, कार्याचा उरक, समतोलपणा आणि तळमळ यांनी विदर्भ साहित्य संघाचें कार्य वरचेवर वृद्धिंगत होत आहे.

योग्य निवड

गोंदिया येथील संमेलनाच्या स्वागत मंडळानें श्री. बाळासाहेब ढवळे यांची अध्यक्षपदीं निवड केली हें अत्यंत उचित झालें आहे. या निवडीबद्दल श्री. ढवळे आणि संमेलनाचें स्वागत मंडळ या दोघांचेंहि आम्ही अभिनंदन करतों. श्री. ढवळे यांच्या मार्गदर्शनानें संमेलन यशस्वी होईल, यांत आम्हाला संशय नाही.

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संमेलनांतील भवभूतिविषयक परिसवाद

गोंदिया येथे भरलेल्या विदर्भ साहित्य संमेलनाच्या गेल्या अधिवेशनांत भवभूतिविषयक जो अप्रतिम सुंदर परिसंवाद झाला, त्यांतील विद्वानांचीं भाषणें त्या त्या वक्त्यांनी लिहून दिलेलीं आहेत. तीं लवकरच पुस्तकरूपानें प्रसिद्ध करण्याचा विचार आहे. येथे वक्ते, त्यांचे विषय व त्यांच्या भाषणांतील मुख्य सूत्र यांचें अति संक्षेपानें दिग्दर्शन करीत आहें.

—संपादक

१ म. म. वा. वि. मिराशी

विषयः—भवभूतीचें जीवनचरित्र

भवभूतीच्या नाटकांतील प्रस्तावनेंत त्यानें आपल्या कुलाची माहिती दिली आहे. त्या अनुरोधानें शोध—कालप्रियनाथ म्हणजे काल्पी येथील देवालय—भवभूतीचे पद्मपूर ही वाकाटकांची राजधानी. भवभूतीचा काळ, आठव्या शतकाचा प्रारंभ. भवभूतीच्या स्थळकाळाबद्दल ऐतिहासिक व शिलालेख ताम्रपटाचे पुरावे—उम्बेक आणि भवभूति हे एकच असावे—भवभूतीचें वैदिकत्व—त्याचें मीमांसाप्रावीण्य—विवर्तवाद व भवभूति—त्याचें अन्य शास्त्रांतील प्रावीण्य—भवभूतीस कनोज येथील यशोवर्म नृपतींचा आश्रय.

२ प्रा. ग. त्र्यं. देशपांडे

भवभूतीची ग्रंथसंपदा

भवभूतीचीं तीन नाटकें. महावीरचरित्र, मालतीमाधव, उत्तररामचरित्र. महावीरचरित्रांतील राम वाल्मिकी रामायणाहून वेगळा—भवभूतीला रामरूपाने आदर्श पुरुष निर्माण करावयाचा होता. माल्यवानाच्या पात्राचें महत्त्व—मालतीमाधवांतील नायिका मालती हिचें अभिजनत्व—तिची कुलकीर्तिविषयी व चारित्र्याविषयी आस्था—तिच्या तुलनेंत मकरंद मदयंतिका हीं दुय्यम पात्रें—उत्तररामांतील उदात्त चित्रण—भवभूतीचीं मंगलाचरणें—मालतीमाधवांतील 'कल्याणानां त्वमसि' या सूर्यनमस्कारात्मक मंगलाचरणाचें महत्त्व.

३. प्रा. पां. कृ. सावळापूकर

भवभूतीचें नाटयतंत्र

भवभूतीच्या नाट्यतंत्राचा निकष—तत्कालीन तंत्रविषयक कल्पना व तत्कालीन स्थळकाळ, संस्कृति व परंपरा—भवभूतीच्या नाट्यकथानकाची परभृतता व त्याचें स्वरूप—भवभूतीच्या नाट्यतंत्राचीं वैशिष्टचें—(१) नटी सूत्रधार प्रवेशांत अन्यत्र दिसणाऱ्या संदिग्धतेचा व कालविपर्यासाचा अभाव—(२) ठसठशीत विष्कंभक (३) नाटकांतील लहान मोठे कडक नरम संघर्ष (४) भवभूति—प्रणीत दिव्य, अदिव्य व दिव्यादिव्य भूमिका (५) कथावस्तूची परिपूर्णता (६) गर्भनाटकाची योजना (७) पताकास्थानें (८) पात्रांचें वेषांतर व त्यांचें कार्य (९) दृश्यादृश्यपात्राचें रंगभूमीवर एककालिक संचरण (१०) इतर संकीर्ण वैशिष्टचें, भाषा, स्वभावपरिपोष, रसवत्ता इ.—भवभूतीच्या नाट्यविषयक कल्पना—भवभूतीच्या नाटकांचें पर्यवसान 'भवभूति' (म्ह. जगत्कल्याण) हेंच आहे.

४ प्रा. श्री. भा. वर्णेकर

भवभूतीच्या वाङ्मयांतील समाजजीवन

प्रतिभाविलासासाठी लिहिलेल्या नाटकांत अनुषंगाने कांही समाजस्थितीचे उल्लेख येणें अपरिहार्य असतें. पण त्यावरून काढलेलीं अनुमानें योग्यच असतील असें नाही—भवभूतीची रचना पांडित्य व वैदग्ध्य यांचें

प्रात्यक्षिक दाखविण्यासाठी केली आहे. सामाजिक विषयाचा उहापोह करण्यासाठी नाही. पुरुष नटांनी केलेल्या स्त्री भूमिका–सहशिक्षण घेणारे विद्यार्थी –विवाहित विद्यार्थी–मदन महोत्सव–बौद्धपंथीयाचें शंकरगृहाकडे आगमन इ.

५ डा. वि. वा. करंबेळकर

भवभूतीचें काव्यदर्शन

समानधर्म रसिक–कांही सामान्य माहिती–बहिरंगाची तपासणी–त्याचे शब्दालंकार–पिक आणि आम्रमंजरी–निसर्गवर्णन–संपृक्तौ पार्वतीपरमेश्वरौ–गद्यासाठी गौडी आणि पद्यासाठी वैदर्भी–भवभूतीची भावलिंगित भाषा–सुभाषितांचा नजराणा–भावः द्रव्यवत् प्रकाशते–भवभूति हा प्राधान्येंकरून रसकवि–निष्ठेचीं आलंबनें–सर्वं अतिमात्रं दोषाय–कालिदास आणि भवभूति यांच्या बैठकीच वेगळ्या आहेत.

६ श्री. वि. रा. काटे

भवभूतीचा करुण रस

'भवभूति म्हणजे करुणरस', असें समीकरण उत्तररामचरित्राच्या एकाच उदाहरणानें सिद्ध होतें. 'एको रसः करुण एव निमित्तभेदात् । भिन्नः पृथक् पृथगिदाश्रयते विवर्तान् । आवर्तबुद्बुदतरंगमयान् विकारान् । अंभो यथा सलिलमेवहि तत्समग्रम् । हा भवभूतीचा सिद्धान्त त्यानें आग्रहानें 'करुण एव रसः ।' असें म्हणून दृढमूल केला आहे. करुण रस हा शृंगार वा हास्याप्रमाणे क्षणोत्तेजक नसून चिरपरिणामी आणि प्रभावोत्पादक असा स्थायी रस आहे.

विदर्भ साहित्य संमेलन, अधिवेशन १९ वें, गोंदिया

संमेलनांत सम्मत झालेले ठराव

ठराव १—पुढील माननीय साहित्यिक व साहित्यप्रेमी व्यक्ती गेल्या वर्षी दिवंगत झाल्याने भारताची व विशेषत: मराठी साहित्याची फारच हानी झाली आहे. हें संमेलन यांच्या निधनाबद्दल अत्यंत दु:ख व्यक्त करितें आणि त्यांस सद्‌गति चिंतितें—

डॉ. भाऊजी दप्तरी	श्री. वि. मा. वाईकर
वीर वामनराव जोशी	श्री. बा. सी. मर्ढेकर
श्री. गोविंदराव टेंबे	डॉ. भीमराव रामजी आंबेडकर
श्री. दाजी नागेश आपटे	श्री. व्हानुसा क्षत्रिय
श्री. आपटे गुरुजी	पं. रविशंकर शुक्ल
श्री. संत गाडगे महाराज	श्री. गजाननराव पटवर्धन
श्री. पांडुरंगशर्मा, आळंदी	

(अध्यक्षांकडून)

ठराव २—(अ) पूर्वीच्या मध्यप्रदेश सरकारने स्थापन केलेल्या शासन साहित्य परिषदेने इष्ट दिशेने साहित्यास प्रोत्साहन देण्याचें धोरण आखून त्यासाठी निधीहि ठेवला आहे. या निधींत योग्य ती भर घालून नव्या मुंबई सरकारने विदर्भांत मराठी साहित्यास प्रोत्साहन देण्याचा उपक्रम कायम ठेवावा, अशी या संमेलनाची राज्यसरकारास आग्रहाची विनंती आहे.

(ब) जुन्या मध्यप्रदेश सरकारने शासनसाहित्य परिषद् निर्माण केली होती; त्याप्रमाणे नवीन मुंबई राज्याकरिताहि शासनसाहित्य परिषद् निर्माण करण्यांत यावी अशीहि राज्यसरकारास ह्या संमेलनाची आग्रहाची विनंती आहे.

(अध्यक्षांकडून)

ठराव ३—मराठी लेखनाची सर्वमान्य अशी प्रमाणित आणि अधिकृत पद्धति तयार करण्यासाठी राज्यसरकार, या राज्यांतील विद्यापीठें आणि मराठी साहित्यसंस्था यांच्या प्रतिनिधींची समिति नेमून तिच्यामार्फत राज्यसरकारने तावडतोब आस्थापूर्वक प्रयत्न करावेत अशी या संमेलनाची विनंती आहे.

(अध्यक्षांकडून)

ठराव ४—राज्यघटनेनुसार पुराणवस्तुसंशोधन हा विषय केंद्रसरकार व राज्यसरकार ह्या दोन्हीहि सरकारांच्या कार्यांच्या यादींत समाविष्ट आहे. केंद्रसरकारचें पुराणवस्तुसंशोधनखातें

फक्त राष्ट्रीय महत्त्वाच्या अवशेषांचें संरक्षण करतें. पण इतर अवशेषांचें संरक्षण त्या त्या राज्य-सरकारांनी करावें, अशी भारत सरकारची अपेक्षा आहे. म्हणून या संमेलनाची मुंबई राज्यसरकारला अशी आग्रहाची विनंती आहे की, त्यांनी ह्या राज्यासाठी स्वतंत्र पुराणवस्तुखातें उघडावें व या कार्यास नवीन चालना द्यावी.

(अध्यक्षांकडून)

ठराव ५--मुंबई राज्याने त्या राज्यांतील जिल्ह्यांचीं 'गॅझेटियर्स' सुधारणा करून पुन्हा छापण्याची व्यवस्था केली आहे, असें समजतें. त्या योजनेंत मुंबई राज्यांत नवीन समाविष्ट झालेल्या जिल्ह्यांच्या गॅझेटियर्सचाहि समावेश व्हावा, अशी या संमेलनाची मुंबई राज्यसरकारास आग्रहाची विनंती आहे.

(अध्यक्षांकडून)

ठराव ६—सध्या मराठींत अनेक महत्त्वाचीं व उपयुक्त पुस्तकें दुर्मिळ झालेलीं आहेत. त्यामुळे अभ्यासकांची फार गैरसोय होते. कालांतराने हीं पुस्तकें पूर्णपणें नष्ट होण्याचाहि संभव आहे. अशा दुर्मिळ पुस्तकांचें पुनर्मुद्रण होणें या संमेलनाला आवश्यक वाटतें. या बाबतींत विदर्भ साहित्य संघाने योग्य ती कार्यवाही शक्य तों लौकर करावी अशी हें संमेलन विनंती करतें.

(अध्यक्षांकडून)

ठराव ७ (अ)—रामटेकला कालिदास स्मारक करण्याबद्दल योजना पूर्वीच्या मध्यप्रदेश सरकारने करून त्यासाठी एक लाख रुपयांची रक्कम मंजूर केली होती. परंतु नव्या प्रांतघटनेच्या वेळीं ती योजना मागे पडली. तरी नव्या राज्यसरकारने राज्यास अत्यंत गौरवास्पद असें हें या महाकवीचें स्मारक येथे उभारण्याचें कार्य पार पाडावें आणि जिज्ञासू प्रवाशांना (टुरिस्ट) येथे अल्पकाळ राहून तें पाहतां येईल अशी व्यवस्था करावी, अशी या संमेलनाची राज्यसरकारास आग्रहाची विनंती आहे.

तसेंच--

(ब) वैदर्भीय महाकवि भवभूति याचें जन्मस्थान भंडारा जिल्ह्यांतील गोंदिया—आमगांव जवळचें पद्मपूर या ठिकाणीं आणि त्याच जिल्ह्यांतील वैनगंगा नदीचे तीरीं आंभोरा या ठिकाणीं गुरुपरंपरेचा संबंध असलेले आद्य मराठी कवि मुकुंदराज यांचें स्मारक करावें आणि या दोन्हीहि ठिकाणीं जिज्ञासु प्रवाशांना उतरण्याची व्यवस्था करावी, अशी या संमेलनाची राज्य-सरकारास आग्रहाची विनंती आहे.

सूचक—म. म. वा. वि. मिराशी

अनुमोदक—१ श्री. वि. अ. लिमये
२ श्री. रु. वा. रानडे

अनुक्रमणिका

ठराव ८—पुराणलेख विभागाध्यक्षाची (गव्हर्मेंट एप्रिग्राफिस्ट फॉर इंडिया यांची) कचेरी उटकमंडहून हलवावी अशी सूचना भारत सरकारपुढे विचारासाठी बरेच दिवसांपासून आहे. परंतु दिल्ली, मद्रास, कलकत्ता वगैरे सारख्या ठिकाणीं आधीच जागेची अडचण असल्याने सरकारला ती कचेरी आजपर्यंत हलवितां आली नाही. देशाच्या एका टोकाला असलेली ही सर्वांस अत्यंत उपयुक्त कचेरी नागपुरास योग्य अशा इमारती आता उपलब्ध असल्याने आणि नागपूर विद्यापीठाच्या प्राचीन भारतीय इतिहास व संस्कृति या विषयाच्या अभ्यासाकरिता स्वतंत्र विभाग असल्याने मध्यवर्ती सरकारने ती कचेरी नागपुरास आणावी, अशी या संमेलनाची सरकारास आग्रहाची विनंती आहे. नागपूर हें शहर भारतांत मध्यवर्ती असल्याने ही कचेरी तेथे घेणें सर्वांस अतिशय सोईचें व अभ्यासकांस अत्यंत उपयुक्त होईल. नागपूर शहराचें महत्त्व कायम ठेवण्याचें सरकारी धोरणहि ह्या योजनेमुळे अमलांत येण्यास मदत होईल.

सूचक—प्रा. भ. श्री. पंडित
अनुमोदक— श्री. दे. गो. लांडगे

ठराव ९—(अ) विदर्भ साहित्य संघाच्या साहित्यविनीत परीक्षेस पूर्वीच्या मध्यप्रदेश शासनाने मान्यता देऊन ती उत्तीर्ण होणाऱ्यास डिपार्टमेंटल परीक्षेला न बसण्याची सुविधा दिली होती; ती तशीच पुढे चालू असावी, अशी संमेलनाची राज्यसरकारास विनंती आहे.

(ब) नागपूर विद्यापीठांत मराठी व हिंदी माध्यम आवश्यक होतांच विद्यापीठाने संघाच्या साहित्यस्नातक परीक्षेस मान्यता देऊन मराठी मातृभाषा नसणाऱ्या प्राध्यापकाने मराठींतून विषय शिकवावयाचा असल्यास स्नातक परीक्षा उत्तीर्ण होणें आवश्यक केलें होतें. परंतु ही मान्यता नंतर अकारण काढून टाकण्यांत आली. हें संमेलन विद्यापीठास विनंती करितें की, विद्यापीठाने ही मान्यता पुन्हा सुरू करावी.

सूचक—प्रा. पां. कृ. सावळापूरकर
अनुमोदक—१ श्री. रा. पु. सगदेव
२ श्री. तु. ना. काटकर

ठराव १०—(अ) प्रकाशन हक्क (कॉपीराइट) कायद्याच्या दुरुस्तीचें विधेयक सध्या संसदेपुढे विचारार्थ आहे, त्यांत प्रवर समितीने "हा हक्क लेखकांच्या मृत्यूनंतर २५ वर्षें त्यांच्या वारसांकडे राहावा", म्हणून सूचना केली आहे. तिला या संमेलनाचा पाठिंबा आहे.

(ब) पुस्तकांचें भाषांतर करण्याबाबतचा हक्क प्रकाशनानंतर फक्त दहा वर्षांपर्यंतच लेखकांकडे राहील. असें कलम विधेयकांत आहे; त्याला या संमेलनाचा विरोध असून मूळ कायद्यांत "दहा वर्षें हा हक्क मूळ लेखकांकडे रहात असून, त्या मुदतींत भाषांतर न झाल्यास त्यानंतर भाषांतर करण्याबद्दल लेखकांस अथवा त्याच्या वारसास दहा टक्के (रायल्टी) मिळण्याचा हक्क आहे." असा नियम आहे. तो नव्या कायद्यांतहि कायम ठेवण्यांत यावा.

(क) धर्मार्थ नाटयप्रयोगाबद्दल नाटककारांस कांही देण्यांत येऊं नये, अशी नव्या विधेयकांतील सूचना अन्याय्य असल्याने तिलाहि या संमेलनाचा विरोध आहे. तरी ते शब्द गाळण्यांत यावेत.

(ड) याशिवाय प्रस्तुत विधेयकांत अनेक दुरुस्त्या आवश्यक असल्यामुळे देशांतील साहित्य संस्थांच्या प्रतिनिधींना विचारार्थ बोलावून व त्यांचें मत लक्षांत घेऊन प्रस्तुत विधेयकांत प्रवरसमितीने दुरुस्त्या सुचवाव्यात.

सूचक—श्री. द. रा. गोमकाळे

अनुमोदक—श्री. पां. बा. गडकरी

ठराव ११—राज्यपुनर्रचनेचे वेळीं मराठी भाषी विभाग नवीन मुंबई राज्यांत एकत्रित आणतांना महाविदर्भाशीं संलग्न असलेले बऱ्हाणपूर, भैसदेही, मुलताई, संसर, बालाघाट व वाराशिवनी हे तालुके आणि बस्तर व बैतुल जिल्ह्यांतील मराठीभाषी भाग, तसेंच जुन्या हैदराबाद राज्यांतील कांही मराठीभाषी भाग आणि जुन्या मुंबई राज्यांतील बेळगाव, कारवार इत्यादि भाग नवीन मुंबई राज्यास जोडण्यांत आले नाहीत ही मोठीच उणीव अखंड महाराष्ट्राच्या दृष्टीने राहिली आहे. याकडे हें संमेलन सरकारचें लक्ष वेधीत असून झोनल कौन्सिलमध्ये हा प्रश्न उपस्थित करून हे भाग मुंबई राज्यांत तावडतोब एकत्र येतील अशी व्यवस्था सरकारने करावी अशी हें संमेलन आग्रहाची विनंती करीत आहे.

सूचक—श्री. ए. श्री. पटवर्धन

अनुमोदक—१ श्री. ना. ह. तेलंग

२ श्री. अलोणी

ठराव १२—(अ) विदर्भातील राज्यकारभार राज्यपुनर्घटनेपूर्वी मराठींत चालू झालेला होता. नव्या मुंबई राज्याच्या मराठी भागांत शासनाची भाषा मराठीच राहील असें आश्वासन मुख्य मंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांनी दिलें आहे, याबद्दल या संमेलनाला संतोष होत आहे. तथापि प्रत्यक्ष व्यवहारांत मात्र मराठीऐवजी इंग्रजी भाषेचा पुन्हा वापर होऊं लागलेला आढळतो, ही गोष्ट आम्ही शासनाच्या निदर्शनाला आणून देऊं इच्छितों. या बाबतींत शासनाने लक्ष घालून सर्व क्षेत्रांत राज्यकारभार साक्षेपाने मराठींतून चालू राहील अशी तावडतोब व्यवस्था करावी, अशी ह्या संमेलनाची विनंती आहे. हें धोरण मुंबई राज्यांतील सर्व मराठी विभागाला लागू होण्यासाठी आवश्यक असें राज्यभाषा विधेयक तयार करून ते मंजूर करण्यांत यावें.

सूचक—प्रा. ग. त्र्यं. देशपांडे

अनुमोदक—१ श्री. य. गो. मालोदे

१ श्री. चं. प. भिशीकर

संघवार्ता

केंद्रवृत्त, नागपूर

(प्रा.) श्री. गो. काशीकर
सरचिटणीस, वि. सा. संघ
यांजकडून

श्री. न्या. अण्णासाहेब मंगळमूर्ति यांचा सत्कार.

विदर्भ साहित्य संघाचे कार्यकारी विश्वस्त, न्या. मू. के. तु. ऊर्फ अण्णासाहेब मंगळमूर्ति यांच्या षष्टयब्दिपूर्ति निमित्त विदर्भ साहित्य मंदिरांत त्यांचा सत्कारसमारंभ शुक्रवार दि. ११-१-५७ रोजीं सायंकाळीं ६-३० वा. झाला. संघाध्यक्ष, श्री. बाळासाहेब ढवळे, प्रा. श्री. गो. काशीकर यांचीं या प्रसंगीं गौरवपर भाषणें झालीं. लो. ना. बापूजी अणे या प्रसंगीं उपस्थित होते. "श्री. अण्णासाहेब यांचे समाजावर आजपर्यंत इतके उपकार झाले आहेत की, समाजाने ते फेडूं म्हटलें तरी फिटणार नाहीत." असे अभिमानास्पद उद्गार त्यांनी काढले. श्री. अण्णासाहेब मंगळमूर्ति आपल्या भाषणांत म्हणाले, 'माझे जिवलग मित्र माझीं सर्व कामें पार पाडतात व श्रेय मला देतात" विदर्भ साहित्य संघ चिटणीस श्री. य. गो. मालोदे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

अल्पोपहार व चहापानानंतर हा कार्यक्रम संपला.

* *

नाट्य समिति

विदर्भ साहित्य संघाच्या नाटयसमितीच्या सहकारी नाटयोत्सव समितीचा सांगतासमारंभ रविवार दि. १३-१-५७ रोजीं सकाळीं ८ वा. झाला. या प्रसंगीं समितीचे अध्यक्ष, सरचिटणीस व वि. सा. संघाचे सरचिटणीस यांचीं भाषणें झालीं. सहकारी नाटयोत्सव समितीतर्फे विदर्भ-साहित्य संघाच्या मंदिरनिधीला खर्च वजा जातां ६,७०० रु. देण्यांत येत असल्याचें जाहीर करण्यांत आलें व त्याप्रमाणे ६,२०० रुपयांचा चेक उपाध्यक्ष श्री. शेंडे यांच्या हवालीं करण्यांत आला. अल्पोपहार व चहापान झाल्यावर हा कार्यक्रम संपला.

* *

सांस्कृतिक कार्यक्रम समिति

विदर्भ साहित्य संघाच्या सांस्कृतिक कार्यक्रम समितीतर्फे श्री. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचीं दोन व्याख्यानें झालीं. पहिलें व्याख्यान रविवार दि. २० जानेवारी रोजीं सायंकाळीं ७ वा. बुटीसभागृहांत 'ध्येयवादाचा संगर' या विषयावर व दुसरें व्याख्यान सोमवार दि. २१

जानेवारी रोजीं सायंकाळीं गडकरी स्मारक सभागृहांत "वस्तुस्थिति व ध्येयवाद" या विषयावर झालें.

* *

गडकरी स्मारक समिति

विदर्भ साहित्य संघाच्या गडकरी स्मारक समितीतर्फे कै. राम गणेश गडकरी यांचा ३८ वा स्मृतिदिन दि. २२ व २३ जानेवारी रोजीं महाराष्ट्रांतील विद्वान साहित्यिक तर्कतीर्थ लक्ष्मण-शास्त्री जोशी यांच्या अध्यक्षतेखाली झाला. दि. २२ रोजीं सायंकाळीं ९-३० वा. कै. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर आणि कै. राम गणेश गडकरी यांच्या प्रतिमांचें अनावरण झालें. त्यानंतर प्रा. भ. श्री. पंडित यांच्या "गडकऱ्यांची खरी भूमिका?" या विषयावरील प्रबंधाचें वाचन झालें. दि. २३ रोजीं प्रतिमापूजन व विविधसंस्थांतर्फे प्रतिमांना हारसमर्पण व अध्यक्षीय भाषण हे प्रमुख कार्यक्रम झाले.

शाखा वृत्त —

यवतमाळ शाखा :

विदर्भ साहित्य संघाचे चिटणीस श्री. य. गो. माल्ोदे यांनी यवतमाळ येथील कांही प्रतिष्ठित साहित्यप्रेमियांशीं यवतमाळ येथे शाखा स्थापन करण्यासंबंधी विचारविनिमय केला. श्री. दि. य. महाजन वकील प्रभृतींचे त्यासंबंधी प्रयत्न सुरू झाले आहेत.

* *

हिंगणघाट शाखा :

विदर्भ साहित्य संघाच्या हिंगणघाट शाखेचें कार्यकारी मंडळ अविरोध निवडून आलें. त्यांचीं नांवें पुढीलप्रमाणे—अध्यक्ष, श्री. रा. ज. देशपांडे; सभासद, श्री. वि. कृ. देशपांडे, श्री. स. कृ. चेपे, श्री. शि. गो. सपाटे, श्री. का. ब. धात्रक. स्थानिक अध्यक्षांनी श्रीमती विमल हरिभाऊ घरोटे यांची नियुक्ती केली. विदर्भ साहित्य संघाच्या अध्यक्षांनी वरील कार्यकारी मंडळावर श्री. ना. ल. पोतदार यांची सभासद म्हणून नियुक्ती केली.

* *

विदर्भ साहित्य संघाचे नवीन आजीव सभासद

१ श्री. वसंत खेडीकर, नागपूर

विदर्भ साहित्य संघाला मिळालेल्या देणग्या

मुंबई मराठी साहित्य संघाचे कार्यवाह श्री. दि. वि. आमोणकर यांनी वि. सा. संघाच्या नाटय समितीचे चिटणीस श्री. द. रा. गोमकाळे यांना पत्र लिहून साहित्य संघाच्या रंगमंदिराला १०१ रु. ची देणगी पाठविली आहे.

विदर्भ साहित्य संघ देणगीदारांचा अत्यंत आभारी आहे.

अनुक्रमणिका

माननीयांच्या भेटी

भारत सरकारच्या वार्ता व नभोवाणी खात्याचे सचिव श्री. पु. मं. लाड यांनी विदर्भ साहित्य संघाला दि. ९-१-५७ रोजीं सायंकाळीं भेट दिली. त्या प्रसंगीं त्यांना विदर्भ साहित्य संघाच्या कार्याची माहिती करून देण्यांत आली. नंतर झालेल्या अनौपचारिक बैठकींत नागपूरच्या अनेक पंडितांनी भाग घेतला व काव्यशास्त्रविनोदाने ही बैठक रंगली.

श्री. सरचिटणिसांनी सन्माननीय पाहुण्यांना संघाच्या कार्यकर्त्यांचा व कार्याचा परिचय करून दिला.

साहित्य अकादमीच्या मराठी सल्लागार समितीच्या वार्षिक सभेच्या निमित्ताने नागपूरला आलेली नामवंत साहित्यिक मंडळी व अकादमीचे उपसचिव श्री. प्रभाकर माचवे यांना विदर्भ साहित्य संघातर्फे दि. २३-१-५७ रोजीं सायं. ४-३० वा. चहा व अल्पोपहार देण्यांत आला. उपस्थित सदस्य श्री. मामा वरेरकर, श्री. म. म. दत्तो वामन पोतदार, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, डॉ. नांदापूरकर व सौ. कुसुमावतीबाई देशपांडे यांनी त्या प्रसंगीं वि. सा. संघाच्या कार्यकारिणीच्या उपस्थित सदस्यांचा व पूर्वाध्यक्षांचा परिचय करून दिला व वि. सा. संघाच्या कार्याची समितीला माहिती करून देण्यांत आली.

गोंदिया येथील विदर्भ साहित्य संमेलनाचा अहवाल

विदर्भ साहित्य संघाचें १९ वें संमेलन गोंदिया यथील मनोहरभाई नगरपालिका विद्यालयाच्या प्रशस्त जागेंत दि. २७ व २८ जानेवारी १९५७ रोजीं अत्यंत थाटांत पार पडलें. आकर्षक व भव्य मंडप, उत्कृष्ट भोजन, उच्च दर्जाचे साहित्यिक कार्यक्रम, अत्यंत स्नेहपूर्ण व खेळीमेळीचें वातावरण व व्यवस्थितपणा ह्या दृष्टींनी हें संमेलन आदर्श झालें असेंच म्हटलें पाहिजे.

संमेलनाकरिता प्रतिनिधि, आमंत्रित व स्वागतमंडळाचे सदस्य मिळून अदमासें ३०० लोक उपस्थित होते.

संमेलनांत पुढीलप्रमाणे कार्यक्रम झाले.

शनिवार दि. २६-१-५७ रात्रौ ९। वा. स्थानिक कलावंतांनी माहेरघर नाटक उत्कृष्टपणें सादर केलें.

रविवार दि. २७-१-५७ सकाळीं ११ वा. केंद्रीय कार्यकारी मंडळाची सभा झाली. ह्या सभेंत मागील सभेचा अहवाल वाचून झाल्यानंतर कोषाध्यक्षांनी डिसेंबर अखेरपर्यंतचें आर्थिक निवेदन व सरचिटणिसांनी कार्यविषयक निवेदन सादर केलें व तें मंजूर झालें. नंतर नाटयमहोत्सवाचें उत्पन्न मंदीरनिधीस देण्यास व नाटयस्पर्धाविषयक खोलखुटे ढाल स्वीकारण्यास मंजुरी देण्यांत आली. सभासदत्वाकरिता आलेल्या अर्जांनाहि संमति देण्यांत आली. नंतर सेवक व्यवस्थेसंबंधी विचार करण्यांत आला व शेवटीं संमेलनांत मांडावयाच्या ठरावांना मंजुरी देण्यांत आली.

दुपारीं २ वा. साधारण सभेची बैठक होऊन मागील सभेचा अहवाल स्वीकारण्यांत आला.

दुपारीं २॥ वा. विषयनियामक समितीची सभा होऊन तींत संमेलनांत मांडावयाचे ठराव स्वीकृत करण्यांत आले.

सायंकाळीं ५। वा. खुलें अधिवेशन झालें. स्वागतगीतानंतर स्वागताध्यक्ष श्री. छोटुसा क्षत्रिय यांच्या अनुपस्थितीमुळे कार्याध्यक्ष श्री. ना. ह. तेलंग यांनी स्वागतपर भाषण केलें. त्यानंतर संमेलनाध्यक्षांची रीतसर निवड करण्यांत आली; व हार समर्पणानंतर उद्घाटक तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी उद्घाटनपर भाषण केलें. संदेशवाचनानंतर संमेलनाध्यक्ष श्री. पुरुषोत्तम दिवाकर ढवळे यांचें भाषण झालें. शेवटीं वंदेमातरम् गीत झालें.

रात्रौ ९। वा. सारस्वत मंडळ, नागपूर, यांचे वतीने 'उद्याचा संसार' ह्या नाटकाचा उत्कृष्ट प्रयोग झाला.

सोमवार दि. २८-१-५७ सकाळीं ८॥ वा. भवभूतीविषयक परिसंवाद झाला. यांत म. म. वा. वि. मिराशी, प्रा. ग. त्र्यं. देशपांडे, प्रा. पां. कृ. सावळापूरकर, प्रा. श्री. भा. वर्णेकर, प्रा. डॉ. वि. वा. करंबेळकर व श्री. वि. रा. काटे यांनी भाग घेतला. प्रा. वर्णेकर व डॉ. करंबेळकर यांचीं भाषणें वाचून दाखविण्यांत आलीं.

सकाळीं १०॥ वा. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचें 'सृजनशील साहित्य व समाज' ह्या विषयावर व्याख्यान झालें. मुख्यमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांच्या अनुपस्थितीमुळे त्यांचें भाषण होऊं शकलें नाही.

दुपारीं १२ वा.—संमेलनाकरिता जमलेल प्रतिनिधि, स्वागत समितीचे सदस्य व गावांतील प्रतिष्ठित साहित्यप्रेमी नागरिक यांना मेजवानी देण्यांत आली.

दुपारीं ३ वा. प्रतिनिधि व स्वागतमंडळाचे कार्यकर्ते यांच्या परिचयाचा रोचक कार्यक्रम होऊन नंतर साहित्यचर्चा झाली.

सायंकाळीं ५॥ वा. खुलें अधिवेशन व समारोपाचा कार्यक्रम झाला. अधिवेशनांतील सर्वच ठराव एकमताने मंजूर करण्यांत आले. सुरुवातीस दिवंगतांना श्रद्धांजलि अर्पण करण्यांत आली. शेवटीं समारोपाचीं भाषणें झालीं. संमत झालेले ठराव इतरत्र दिले आहेत.

रात्रौ ९॥ वा. विविध मनोरंजनाचा कार्यक्रम झाला. यांत नृत्य, गीत, काव्यगायन व श्रीमती विनोदिनी दीक्षित यांचें सुश्राव्य गायन हे कार्यक्रम झाले. वेळेच्या अभावीं कविसंमेलन मात्र रद्द करावें लागलें. ह्यावेळीं श्री. कुळकर्णी यांनी लिहिलेल्या मेवा काव्याचें संमेलनाध्यक्षांचे हस्तें प्रकाशन झालें.

मध्यप्रदेश संशोधन मंडळ, शारदाश्रम-यवतमाळ, समाजसेवा विभाग व विदर्भ साहित्य संघ यांचे वतीने संमेलनांत ऐतिहासिक व साहित्यिक सामुग्रीचें प्रदर्शनहि भरविण्यांत आलें.

प्रस्तुत संमेलन यशस्वी करण्याकरिता श्रीमान् मनोहरभाई पटेल, श्रीमान् छोटुभाई क्षत्रिय, श्री. ना. ह. तेलंग, श्री. के. खं. कुळकर्णी, श्री. ना. गं. डबीर, श्री. छेदीलाल गुप्त, श्री. ग. गो. व्यवहारे, श्री. वि. अ. लिमये, श्री. बा. का. देशमुख, श्री. प्र. शं. तनखीवाले, श्री. शेखदार, इ० असंख्य कार्यकर्त्यांचें, दात्यांचें व गोंदियावासी जनतेचें बहुमोल साहाय्य झालें आहे. त्या सर्वांचा विदर्भ साहित्य संघ ऋणी आहे. संमेलनाध्यक्ष श्री. बाळासाहेब ढवळे, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, परिसंवादांतील वक्ते, नाटककर्ते, प्रकाशन विभाग, नागपूर नभोवाणी, गोंदिया नगरपालिका, मध्यप्रदेश संशोधन मंडळ, शारदाश्रम-यवतमाळ, समाजसेवा विभाग, प्रतिनिधि व इतर असंख्य सहाय्यकर्ते यांचाहि विदर्भ साहित्य संघ आभारी आहे.

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघ

१९ वें वार्षिक सम्मेलन, गोंदिया

स्वागताध्यक्ष श्री छोटुसा लहानुसा क्षत्रीय यांचें भाषण

दिनांक २७ जानेवारी १९५७

संमेलनाध्यक्ष श्री. बाळासाहेब ढवळे, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, विद्वज्जन, साहित्यिक व साहित्यप्रेमी बंधुभगिनींनो !

१९४८ सालीं विदर्भ साहित्य सम्मेलनाच्या वेळीं ह्या शहरांत आपल्या सर्वांचें स्वागत करण्याचा मान आम्हांला मिळाला होता. आज आपल्या सर्वांच्या सहवासाचा व मार्गदर्शनाचा पुन्हा योग आला आहे. याबद्दल आम्हा गोंदियावासियांना सानंद अभिमान वाटतो. त्या वेळच्या व आजच्या परिस्थितींत महदन्तर पडलें आहे. त्या वेळीं देशाला स्वातंत्र्य जरी प्राप्त झालें होतें तरी अनेक अराष्ट्रीय व विघातक प्रवृत्तींनाहि ऊत आला होता. साऱ्या देशांत एक प्रकारचें कटुतेचें व तंग वातावरण निर्माण झालें होतें. महात्मा गांधींच्या मृत्यूमुळे मराठी प्रदेशांत तर साशंकतेची व दुःखद परिस्थिति निर्माण झाली होती. अशा स्थितींतहि त्या वेळचें अधिवेशन भरविण्याचा खटाटोप आम्ही केला होता. तथापि सर्वांच्या सहकार्यानें तें अधिवेशन अपेक्षेच्या पलीकडे यशस्वी झालें व आपण सर्वांनी त्या वेळीं आमची सेवा आनंदाने व समाधानाने रुजू करून घेतली होती. आठ वर्षांचा काळ लोटल्यानंतर हें सम्मेलन येथे भरविण्याचें धाडस आम्ही पुन्हा केलें आहे. कवि भवभूतीच्या तपोभूमींत हें सम्मेलन भरवावें असा आमचा संकल्प होता. गेल्या वर्षीच्या तुमसरच्या अधिवेशनांत, आमच्या शहरांतीलच नव्हे तर आमच्या जिल्ह्यांतील सर्वांत थोर, उदार, रसिक व कलाप्रेमी आणि सेवाभावी नागरिक श्रीमान् मनोहरभाई पटेल यांनी निमंत्रण दिलें. निसर्गाच्या सान्निध्यांत व वनश्रीच्या रम्य, सोज्जळ आणि पुनीत वातावरणांत हें अधिवेशन भरलें असतें तर आम्हांला व आपण सर्वांना अधिक आनंद झाला असता.

अनुक्रमणिका

पण व्यावहारिक अडचणींमुळे व विशेषत: श्रीमान् मनोहरभाई पटल यांच्या आकस्मिक आजारामुळे, आमगांव येथे सम्मेलन भरविण्याची जबाबदारी उचलण्याला आम्ही स्वत:ला असमर्थ समजलों व या शहरांतच आपल्या सर्वांचें पुन्हा स्वागत व सेवा करण्याचें ठरविलें.

मराठी भाषिकांच्या दृष्टीने एका महत्त्वाच्या राजकीय कालखंडांत आपण सर्वांनी नुकताच प्रवेश केला आहे. संयुक्त महाराष्ट्राचें स्वप्न जरी साकार झालें नसलें, तरी सर्व मराठी भाषिक जनता—बेळगांव, सौंसर इत्यादि अगदी थोडया भागांतील वगळून—एकाच राज्यव्यवस्थेखाली आली आहे. मराठी भाषा, साहित्य व संस्कृती यांचें संवर्धन व पोषण, इतर प्रादेशिक भाषा, साहित्य व संस्कृती यांच्याशीं अविरोध वृत्तीनेच नव्हे, तर सहजीवनाच्या भूमिकेवरून करून भारतवर्षाला गौरव व सन्मान प्राप्त करवून देऊन, साऱ्या जगताचें आध्यात्मिक व सांस्कृतिक नेतृत्व करण्याचें महान कार्य करण्याला आम्हा सर्व मराठीभाषिकांना अनुकूल अशी शासनाची सोय निर्माण झाली आहे. माझ्या मतें विशाल द्विभाषी मुंबई प्रदेशाची निर्मिति मराठी भाषिकांच्या उत्कर्षाला व अभिवृद्धीला सर्व प्रकारें हितावह आहे. मराठी व गुर्जर बंधू अनेक शतकांपासून शेजारीं राहून, खेळीमेळीचें व बंधुभावाचें जीवन घालवीत आले आहेत. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितींत अनेक अडचणी निर्माण झाल्या, जनतेला अनेक कष्ट व यातना सहन कराव्या लागल्या व प्रसंगीं मराठी भाषिकांना मानखंडनेच्या प्रसंगांनाहि तोंड द्यावें लागलें. मराठी प्रदेशाचे तुकडे करण्याच्या मनसुब्यांना हाणून पाडण्यांत स्वकीयांशींच विरोधहि पत्करावा लागला, अनेक दिव्यांतून जावें लागलें; पण शेवट गोड असाच झाला हें माझें स्पष्ट मत आहे. आमचे कांही बंधू या विचारांशीं सहमत नाहीत याची मला जाणीव आहे. त्यांच्या मताला योग्य मान व आदर दाखवून, माझें हें मत मी स्पष्टपणें जाहीर करूं चाहतों.

गोंदिया तहसील ही मराठी प्रदेशाच्या पूर्व सीमेवर वसली आहे. ह्या प्रदेशाच्या विकासांत अ-मराठी भाषिकांनीहि फार मोठा हातभार लावला आहे. सुरवातीपासून ह्या ठिकाणीं सर्व भाषिक लोक परस्परांचा द्वेष किंवा हेवादावा न करतां राष्ट्रसेवा व जनतेचें कल्याण करण्याच्या उच्च भावनेने प्रेरित होऊन, खांद्याला खांदा लावून, एकाच भारतमातेचे पुत्र आहोंत ह्या बंधुभावाने उत्साहित होऊन कार्य करीत आले आहेत. परंतु कालांतराने मात्र ह्या ठिकाणीं आमच्यांत कांही तडे पडले व आमची राष्ट्रीय दृष्टि दूषित झाली. मराठी भाषेची ह्या ठिकाणीं गळचेपी होईल की काय अशीहि भीति निर्माण झाली. तथापि जें झालें तें झालें. तो कालखंड आता संपला आहे. हिंदी व ह्या ठिकाणच्या अन्य भाषा यांना भगिनी मानूनच ह्या ठिकाणीं मराठीचा विकास होत राहील. हिंदीला राष्ट्रभाषेचा दर्जा प्राप्त करवून देण्याकरिता लोकमान्य टिळक, रानडे व स्वातंत्र्यवीर सावरकर यांसारख्या मराठी महापुरुषांनी जे भगीरथ प्रयत्न केले, तसेंच कै. माधवराव सप्रे व श्री. बाबुराव पराडकर यांसारख्या मराठी मातृभाषा असलेल्यांनी हिंदीला दर्जा व गौरव प्राप्त करून देण्याकरिता जे कष्ट भोगले त्याचा विसर कुणालाच पडतां

-कामा नये. तेव्हा आता उज्ज्वल भविष्य आमच्या समोर आहे. मराठी भाषेची सेवा करण्याकरिता अनुकूल वातावरण तयार झालें आहे. आमच्या मातृभाषेच्या सेवेबरोबरच, हिंदी राष्ट्रभाषेची जोपासना व सेवा करण्याची जबाबदारी आमच्यावर आहे. हिंदी ही एका विशिष्ट प्रदेशाची भाषा नसून, ती राष्ट्रीय जबाबदारी आहे, याची आम्हाला जाणीव आहे. या भागांतील हिंदी किंवा अन्यभाषिकांवर भाषेच्या नांवावर कोणत्याहि प्रकारचा अन्याय होणार नाही याची आम्हाला खात्री आहे. उलट हिंदीचें वैभव व उत्कर्ष वाढविण्याकरिता आम्ही मराठीभाषिक द्विगुणित उत्साहाने व निर्धाराने झटूं असें आमचें आश्वासन आहे. तें आमचें राष्ट्रीय कर्तव्य आहे याची आम्हाला जाणीव आहे.

हा साहित्यिकांचा मेळावा आहे. थोर पंडित, विचारवंत आणि प्रथितयश साहित्यिक येथे एकत्र झाले आहेत. साहित्यक्षेत्रांतील विषयांची चर्चा करण्याचा माझा अधिकार नाही; तो आपला आहे. साहित्य, कला व इतर आनुषंगिक बाबींवर दिलखुलास वादविवाद करावा, त्यांचें मंथन करावें व त्यांतून नवनीत घुसळून काढून आमच्यासारख्या अज्ञ व अशिक्षित जनतेला पुष्ट व तुष्ट करण्याकरिता, तें नवनीत द्यावें व समाजाचा व साहित्यिक व सांस्कृतिक जीवनाचा दर्जा वाढविण्याचे कष्ट आपण घ्यावेत हीच आमची अपेक्षा आहे; नव्हे प्रार्थना आहे. हें साहित्यिक सृजन करण्याला अनुकूल व सुखद सोयी उपलब्ध करून देण्याचें कार्य मात्र आमचें आहे. त्या दृष्टीने आम्ही स्वागतसमितीचे लोक आपल्या परीने पराकाष्ठेचा प्रयत्न करीत आहोंत. आमच्या कार्यांत कमतरता आहे, याची जाणीव आम्हांला आहे. उणीवा राहून गेल्या आहेत. पण जें कांही आम्ही केलें आहे तें आपण उदार हृदयाने गोड करून घ्यावें व आमच्या दोषांवर पांघरूण घालावें ही विनंती आहे.

विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष श्री. पुरुषोत्तम दिवाकर ऊर्फ बाळासाहेब ढवळे हे संमेलनाध्यक्ष म्हणून लाभले याचा आम्हांला अत्यानंद वाटत आहे. श्री. बाळासाहेब ढवळे हे एक श्रेष्ठ व विद्वान पत्रकार आहेत. त्यांचें संपूर्ण जीवन पत्रव्यवसायांत गेलें असून,- महाराष्ट्राचे मान्यवर कै. दादासाहेब ओगले यांच्यानंतर, श्री. बाळासाहेब ढवळे यांनी 'महाराष्ट्र' या ख्यातनाम दैनिकाचे यशस्वी संपादक म्हणून नांवलौकिक कमाविला आहे. यापूर्वी त्यांनी मुंबई मराठी पत्रकार संघ व पश्चिम खानदेश, धुळें पत्रकार संघ यांच्या वार्षिक अधिवेशनांचीहि अध्यक्षीय पदें भूषविलीं आहेत. ते व्यासंगी वृत्तीचे व चिंतनशील प्रकृतीचे पत्रपंडित आहेत. स्वागतमंडळातर्फे मी त्यांचें मनःपूर्वक स्वागत करतों.

श्री. यशवंतराव चव्हाण, आपल्या प्रांताचे मुख्य मंत्री, या सम्मेलनाचें उद्घाटन करणार होते पण शासकीय जबाबदारीच्या कामामुळे ते आज उपस्थित राहूं शकत नाहीत. ते आपल्यामध्ये उद्ईक येणार आहेत. त्यांच्याऐवजी महाराष्ट्रांतील एक थोर पंडित, विचारवंत व श्री.

चव्हाणांचे परममित्र व मार्गदर्शक तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी आपल्याला लाभले आहेत, हें आपलें परमभाग्य आहे. त्यांच्या उपस्थितीने साऱ्या मराठी भाषिकांमध्ये एकात्मतेची भावना निर्माण होण्याचें महान् कार्य साधेल. शास्त्रीजींनी स्वागतसमितीची विनंती मान्य करून आम्हा सर्वांना उपकृत केलें आहे. आम्ही त्यांचे ऋणी आहोंत.

आमची विनंती स्वीकारून आपण सर्व येथे आलांत व आमची सेवा गोड करून घेण्याचा निश्चय केलात, याकरिता आम्ही आपले सर्वांचे आभारी आहोंत. पुन्हा एकवार सर्वांचें अंतःकरणपूर्वक स्वागत करून तर्कतीर्थ जोशी यांना या सम्मेलनाचें उद्घाटन करण्याची विनंती करतों.

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संमेलन

अधिवेशन एकोणिसावें

गोंदिया, दिनांक २७ व २८ जानेवारी १९५७

अध्यक्ष श्री. पुरुषोत्तम दिवाकर ढवळे

यांचें अध्यक्षीय भाषण

साहित्यप्रेमी मित्र हो,

विदर्भ साहित्य संमेलनाच्या या एकोणिसाव्या अधिवेशनाचें अध्यक्षपद देऊन आपण माझा जो गौरव केलात त्याबद्दल मी आपला आभारी आहें. विदर्भ साहित्य संघाचा अध्यक्ष म्हणून तोच संमेलनाचाहि अध्यक्ष अशी वस्तुतः आज आपली घटना नाही आणि म्हणून, कार्यकारी मंडळाने सुचविलेल्या दुसऱ्या मान्यवराची निवड जर आपण केली असती तर मला अधिक आनंद झाला असता, हें मी आपणांस प्रांजळपणें सांगूं इच्छितों. मी संघाचें अध्यक्षपद स्वीकारलें तें साहित्यिकाच्या भूमिकेवरून नव्हे. असें म्हणतात की, आरोग्यमंत्री हा स्वतः जर डॉक्टर पेशाचा नसला तर सार्वजनिक आरोग्यखात्याचें कार्य अधिक लोककल्याणकारी होतें. तो जनतेच्या सोयी अधिक करवून घेऊं शकतो. कारण शास्त्र व तंत्र यांचा तो गुलाम नसतो. कांहीशा याच भावनेने व आपल्यासारखाच एक साहित्यप्रेमी म्हणून मी संघाचें अध्यक्षपद स्वीकारलें. तसें म्हटलें तर विदर्भ साहित्यसंमेलनाशीं माझा फार जुना संबंध आहे. नागपुरास दादासाहेब खापर्डे यांच्या अध्यक्षतेखाली संमेलन भरविण्यांत कै. ज. के. उपाध्ये, कै. मावकर, कै. वासुदेवराव फडणीस, श्री. शं. बा. शास्त्री व मी यांचा पुढाकार होता. आणि योगायोग असा की, त्या महान वैदर्भीयाचे ज्येष्ठ चिरंजीव विदर्भांतील विद्वान व रसज्ञ साहित्यिक श्री. बाबासाहेब खापर्डे यांच्या मागून संघाचें अध्यक्षपद माझ्याकडे आलें आहे. ज्या वेळीं नागपुरास आम्ही संमेलनाचें तें अधिवेशन भरविलें तो विदर्भांतील साहित्यिक संघटनेचा प्रारंभकाळ

अनुक्रमणिका

होता. त्या वेळीं संमेलनावर प्रादेशिकत्वाचा आरोप करून झालेल्या टीकेला उत्तर देऊन या संघटनेचें समर्थन मी केलें होतें. त्यानंतर काळ बदलला, व सुदैवानें ते आक्षेपहि मावळले. एवढेंच नव्हे तर त्या काळच्या संघाच्या टीकाकारांनीच नंतर पुढे येऊन संघाला मध्यंतरीं आलेलें शैथिल्य घालवून त्याला संजीवन दिलें. त्यांचें ऋण विदर्भ साहित्य संघ आणि विदर्भा-तील साहित्यिक कधीहि विसरणार नाहीत.

विदर्भ साहित्य संघाशीं आपल्या जिल्ह्याचा फार घनिष्ट संबंध आहे. याच गोंदिया शहरांत संमेलनाचें आज दुसऱ्यांदा अधिवेशन भरत आहे. आणि गेल्याच वर्षीं तुमसरला संमेलन भरविल्यावर यंदा पुन्हा आपण संमेलन भरवून मराठी साहित्यावरील आपल्या निरपेक्ष लोभाचा आणि सत्कारशीलतेचा अनन्य प्रत्यय आणून दिलेला आहे. आपल्या जिल्ह्याच्या भूमीने आणि नद्यांनी अन्नोदकाबरोबरच आपल्याला साहित्यप्रेमाचा अखंड झराच जणूं दिला आहे. आपला साहित्यप्रेमाचा वारसाहि फार मोठा आहे. येथून जवळच एका बाजूस महा-कवींच्या मालिकेंत आपल्या प्रतिभेने तळपणाऱ्या भवभूतीचें पद्मपूर आहे. तर मराठींतील आद्य कवि 'विवेकसिंधु'कार मुकुंदराज यांची जन्मभूमि आणि कर्मभूमि असलेलें अंभोरा हें क्षेत्र आपल्या वैनगंगेच्याच तीरावर पण आमच्या नागपूर जिल्ह्यांत आहे. आपल्या भंडारा जिल्ह्यांतच श्रीचक्रधर स्वामींचें डाकराम सुकळी हें तीर्थ आहे, तर अंभोऱ्याप्रमाणेच या भंडारा जिल्ह्याला लागूनच पण आमच्या नागपूर जिल्ह्यांत कविकुलगुरु कालिदासाची रामगिरी (रामटेक) आहे. सारांश, आपल्या जिल्ह्याचें हवापाणी संस्कृत व मराठी साहित्य संपन्न व शिरोधार्य करून ठेवणाऱ्या महान साहित्यिकांच्या वास्तव्याने भारलेलें आहे. सरस्वतीचा हा महान वारसा जसा आपल्याला लाभला आहे, तशीच लक्ष्मीची कृपाहि आपल्या या जिल्ह्यावर आहे. आपली भूमि आपल्याला नुसता सुवासिक तांदूळच देत नाही, ती माती सोनेंहि देते. वैनगंगेच्या वाळूंत सोनें सापडतें असें लहानपणीं भूगोलाच्या पुस्तकांत पाठ केलेलें मला आठवतें. त्याचा प्रत्यय जरी मला आलेला नसला, तरी मँगनीजच्या खाणींतून मात्र आपल्या हातीं अखेर सोनेंच येतें, हें आम्ही प्रत्यक्षच पाहत आहोंत.

गेल्या वर्षीं आपण तुमसर येथे आपल्या साहित्य सोहळ्यासाठी जमलों तेव्हा राज्यपुन-र्रचना व्हावयाची होती. विदर्भ साहित्य संघाने राज्यापुनर्रचनेसंबंधींची आपली भूमिका आपल्या ठरावांतून यापूर्वीं स्पष्ट केलेलीच आहे. राज्यपुनर्रचना कमिशन नेमलें गेल्यानंतर त्याबद्दल निरनिराळ्या मतांचा गलबला देशांत एवढा मोठा माजला की त्यामुळे आपल्या विदर्भांत दोन गट पडले. वस्तुतः भाषिक तत्त्वावर राज्यपुनर्रचना व्हावी याबद्दल दोनीहि गटांच्या मतांत फरक नव्हता. वाद होता तो एकच राज्य असावें की दोन एवढाच. आज प्रत्यक्षांत मात्र आपल्या वाटयाला द्विभाषी राज्य आलें आहे! म्हणजे विदर्भ पूर्वींहि द्विभाषी राज्यांत होता, आजहि तो द्वैभाषिक राज्यांतच आहे. ध्येयपूर्तीच्या समाधानाच्या दृष्टीने यावर अर्थातच उभय भाषिकहि— मराठी व गुर्जर—संतुष्ट नाहीत हें आपण पहातोंच आहोंत. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र व महा-

अनुक्रमणिका

गुजरात यांच्या निर्मितीचे प्रयत्न अजूनहि चालूच आहेत. हे प्रयत्न राष्ट्रद्रोहाचे आहेत असें मी मानीत नाही. पंतप्रधान नेहरू म्हणतात त्याप्रमाणे आपल्याला पसंत नसलेले निर्णय शांततेच्या आणि लोकशाहीच्या मार्गांनी केव्हाहि बदलून घेतां येतात. आपण आपली राज्यघटना एकदा केल्यावर तींत मागाहून आवश्यक वाटले ते फेरबदल केलेतच ना ! शासनाच्या सोयीसाठी घटना बदलण्यांत जसा राष्ट्रद्रोह नाही, त्याचप्रमाणे जनतेच्या समाधानासाठी घटक राज्यांच्या सीमांत फेरबदल करण्यांत कोणताहि राष्ट्रद्रोह नाही. हा प्रयत्न आताच लगेच करावा की नाही याबद्दल प्रामाणिक मतभेद असूं शकतात. या मतभेदांच्या वादांत मी येथे शिरत नाही. पण घटक राज्यांच्या आज ठरविलेल्या सीमा अपरिवर्तनीय आहेत, हें खरें नाही, एवढें मात्र निश्चित. या प्रश्नावरील संसदमध्ये झालेल्या चर्चेंतच हें स्पष्ट करण्यांत आलें आहे की, संबंधित राज्यांनी आपसांतील विचारविनिमयाने फेरफार सुचवावे. व म्हणूनच नैऋत्येस बेळगाव–कारवारचा प्रश्न आणि इकडे ईशान्येस व पूर्वेस बऱ्हाणपूर, मूलतापी, संसर, बाळाघाट वगैरे भागांचा प्रश्न सोडविण्याचे प्रयत्न अगदी वरिष्ठ पातळीवरून चालू आहेत. या बाबतींत मी आपल्या नजरेस असें आणून देऊं इच्छितों की, बेळगाव–कारवारच्या प्रश्नाप्रमाणे आपल्याकडील बऱ्हाणपूर, संसर वगैरे भागाबद्दल आमच्या पुढाऱ्यांनी पुरेशी जागरुकता प्रत्ययास आणून दिलेली नाही. त्यांच्या या वृत्तीला कारण असलेली जुनी भीति, जुने संदेह आता उरलेले नसल्यामुळे त्यांनी या प्रश्नाबद्दल अधिक जनताभिमुख आत्मीयता दाखवून डेव्हलोपमेंट कौन्सिल व भारत सरकारचें गृहखातें यांच्या मार्फत 'बॉर्डर ॲड्जस्टमेंट' करवून घेण्याची पराकाष्ठा करावी, अशी मी त्यांना आग्रहाची विनंती करतों. हे विचार व्यक्त करीत असतांना अर्थातच मला गोमंतकाचें विस्मरण झालेलें नाही. परंतु, तो प्रश्न आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या कक्षेंत असल्याने त्याची चर्चा प्रस्तुत मुद्यांत करीत नाही.

आज झालेल्या राज्यपुनर्रचनेने मराठी व गुर्जर भाषिकांची भाषिक राज्याची आकांक्षा पूर्ण झालेली नसली तरी त्यांची एकत्र येण्याची आकांक्षा मात्र बऱ्हंशीं पूर्ण झालेली आहे. मराठी प्रदेशासंबंधी सांगावयाचें म्हणजे, गेलीं कित्येक शतकें निरनिराळ्या शासनांत विभागला गेलेला हा मराठी भाषिक प्रदेश आज प्रथमच एकाच प्रादेशिक शासनाखाली एकत्र आलेला आहे. विदर्भ, मराठवाडा, महाराष्ट्र व कोंकण हे मराठी भूमीचे चार भौगोलिक विभाग आज एका प्रादेशिक शासनाखाली प्रथमच आले आहेत व ती अर्थातच संतोषाची गोष्ट आहे. विदर्भ, मराठवाडा व महाराष्ट्रासह कोंकण हे विभाग आजवर निरनिराळ्या शासनाखाली असल्यामुळे त्यांची शैक्षणिक व अन्य क्षेत्रांतील वाढ सारखीच झालेली नाही. त्यामुळे त्या प्रत्येकाच्या गरजा निरनिराळ्या आहेत. ही विभिन्नता घालवून सर्वांना वरच्या समपातळीवर आणणें ही यापुढील पहिली गरज आहे. त्यासाठी कमी प्रगत भागाकडे प्रथम अधिक लक्ष देऊन त्यावर अधिक खर्च करण्यासहि आपल्याला तयार झालें पाहिजे. विशाल राज्य न्यायाने व समभाव निर्माण करण्याच्या हेतूने चालविण्यासाठी विशाल बुद्धि, विशाल दृष्टि आणि विशाल

भावना लागतात. मागासले असतील त्यांना कमी लेखून त्यांची उपेक्षा करीत राहूं तर समभाव आणि एकात्मता कधीच निर्माण होणार नाही. यासाठी पुढारलेल्यांनी आपला अहंगंड आणि मागासलेल्यांनी आपला न्यूनगंड सोडून देऊन पुढील प्रगतीचे टप्पे एकदिलाने गाठण्यास बद्धपरिकर होणें जरूर आहे. राज्यपुनर्रचनेमुळे महाराष्ट्राचें एकात्म व एकसंध जीवन निर्माण करण्याची जी सुसंधि आपल्याला लाभली आहे, त्याचा पूर्ण फायदा जर आपल्याला उचलावयाचा असेल तर आपण मी आतांच सांगितलेली वृत्ति व भावना आपल्यांत जाणिवेने व जरूर तर प्रयत्नपूर्वक वाढीस लावली पाहिजे. पुणेरी, वऱ्हाडी, नागपुरी वगैरे शब्दांमागील हेटाळणीचा किंवा परस्थपणाचा भाव आपण टाकून दिला पाहिजे. तो जर आपण टाकून दिला नाही, परस्परांतील भावांत आपुलकी निर्माण केली नाही, तर संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीला आपल्या भावनात्मक व सांस्कृतिक एकात्मतेचें भक्कम अधिष्ठानच नाही असें ठरेल, आणि एकाच शासनव्यवस्थेखाली आल्यावरहि आपण भिन्न राज्यांत होतों तसेच मनाने भिन्न राहूं. नव्या द्वैभाषिकांत आपल्या गुर्जरबंधूबद्दल आत्मीयता निर्माण करण्यासाठी आपले पुढारी आपल्याला हार्दिक आवाहन करीत आहेत. या आत्मीयतेच्या भावनेच्या वाढीला व भारतीय एकात्मतेच्या बुद्धीला आपण घरांत भाऊबंदकी चालू ठेवून हातभार कसा लावूं शकूं ?

मराठी प्रदेशाची आजची गरज शैक्षणिक, सांस्कृतिक आणि आर्थिक प्रगतीच्या दृष्टीने सर्वांना वरच्या पातळीवर आणणें ही आहे, हा विचार मी आताच आपल्यापुढे मांडला. हें कोणत्या पद्धतीनें साध्य होईल याचाहि थोडा विचार करूं. विदर्भ व मराठवाडा हे विभाग मुंबई–महाराष्ट्राच्या तुलनेंत मागासलेले ठरतात. यांचा हा मागासलेपणा घालविण्यासाठी त्यांच्या गरजा भागविण्याकडे थोडें अधिक लक्ष पुरविलें पाहिजे. मराठवाडयाला स्वतंत्र विद्यापीठ देण्याचा जो निर्णय नुकताच झाला आहे, त्याचें मी या दृष्टीने स्वागत करतों. मराठवाडयांतील शेतकी व मेडिकल कॉलेजें चालू ठेवण्याचा सरकारचा निर्णयहि असाच अभिनंदनीय आहे. विदर्भ आणि मराठवाडा येथील शैक्षणिक, साहित्यिक व सांस्कृतिक संस्थांना जीं अनुदानें पूर्वी मिळत होतीं तीं तशींच चालू राहणेंहि या दृष्टीने आवश्यक आहे. जुन्या मुंबई राज्यांत यासंबंधी जे नियम आहेत तेच नियम या संस्थांना नव्या आर्थिक वर्षापासून लागू करण्याचें घाटत आहे किंवा ठरलें आहे असें समजतें. या वार्तेने विदर्भांत साहजिकच चिंतेचें व उद्वेगाचें वातावरण निर्माण होऊं लागलें आहे. शासकीय एकात्मता जर अशा रीतीने मागासलेल्या विभागांच्या प्रत्ययास येणार असेल तर ही घटना म्हणजे त्या भागावरील एक संकटच ठरेल व या भागांच्या विकासाचा दर्जा उंचावण्याऐवजी विपरीत घडून येईल. समाजसत्ताक लोकशाहींत जीवनविकासाच्या बाबतींत असलेल्या सवलतींना धक्का न लावणें हें तत्त्व सर्वमान्य झालेलें आहे. आपल्याला समता जी स्थापन करावयाची आहे ती वरच्यांना खाली ओढून, जीवन विकसविण्याचीं साधनें छाटून खालच्या पातळीवरील समता निर्माण करावयाची नाही, वरच्या पातळीवरील समता निर्माण करावयाची आहे. मला उमेद आहे की, विदर्भ–मराठवाडयांतील

वर निर्देशिलेल्या क्षेत्रांतील संस्थांच्या सध्याच्या सवलतींना नव्या व्यवस्थेनें धक्का बसणार नाही. त्यांना मिळणारें साहाय्य व असलेल्या सवलती यांचा कोणत्याहि प्रकारें संकोच केला जाणार नाही.

विचाराचें हेंच सूत्र पुढे चालवून साहित्याशीं संबंध येणाऱ्या विदर्भाच्या कांही प्रश्नांचा येथेच उल्लेख करण्यास हरकत नाही. जुन्या मध्यप्रदेशाच्या शासनांत एक भाषाविभाग होता. तसा भाषाविभाग नव्या मुंबई राज्यांत नाही. शासनाच्या सोयीसाठी कोणकोणते शासकीय विभाग पाडावेत हा सर्वस्वी सरकारचा प्रश्न आहे. पण लोकोपयोगी कार्यें येथे चालू होतीं तीं चालू राहिलीं पाहिजेत अशी अपेक्षा असणें गैर ठरणार नाही. जुन्या मध्यप्रदेशांत शासन साहित्य परिषद होती व ती ग्रंथांचें परीक्षण करून चांगल्या ग्रंथांच्या लेखकांना पुरस्कार देत असे व पुरस्कारित ग्रंथांच्या प्रकाशनाचीहि जबाबदारी तिने स्वीकारली होती. याच शासन साहित्य परिषदेमार्फत विद्वान साहित्यिकांकडून व्याख्यानमाला गुंफवून घेतल्या जात असत. राज्यपुनर्रचनेनंतर या शासनसाहित्य परिषदेचें संगोपन व संवर्धन नव्या शासनांत करावें असा शिफारसवजा ठराव करून निधीची विभागणीहि जुन्या शासनाने करून दिली. ही निधीची विभागणी मूळ ठरावाप्रमाणे झाली आहे की नाही हें नवें शासन तपासून पाहीलच. विकास-निधीच्या बाबतींत विदर्भाच्या वाटणीला वाजवीपेक्षा ९ कोटी रु. कमी आले असून, त्या रकमेची मागणी नव्या राज्यसरकारने केली असल्याचें वृत्त आपणा सर्वांनी वाचलेंच असेल. तेव्हा या परिषदेच्या निधीच्या बाबतींतहि सरकार जागरूक असेलच व त्या बाबतींत जरूर पडल्यास आवश्यक कारवाईहि करीलच, याबद्दल आपण खात्री बाळगूं या. मला आपल्या व सरकारच्या जें प्रामुख्याने लक्षांत आणून द्यावयाचें आहे तें हें की, या शासन परिषदेचें कार्य यापुढेहि पूर्ववत चालू ठेवून विदर्भांतील साहित्यनिर्मितीला प्रोत्साहन त्याच पद्धतीने मिळत राहिलें पाहिजे. मुंबई सरकारहि साहित्याला पुरस्कार देत असतें व गरजू साहित्यिक आणि कलाकार यांना मानाचें अनुदानहि देत असतें. त्यांची काय यंत्रणा आहे हें मला ठाऊक नाही, पण आमची शासन साहित्य परिषद ग्रंथांना पुरस्कार देऊन ते ग्रंथ प्रसिद्ध करण्याचें व व्याख्यान-माला गुंफवून घेण्याचें जें कार्य करीत असे तशीं कामें करणारी यंत्रणा असावी, असें मला म्हणावयाचें आहे. सबंध राज्यासाठीच हें कार्य करणारी यंत्रणा निर्माण करण्यांत आली तर तें आम्हाला हवेंच आहे, पण निदान विदर्भांत जें हें होतें, त्याला आम्ही मुकलों असें होतां कामा नये. या बाबतींतच मला आणखी एक मुद्दा सांगावासा वाटतो. तो हा की अशीं कार्यें सर-कारने केवळ शासकीय यंत्रणेद्वारा करूं नयेत. त्यासाठी लोकांना प्रतिनिधित्व असणारी यंत्रणाहि निर्माण करावी. मध्यप्रदेश शासन साहित्य परिषदेने या यंत्रणेद्वारा साहित्य संस्था व विद्यापीठें यांचें प्रतिनिधित्व वरील कार्यांत घेतलें होतें.

सरकारच्या आणि संमेलनाच्या नजरेस आणखी एक गोष्ट मी आणूं इच्छितों. ती म्हणजे कालिदास स्मारकाची. जुन्या मध्यप्रदेश सरकारने कविकुलगुरु कालिदासाचें स्मारक रामटेक

येथे उभारण्याचा निर्णय घेऊन त्यासाठी कांही निधि मंजूर केला होता व समितीहि नेमली होती. परंतु राज्यपुनर्रचनेच्या धबडग्यांत नंतर त्यांनी हें कार्य सोडून दिलें ! आता त्या समितीला व कार्याला सरकारच्या दृष्टीने अस्तित्वच नसल्यागत स्थिति आहे. हें स्मारक उभारण्याचें कार्य सरकारने हातीं घ्यावें, अशी सरकारला विनंती आहे. या स्मारकाचें स्वरूप काय असावें, वगैरे गोष्टी ठरविण्यासाठी सरकारने एक समिति नेमणें जरूरच आहे. या स्मारकाबद्दल सरकारकडे दुसऱ्या कांही संस्था आपल्या सूचना पाठविणार आहेत. त्यांचा विचार ही समिति करील. कालिदासाप्रमाणेच भवभूति आणि मराठीचे आद्यकवि 'विवेकसिंधु 'कर्ते मुकुंदराज यांचीं स्मारकेंहि होणें आवश्यक आहे. भावी पिढयांचीं स्फूर्ति-स्थानें ठरावींत असें या स्मारकांचें स्वरूप असावें, अशीच अपेक्षा त्यांच्या स्वरूपाबद्दल कोणाचीहि राहील.

स्वातंत्र्योत्तर काळांत नवभारताच्या निर्मितीचे जे विविध प्रयत्न चालू आहेत त्यांत वाङ्मय आणि साहित्य यांच्या वाढीच्या व प्रसाराच्या दृष्टीने विद्याप्रसाराच्या कार्याला विशेष महत्त्व आहे. शिक्षणाचा प्रसार होत असून नवीन पिढीबरोबरच लिहितां वाचतां न येणाऱ्या प्रौढांनाहि साक्षर करण्यांत येत आहे. त्याचबरोबर माध्यमिक शिक्षणापासून उच्च शिक्षणापर्यंतचें माध्यम मातृभाषा करण्याच्या चळवळीला यश येत आहे. या बाबतींत जुन्या मध्यप्रदेश सरकारने आणि आपल्या नागपूर विद्यापीठाने बरीच अभिनंदनीय मजल मारलेली आहे. त्यामुळे मराठी वाङ्मयाला नवींनवीं दालनें खुलीं होत आहेत. मराठींत ललित वाङ्मय समृद्ध आहे. विज्ञान-विषयक वाङ्मयाची तशी गोष्ट नाही. नाही म्हणायला शालेय स्वरूपाचें विज्ञानविषयक वाङ्मय अलीकडे थोडें फार निघूं लागलें आहे, हें खरें. पण नवसाक्षर प्रौढांना वाचनाची गोडी लावून ती टिकविणारें, विज्ञानविषयक माहिती सोप्या आणि मनोरंजक पद्धतीने देणारें-अशा प्रकारच्या वाङ्मयाची एकंदरीने उणीवच भासते. लघुकथा, कादंबऱ्या, कविता यांतच आमची पुष्कळशी साहित्यिक शक्ति खर्ची पडते. त्यांतहि उदात्त जीवनाचें दर्शन घडत नाही. त्यांचा मुख्य विषय स्त्री–पुरुष प्रेम हाच विशेषत्वाने असतो. आणि त्यांतहि मानवी मनांतील पाशवी, हिडीस व ओंगळ अंगांचेंच बीभत्स चित्रण असतें, अशी तक्रार याच व्यासपीठावरून प्राध्यापक भवानी-शंकर पंडित यांनी खामगाव अधिवेशनाच्या आपल्या अध्यक्षीय भाषणांत केली होती. गेल्या तीन वर्षांत त्या परिस्थितींत कांहीहि बदल झालेला नाही. या असल्या लिखाणाचें समर्थन 'कले-साठी कला' या तत्त्वाच्या किंवा वास्तववादाच्या नांवाखाली केलें जातें साहित्यनिर्मितीचा उद्देश, विशेषत: ललित साहित्याचा उद्देश जगांत जें जें म्हणून सुंदर दिसेल, वाटेल, तें तें दुसऱ्याला वाङ्मयाच्या द्वारां देणें हा आहे, जगाला कांही शिकविण्याचा उद्देश असावा लागत नाही, साहित्य हें निरपेक्ष व निर्हेतुक असतें, तें कारक नाही–फार तर उपकारक असूं शकेल असें 'कलेसाठी कला' या पक्षाचे समर्थक आग्रहाने प्रतिपादितात. परंतु हें मत अट्टाहासाने प्रतिपादीत असतांना ते त्याचा न कळत अधिक्षेपहि करतात. मात्र आपलें जुनें मत एकांगी

होतें हें प्रांजळपणें कबूल करीत नाहीत. मात्र लेखनाला कांही तरी हेतू असावा लागतो, आणि ललित साहित्याचा लेखकहि समाजाला शिकवीत असतो, हें ते हळूच कबूल करतात. एवढेंच नव्हे तर तरुण पिढींतील बेशिस्त आणि उच्छृंखलपणा याबद्दलहि स्पष्ट नापसंती निरपेक्ष व निर्हेतुक साहित्याचे समर्थकहि हल्ली व्यक्त करतांना दिसतात.

कलेसासाठी कला की जीवनासाठी कला हा वाद आपल्या सर्वांच्या माहितींतला आहे. त्या शिळ्या कढीला ऊत आणण्याचा खटाटोप मला करावयाचा नाही. कलेसाठी कला या पक्षाच्या अध्वर्यूंच्या विचारांतील विसंगती वा गोंधळाबद्दल मात्र मी थोडें बोलणार आहें. ललित साहित्याचा हेतु जीवनांतील आनंद वाढविणें, सौंदर्यबुद्धि जागृत करणें हा जसा आहे, तसाच जीवनाची उंची वाढविणें हा आहे, असें ते कबूल करतात. म्हणजे ललित साहित्यहि निर्हेतुक नसतें, एवढेंच नव्हे तर त्याचा हेतु जीवनाची उंची वाढविणें हा आहे, हें त्यांना मान्य आहे. शब्दांच्या अर्थाचे बारकावे स्पष्ट करण्यासाठी ललित साहित्य हें समाजसुधारणेला कारक नसून उपकारक आहे, ललित साहित्यिक समाजाला शिकवीत नाही, फक्त सांगतो असे शब्दप्रयोग ते करतात, पण त्याचबरोबर आपणहि समाजाचे शिक्षक आहोंत व आपणहि समाजाला आपल्या प्रत्येक कादंबरींतून कांही तरी शिकविलें आहे, असेंहि प्रौढीने सांगतात. मग ललित साहित्यिक समाजाला शिकवीत नाही, फक्त सांगतो हें मत निव्वळ आग्रहीच ठरत नाही काय ? जीवनाची उंची वाढविणें हा ललित साहित्याचा हेतु आहे ही कबुली तुम्ही दिलीत, त्याच क्षणीं कलेसाठी कला, ललित साहित्य हें निर्हेतुक असतें, त्यांत फक्त सौंदर्य-दर्शनच असतें, हें सर्व प्रतिपादन एकांगी ठरतें. कला (Art) याची एक व्याख्या Art is the expression of intuitions अशी केली जाते. पण त्यापेक्षा Art is the revelation of ideal in human life ही J. Middleton Murry या पाश्चात्य साहित्यसमीक्षकाने आपल्या Aspects of Literature या निबंधसंग्रहांत जी सांगितली आहे, ती अधिक चांगली आहे. स्फूर्ति वा प्रतिभा यांच्या द्वारा कलेचा आविष्कार होतो. पण त्या स्फूर्तीला आणि प्रतिभेला मानवी जीवनाच्या ध्येयाचें अधिष्ठान असावें लागतें. म्हणूनच Murry म्हणतो—

"...the principle of art for art's sake needs to be understood and interpreted very differently. Its implications are tremendous. Art is autonomous, and to be persued for its own sake, presisely because it comprehends the whole of human life; because it has reference to a more perfectly human morality than any other activity to man; because, in so far as it is purely art, it is indicative of a more comprehensive and unchallengeable harmony in the spirit of man."

मानवी जीवनांतील ध्येयाचा सुंदर आविष्कार ही खरी कला होय; कला म्हणजे ललित शब्दांच्या साहाय्याने लेखकाने स्वतःच्या विकारांचा केलेला आविष्कार नव्हे. परंतु केवळ विकारांनी आपण ज्या गोष्टीकडे आकर्षिलें जातों, त्यांतच सारें सौंदर्य साठविलें आहे असें

समजून तुम्ही कलेची उपासना केली. ती कला खोटी, नकली, False Art आहे, हें तुम्ही प्रथम ओळखलें नाही व वाहवलांत. त्याचा प्रत्यय तुमच्या कथाकादंबऱ्यांत आणि काव्यांत येतो. 'सुंदरम्'ला 'शिवम्'चें अधिष्ठान लागतें याची तुम्ही दखल घेतली नाही. विकारवशता व विवेक—याला आपण intuition व divination किंवा sublimation म्हणूं—यांत भेद करण्याची जबाबदारी आपल्यावर आहे, याची जाणीव तेव्हा तुम्हाला झाली नाही. Murry नें महान् कलाकारापासून कशाची अपेक्षा करावी हें सांगतांना असें म्हटलें आहे की, The great artist's work is in all its parts a revelation of the ideal as the principle of activity in human life. ही कसोटी लावली तर 'कलेसाठी कला' या ध्येयाने साहित्यनिर्मिति करणारे आमचे मोठेमोठे कलावंत हे महान् कलाकार या संज्ञेस पात्र ठरतील काय ? त्याचें उत्तर भावी साहित्यसमीक्षकच देतील.

कोणत्याहि मताचा प्रतिवाद करतांना व्यक्तीचा नामोल्लेख करूं नये असा एक संकेत आहे, व तो चांगलाहि आहे. पण मी यापुढे जें कांही थोडें प्रतिपादन करणार आहे तें करतांना ज्या विधानांचा विचार करणार आहे तीं विधानें कोणाचीं आहेत हें सांगणें मला जरूर वाटतें. त्यासाठी मी तो संकेत मोडणार आहे. व म्हणून पुढील विवेचनास प्रारंभ करण्यापूर्वी प्रथमच प्रा. ना. सी. फडके व माझे मित्र श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांची जाहीर रीतीनें क्षमा मागून ठेवतों. मला अर्थातच त्यांच्यावर वैयक्तिक टीका करावयाची नाही. त्यांच्या मतांबद्दलच मला बोलावयाचें आहे. प्रा. फडके यांनी नागपुरास वि. सा. संघांत नुकतींच ललित साहित्यावर तीन व्याख्यानें दिलीं. कादंबऱ्यांनी सामाजिक व राजकीय क्रांति होत नाही; कलाकाराला समाजाला कांही शिकवावयाचें नसतें, फक्त सांगावयाचें असतें, असें ते म्हणाले. सूक्ष्मार्थाने शब्द वापरावे या न्यायाने त्यांनी हे दोन शब्द वापरलेले दिसतात, पण त्यांतील सूक्ष्म भेद हा पाण्यापेक्षाहि पातळ आहे. याच व्याख्यानसत्रांत त्यांनीच पुढे स्वत:बद्दल असें सांगितलें की, प्रत्येक कादंबरींत आपण समाजाला कांही तरी शिकविलें आहे. आणि त्याचा तुरंत पुरावा म्हणून त्यांनी असेंहि सांगितलें की, आपला पूर्वपरिचय नसलेल्या एका वीस वर्षांच्या तरुणाने रुग्णशय्येवरून पत्र पाठवून कळविलें की, 'आपल्या कादंबऱ्यांनी मला असह्य परिस्थितींतहि आशावादानं जगावं असं शिकविलं.' एवढी चांगली गोष्ट आपल्या कादंबऱ्यांनी आपण शिकवूं शकतों यावर जर प्रा. फडक्यांचा विश्वास असतो, तर हरिभाऊ आपटयांच्या कादंबऱ्यांनी समाजक्रांतीहि होऊं शकते ही गोष्ट त्यांच्या कल्पनेलाहि कां बरें अशक्य वाटावी ? त्याचें कारण कदाचित एवढेंच म्हणतां येईल की, हरिभाऊंच्या काळीं आजच्यासारखी फॅन मेल नव्हती. ही फॅनमेलची प्रथा असती व आजचें प्रसिद्धीचें तंत्र त्या काळाला अज्ञात असतें, तर कदाचित तसा पुरावा हरिभाऊंच्या लेखनाबद्दलहि उपलब्ध होऊं शकला असता. झपाटयाने झालेला सामुहिक बदल म्हणजे क्रांति असें आपण स्थूलमानाने म्हणूं या. व्यक्तींत बदल होण्यास जो अवधि लागतो त्यापेक्षा अर्थातच समाजांत सामूहिक बदल झालेला प्रत्ययास येण्यास अधिक काळ लागतो. पण

हा वेळ अधिक लागतो म्हणून तें कार्यच होत नाही हें म्हणणें मला पटत नाही. याच व्याख्यानांत प्रा. फडके म्हणाले, "माझ्या दौलत आणि जादुगार या कादंबऱ्या वाचकांना अधिक कां आवडतात, हें कळत नाही. वास्तविक ज्या प्रेमासाठी मी एवढा प्रसिद्ध आहे त्याचा अनुभवहि त्यावेळीं मी घेतला नव्हता. त्याचा अनुभव घेतल्यानंतरच्या कादंबऱ्या त्यापेक्षा अधिक चांगल्या आहेत आणि त्या मला आवडतातहि." या वाक्यांचा क्रम आपण लक्षांत ठेवा. तो महत्त्वाचा आहे. प्रत्यक्ष अनुभूतीशिवाय जें लिहिलें तें लोकांना कां आवडतें हा प्रश्न फडके यांना पडलेला दिसतो. मला त्याचें उत्तर सुचतें. पण तें देण्यापूर्वी याच व्याख्यानांत त्यांनी जी एक महत्त्वाची गोष्ट सांगितली ती प्रथम आपल्या नजरेस आणून देतों. ते म्हणाले, "आज समाजांत नीतीचें मूळ स्थिर राहिलेलें नाही. स्त्रीविषयी आदर राहिलेला नाही. अशी स्थिति जर चालूं राहिली तर समाजाचा नाश होईल, असें मला कित्येक वर्षांपासून वाटत आहे. समाजाला डोळे उघडून हें पाहावयाला लावावयाचें या उद्देशानेच मी 'इशारा' ही कादंबरी लिहिली आहे."

श्री. माडखोलकर यांनीहि समाजाच्या सद्य:स्थितीबद्दल नाशिक क्षेत्रांत केलेल्या ताज्या भाषणांत अशीच तक्रार केली आहे. पुढारी, साहित्यिक आणि पत्रकार या लोकगुरूंचें चारित्र्य आणि त्यांचा समाजाशीं होणारा व्यवहार यावरून समाजाची उंची व थोरवी मापली जाते असें सांगून, व ही कसोटी या लोकगुरूंना लावून त्यांनी काय निष्कर्ष काढला आहे ? ते म्हणतात, "परस्परांविषयीं तुच्छता आणि अविश्वास, एकमेकांविरुद्ध वाटेल तें बोलण्याचा आणि लिहिण्याची प्रवृत्ति, आपल्या बोलण्याचा आणि वागण्याचा जनतेवर काय परिणाम होईल याचा विचार न करतां केले जाणारे सर्व प्रकारचे अविवेक आणि अतिरेक अनुभवाला येतील. कोणाहि विषयीं आदर, विश्वास, प्रेम उरलेलें नसून विफलता, कटुता आणि ग्राम्यता या त्रिदोषांनी आमचें सामाजिक जीवन अंतर्बाह्य दूषित होऊन गेलेलें आहे."

आज ही जी परिस्थिति निर्माण झाली आहे त्या जबाबदारीचा आपला वाटा, लोकगुरूंचा एक घटक या नात्याने, माडखोलकरांनी प्रांजलपणाने उचलला आहे. ते म्हणतात— "आम्ही आपल्या दुष्ट बोलण्याचा आणि लिहिण्याचा परिणाम समाजांतील अर्धशिक्षित, व अपरिपक्व व भावनोत्कट लोकांवर काय होईल याचा विचार कधी केला नाही." श्री. फडके यांच्या सुरवातीच्या कादंबऱ्या लोकांना कां आवडतात याचें उत्तर आणि त्यांना आज दिसत असलेल्या नैतिक ऱ्हासाचें कारण श्री. फडके यांच्या वरील प्रश्नांत आणि श्री. माडखोलकर यांच्या वरील उद्गारांतच सापडतें. अपरिपक्व अनुभव असतांना जें तुम्ही लिहिलेंत त्यांत मनोविकारांचा आविष्कार आहे व तो आविष्कार अपरिपक्व मनाची पकड घेतो. त्यांत तुम्ही फक्त स्त्रीच्या बाह्य सौंदर्याचीं भडक वर्णनें केलींत. स्त्रीचे पुढचे मागचे गोल, अर्ध-गोल, रसरसीत आणि टचटचीत उरोज, स्त्री-पुरुषांचें विकारवश व वैषयिक साहचर्य इत्यादींचें आकर्षण म्हणजे प्रेम-Love असले विचार तुम्ही आपल्या अननुभवी प्रेमविषयक कल्पनांतून समाजाला दिलेत. अनुभवानंतर तुम्ही यापेक्षा निराळें सांगून समाजाला इषारा देण्याच्या प्रयत्नास लागलां असाल, पण वैषयिक सुखाच्या कल्पनासृष्टींतच वावरणाऱ्या अपरिपक्व व स्वप्नाळु तरुण मनांवर तुम्ही अगोदर करून ठेवलेल्या संस्कारांचे परिणाम अजून पुसून निघावयाचे आहेत, हीच गोष्ट तुम्हांला आता न आवडणाऱ्या तुमच्या कादंबऱ्या लोकांना

अजून आवडतात यावरून दिसून येतें. आज समाजांत नीतिमत्ता, श्रद्धा व शिस्त यांचा जो अभाव दिसून येतो, त्याच्या कारणांपैकी गेल्या २५, ३० वर्षांतील आमचें ललित साहित्य हें एक कारण आहे. त्याला आणखीहि कारणें आहेत हें मी जाणतों. स्वातंत्र्याच्या लढ्यांत सैनिक निर्माण करण्यासाठी आम्ही श्रद्धा, आदर आणि कौटुंबिक शिस्त ही प्रयत्नपूर्वक उध्वस्त केली. कारण परकी सत्तेच्या कृत्यांचा बरा वाईट असा विधिनिषेध न बाळगतां आम्हांला तिच्याबद्दल अनादर, अश्रद्धा व अराजक माजवावयाचें होतें. आणि आम्ही ती गोष्ट पूर्ण जाणिवेने केली. तसें करतांना त्याचा परिणाम आमच्या कुटुंबावर, वाङ्‌मयावर, आमच्या जुन्या श्रद्धा व जीवनमूल्यें यांवर काय होत आहे, याकडे आम्ही दुर्लक्ष केलें. तशांतच पहिल्या महायुद्धानंतर पश्चिमेच्या विस्कटलेल्या संसारांतून निर्माण झालेल्या समस्यांचें व विचारांचें लोण आमच्याकडे आलें, व ती उसनवारी आमची नवी प्रतिभा म्हणून पुढे मांडण्यांत आली. त्या विचारांचा स्वीकार आम्ही डोळसपणाने केला नाही. या बाबतींत अधिक दोष 'कलेसाठी कला' असा पुकारा करून वाङ्मयनिर्मिति करणारांना मी देतों. आज ज्या प्रकाराबद्दल आपल्याला उबग आली आहे, ते प्रकार त्याच काळांत रुजले. आज स्वातंत्र्यप्राप्तीनंतर, स्वतंत्र नवभारताच्या निर्मितीची जबाबदारी आपल्यावर येऊन पडल्यावर, ती पार पाडण्यासाठी शिस्त, श्रद्धा आणि नैतिक मूल्यें यांची निकड आपल्याला भासूं लागली आहे. श्री. फडके व माडखोलकर यांचे वरील उद्‌गार, त्यावर आमचें लक्ष केंद्रित व्हावयास प्रारंभ झाला असल्याचें द्योतक आहेत असें समजावयास हरकत नाही. क्रांतिकाळ व क्रांत्युत्तर काळ यांत असा फरक पडतोच. बोल्शेविक क्रांति रुजविण्यासाठी रशियांत देवाधर्मावरील विश्वास नष्ट करून चर्चचें वर्चस्व नामशेष करण्याचे जाणीवपूर्वक प्रयत्न झाले. त्याचा परिणाम पापपुण्याचीं मानवी मनांतील मंदिरें उध्वस्त होण्यांत झाला, व समाजांत निरंकुश जीवनाची प्रवृत्ति वळावूं लागली. स्त्री–पुरुष संबंधांचीं नैतिक बंधनें शिथिल होऊं लागलीं, व प्रेमाच्या बाबतींत Glass of water थिअरी प्रतिपादण्यांत येऊं लागली. त्याला आळा घालण्यासाठी स्वतः लेनिनने आवाज काढला व मनुष्याला तहान लागली व समोर डबकें आणि घाणेरडा ग्लास दिसला तरी मनुष्य तो ग्लास व तें पाणी तोंडाला लावीत नाही, याची जाणीव त्याने करून दिली. त्याची दखल आमच्या या साहित्यिक कलोपासकांनी मात्र घेतली नाही, हें निराळें.

मित्रहो, मी साहित्यिक नाही, आणि प्रथितयश साहित्यिक तर नाहीच नाही. एक सामान्य नागरिक आणि आपल्यासारखाच एक साहित्यप्रेमी या नात्याने मी हे विचार आपल्यापुढे मांडले. अलीकडे आपण सर्वच बाबतींत फार सोशीक बनलों आहोंत. दुसऱ्याच्या मतांबद्दल आदर ठेवून त्यांचा विचार करणें व सोशिकतेने सर्व कांही बरें वाईट मुक्या किंवा मेलेल्या मनाने सहन करणें यांत फरक आहे. ही सोशिकता आज समाजाला घातुक ठरत आहे. लेडी आस्क्विथ यांनीहि आपण over tolerent बनत असल्यामुळे समाजाचें नुकसान होत असल्याचा इशारा नुकताच दिला होता. मलाहि तो पटला व म्हणून मी हें विवेचन केलें. त्यांत जर कोठें कटुता वा कठोरता आली असेल तर त्याबद्दल मी पुन्हा एकदा आपणा सर्वांची क्षमा मागतों.

भाषण लांबलें आहे याची मला जाणीव आहे. माझ्या स्वतःच्या अपेक्षेपेक्षाहि तें लांबलें आहे. तेव्हा तें आणखी फार लांबवून आपल्या सहनशीलतेची मी परीक्षा घेऊं इच्छित नाही.

पण कांही गोष्टी नमूद करणें जरूर असल्यामुळे तसें करीत आहें. भारत सरकार लेखनाच्या कॉपीराइटचा एक नवा कायदा करीत आहे. त्यांतील 'लेखकाची कृति अथवा लिखाण प्रसिद्ध झाल्यापासून फक्त दहा वर्षेपर्यंतच त्या कृतीचा अथवा लिखाणाच्या भाषांतराचा हक्क त्या लेखकाकडे राहील' हें कलम भारतांतील दरिद्री लेखकांना अन्याय करणारें व सध्याच्या कॉपी-राइट बिलानें जे अधिकार दिले आहेत त्यांचा अन्याय्य संकोच करणारें आहे. त्याला सर्व साहित्यिक आणि साहित्य संस्थांनी विरोध करावयास हवा. या बाबतींत लेखकांना न्याय मिळवून देण्याचे आवश्यक ते सर्व प्रयत्न साहित्यिक संस्था करतील, असा मला विश्वास वाटतो.

विदर्भ साहित्य संघ मराठीच्या ज्या परीक्षा घेत असते, त्या बाबतींत एक गोष्ट मी विद्यापीठांच्या व विशेषेंकरून नागपूर विद्यापीठाच्या नजरेस आणूं इच्छितों. संघाच्या कोविद व स्नातक या परीक्षांना व राष्ट्रभाषा हिंदीच्या समकक्ष परीक्षांना विद्यापीठाची एक प्रकारची मर्यादित मान्यता होती. पण पुढे ती रद्द करण्यांत आली. विद्यापीठांत अहिंदी व अमराठी भाषिकांचा जो भरणा आहे, त्यांच्यामुळे हें घडलें असा समज आहे. परंतु मराठी व हिंदी हें शिक्षणाचें माध्यम स्वीकृत केल्यावर या माध्यमांतून शिकविण्याची पात्रता वरील भाषांपैकी एकहि ज्यांची मातृभाषा नाही, त्यांच्या तें माध्यम वापरण्याची पात्रता मान्य करण्यासाठी कांही तरी मानदंड हवा; तो ठरविण्यासाठी ही मान्यता पुन्हा देण्यांत यावी, अशी आमची मागणी आहे.

हल्ली लोकसाहित्याकडे साहित्यिकांचें व सरकारचें अधिक लक्ष जाऊं लागलें आहे ही समाधानाची गोष्ट आहे. विदर्भाचें लोकसाहित्य समृद्ध आहे. लोकगीतें, लोककथा वगैरेंचें संशोधन करून तें प्रसिद्ध करण्याची सोय व्हावयास हवी. त्यायोगें प्रादेशिक बोलींच्या संशोधनाकडे लक्ष देण्यालाहि प्रोत्साहन मिळेल. हळबी, कोरकु वगैरे बोली या मराठीच्या बोली आहेत. भाषाशास्त्रज्ञांनीहि ही गोष्ट मान्य केली आहे. हळबी ही बस्तरची बोली आहे व त्या दृष्टीने बस्तरचा हळबीभाषिक प्रदेश मराठी प्रदेशाला जोडला जावयास हवा. त्यासाठी आवश्यक ते प्रयत्न आमच्या पुढाऱ्यांनी करावेत, अशी अपेक्षा आहे. हा प्रदेश खनिज संपत्तीने व जंगलांच्या बाबतींत समृद्ध आहे. त्याचबरोबर मराठी भाषेशीं या प्रदेशाचा निकटचा संबंध पुरातन काळापासून आहे. मुकुंदराजाच्या काळापूर्वी ५०-७५वर्षें म्हणजे शके १०२० च्या सुमारास बस्तर-लगतच्या चांदा जिल्ह्याची राजभाषा मराठी होती, असें संशोधक सांगतात. या हळबी बोलीचा अभ्यास करण्यासाठी विदर्भ साहित्य संघाने शिष्यवृत्ति देऊं केली होती. पण कांही कारणाने तिचा लाभ घेणारे तेव्हा भेटले नाहीत. मराठीच्या बोलींच्या संशोधनाकडे आमच्यांतले तरुण व अभ्यासु साहित्यप्रेमी लक्ष देतील, अशी आशा आहे.

लोकसाहित्य, लोकनाटय वगैरेंच्या प्रोत्साहनाची लाट सध्या उसळूं पाहत आहे. नाटय, काव्य, गीतें, बोली वगैरेंच्या मागे 'लोक' हें उपपद लावून होणाऱ्या लोकसाहित्याबद्दल मी आपल्याला असें सांगूं इच्छितों की, त्यामागे लागलेल्या 'लोक' या शब्दामुळे त्यांचा अभिजातपणा दुर्लक्षिला जाऊं नये. गेल्या कांही वर्षांत कलापथकांनी लोकनाटयाला व लोकसाहित्याला जें एक चांगलें वळण लावण्याचें कार्य सुरू केलें आहे त्याची बूज आपण राखली पाहिजे. कांही वर्षांपूर्वीं साहित्याच्या व्यासपीठावर या लोकसाहित्याचें अंशतः दर्शन करून देण्याचा प्रयत्न

झाला असतां त्यावर ग्राम्यतेचा आरोप करून निषेधार्थ सभात्याग झालेला माझ्या स्मरणांत आहे. आज तच लोकसाहित्य हातीं धरून पुढे आणण्याचें कार्य नाणावलेले साहित्यिक करीत आहेत. काळ एवढा बदलला आहे. हें अर्थातच प्रगतीचें लक्षण आहे. परंतु लोकसाहित्यहि मध्यंतरीं अवनतीला लागून ग्राम्यतेच्या पायरीवर लोळत पडलें होतें. तें वर उचलून त्याला संसदेची प्रतिष्ठा देतांना, त्याला लागलेली घाणहि वर येणार नाही याकडे आम्ही लक्ष दिलें पाहिजे. ग्रामीण हें ग्राम्याहून निराळें आहे. ग्रामीण जनांचा विनोद ग्राम्यच असतो, असें समीकरण नाही. म्हणून लोकगीतें, लोकनाटय, लोककथा वगैरे लोकसाहित्याला प्रोत्साहन देतांना त्यांतील मौलिक गुण तेवढे पारखून घेण्याची दक्षता बाळगली पाहिजे. नाही तर कलेच्या उद्धाराच्या नांवाखाली नागर साहित्यांत कलेसाठी कला या तत्त्वाच्या हैदोसाने जसें समाजाचें नुकसान झालें व 'हेंचि फळ काय मम तपाला' असें म्हणण्याची पाळी आमच्या साहित्यश्रेष्ठींवर आज आली त्याचीच पुनरावृत्ति व्हावयाची.

साहित्याशीं निकट संबंधित असे आणखीहि बरेच प्रश्न आहेत. उदाहरणार्थ, महाराष्ट्र मुद्रण परिषदेने 'लेखनाची प्रमाणित व अधिकृत पद्धति' ठरविण्यासाठी विद्यापीठें, साहित्य संघ व सरकार यांची समिति नेमण्याबद्दल केलेली मागणी, मराठवाडा साहित्य परिषदेने वाचनालयांच्या वाढीसाठी हैद्राबाद संस्थानने लावलेला कर त्या भागांत कायम ठेवून, इतर भागांत वाचनालयांच्या अभिवृद्धीसाठी तो कर लागू करण्याची केलेली सूचना—वगैरे. या प्रश्नांचा आपलें संमेलन व विदर्भ साहित्य संघ विचार करून त्याबद्दल ठराव करतीलच. खुद्द विदर्भ साहित्य संघानेहि एक रेफरन्स लायब्ररी—संदर्भ ग्रंथालय सुरू करावें अशीहि माझी सूचना आहे. नागपूर व विदर्भाचें महत्त्व कायम टिकविण्याच्या दृष्टीने अनेक सूचना अनेक मंडळी करीतच आहेत. नागपूरचें सांस्कृतिक महत्त्व वाढून तेथे विद्येच्या पीठाची वाढ व्हावी या दृष्टीने मी मुंबई सरकारला एक सूचना करतों. उटकमंड येथे जें office of the Epigraphist for India हें पुराण वस्तु संशोधनाचें कार्यालय आहे तें तेथून हलविण्याचें घाटत आहे. तें तेथून हलविण्याचीं जीं कारणें आहेत तीं लक्षांत घेतां नागपूर हें मध्यवर्ती ठिकाण सोयीचें ठरणार आहे. म्हणून मुंबई सरकारने व नागपूर विद्यापीठाने तें कार्यालय नागपुरास आणण्याची आवश्यक ती खटपट करावयास हवी.

विदर्भ साहित्य संघाच्या गरजा आपल्याला ठाऊकच आहेत. आपण साहित्यप्रेमी लोकांनी बहुसंख्येने सभासद होऊन त्याची वाढ करावी व संघाने हातीं घेतलेल्या रंगमंदिराच्या बांधकामास सढळ हाताने मदत करावी अशी मी आपल्याला आग्रहाची विनंती करतों.

एकत्रित महाराष्ट्रांतील साहित्य संस्थांचे परस्पर संबंध कार्याच्या एकसूत्रीपणाच्या दृष्टीने काय असावेत, हाहि एक महत्त्वाचा प्रश्न आहे. सर्व प्रादेशिक संस्थांचें स्वायत्तत्व कायम ठेवून हें कार्य झालें पाहिजे हें उघड आहे. आपल्या संघाची हीच भूमिका आहे.

मित्र हो, आपल्याला मी फार वेळ तिष्ठत ठेवलें याची मला जाणीव आहे. माझें भाषण संपलें. आपण मला साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाचा बहुमान दिलात, त्याबद्दल मी आपले पुन्हा एकवार आभार मानून आपली रजा घेतों.

विदर्भ साहित्य संघाचे उद्देश आणि गरजा

१. विदर्भ साहित्य मंदिराची इमारत पूर्ण करणें व नाट्यगृह बांधणें.

२. वि. सा. संघाच्या परीक्षांना व्यापक आणि सर्वोपयोगी स्वरूप देणें.

३. वि. सा. सं. चें मुखपत्र युगवाणी आर्थिक दृष्टीने स्वावलंबी करून उत्तरोत्तर त्याचें स्वरूप सर्वांगीण करणें.

४. वि. सा. सं. च्या वतीने दुर्मिळ ऐतिहासिक, शैक्षणिक व वाङ्मयीन ग्रंथांचें प्रकाशन

५. मराठी भाषेच्या हिताचें प्रातिनिधिक स्वरूपाचें कार्य करणें.

मराठी-प्रेमी जनतेने तनमनधनाने विदर्भ साहित्य संघाला मदत करावी अशी नम्र विनंती आहे.

'युगवाणी' सदस्यांना विनामूल्य. ✻ सभासदत्वाचें वार्षिक शुल्क फक्त तीन रुपये

हें मासिक श्री. पुरुषोत्तम दिवाकर ढवळे यांनी वि. सा. संघाकरितां नारायण मुद्रणालय, धनतोली, नागपूर १ येथे मुद्रित करून संघ-कार्यालय, उत्तर अंबाझरी रस्ता, सीताबर्डी, नागपूर १ येथे प्रकाशित केलें.

अनुक्रमणिका